रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८८ | अंक १९५ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

## २२ फेब्रुवारीला होणार आंगणेवाडीची जत्रा

**सिंधुदुर्ग :** महाराष्ट्रात आंगणेवाडीच्या भराडीदेवीच्या यात्रेला एक विशेष स्थान आहे. या यात्रेचे वैशिष्ट्य म्हणजे दरवर्षी देवीला कौल लावून या यात्रेची तारीख ठरवली जाते. त्यामुळे यंदा ही यात्रा कोणत्या तारखेला येणार, याकडे अनेकांचे लक्ष लागले होते. अखेर देवीने कौल दिला असून ही यात्रा पुढच्या वर्षी २२ फेब्रुवारीला होणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. देवीने कौल दिल्यानंतर आंगणेवाडी ग्रामस्थ मंडळाने यात्रेची तारीख गुरुवारी (दि.१२) सकाळी जाहीर केली. पान २ वर

रायगड, शुक्रवार, दि. १३ डिसेंबर २०२४

# कृषीवल

किंमत ४ ₹

## मंत्रिपदाचा फार्म्युला ठरला?

**मुंबई :** महायुतीमधील भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात खाते वाटपावर चर्चा पूर्ण झाली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार भाजप आपल्याकडे गृह विभागासह, नगर विकाससारखे महत्वाचे विभाग ठेवणार आहे. महसूल आणि सार्वजनिक बांधकाम विभाग शिवसेनेकडे दिले जाणार आहे. अर्थ मंत्रालय अजित पवार यांच्याकडे देण्यात येणार आहे. भाजपकडे असणारे दोन विभाग युतीमधील घटकपक्षांना देण्यास भाजप तयार झाला आहे. भाजपच्या कोट्यातील महसूल आणि गृहनिर्माण विभाग घटक पक्षांना देणार आहे. पान २ वर

**आजचा अग्रलेख**

**अक्सीर शस्त्रक्रिया हवी**

**वेधक**

### अमरावती, भिवंडीत एनआयएचा छापा

**भिवंडी :** भिवंडी आणि अमरावती शहरात राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) छापा टाकला आहे. एनआयएने या दोन्ही शहरांत छापा टाकून एका, एका तरुणाला ताब्यात घेतले आहे. भिवंडी आणि अमरावतीमधून ताब्यात घेतलेले तरुण पाकिस्तानी संघटनेच्या संपर्कात होते. एनआयएला अमरावतीमधील एक तरुण पाकिस्तानच्या संपर्कात असल्याची माहिती मिळाली होती. त्यानंतर एनआयए पथक बुधवारी थेट अमरावती व भिवंडीत पोहचले. या दोन्ही ठिकाणाहून त्यांनी दोघांना रात्री १२ वाजता ताब्यात घेतले. अमरावतीप्रमाणे एनआयएच्या टीमने भिवंडीतून गुरुवारी पहाटेच्या सुमारास कामरान अन्सारी याला ताब्यात घेतले.

### एक देश, एक निवडणूक विधेयकाला मंजुरी

**नवी दिल्ली :** देशात एक देश, एक निवडणूक हे धोरण राबविण्यासाठी माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. या समितीचा अहवाल केंद्रीय मंत्रिमंडळाने सप्टेंबर महिन्यात स्वीकारला होता. त्यानंतर गुरुवारी (दि.१२) केंद्रीय मंत्रिमंडळाने या विधेयकाला मंजुरी दिली आहे. पुढील आठवड्यात हे विधेयक संसदेत सादर केले जाण्याची शक्यता आहे.हे विधेयक संसदेत मंजूर झाल्यास एक देश, एक निवडणूक धोरण पुढील लोकसभा निवडणुकीवेळी, म्हणजे २०२९ मध्ये राबविले जाण्याची शक्यता आहे. त्यासाठी संसदेत घटनादुरुस्तीद्वारे ही प्रक्रिया राबवावी लागेल. तसेच देशभरात व्यापक चर्चा करून सहमती निर्माण करण्याचा प्रयत्न केंद्र सरकारकडून केला जात आहे.

# सर्वसामान्यांचे हाल, ठेकेदार मालामाल



**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

**अलिबाग तालुक्यातील रेवस बंदराजवळील मिळकतखार येथील खाडीमध्ये बेकायदेशीर भरावाप्रकरणी वारंवार तक्रारी करुनही ठेकेदाराने अधिकाऱ्यांच्या संगनमताने भराव सुरु ठेवल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते संजय सावंत यांनी केला आहे. या भरावामुळे शेकडो हेक्टर शेतजमिन नापीक होणार असून सर्वसामान्य शेतकरी तक्रारी करुन मेटाकुटीला आला आहे. परिणामी, भरावामुळे सर्वसामान्यांचे हाल होत असून ठेकेदार मात्र मालामाल होत असल्याची टीका ग्रामस्थांनी केली आहे.**

प्रांताधिकारी मुकेश चव्हाण यांनी तक्रारदार सावंत यांना दोन दिवसांपूर्वी याप्रकरणी तहसिलदारांना काम बंद करण्याचे लेखी आदेश दिले असल्याचे सांगितले. यावेळी सावंत यांनी गेली १० वर्ष थोडेथोडे करुन हा बेकायदेशीर भराव पूर्णत्वाकडे नेण्याचे प्रयत्न सुरु असल्याचे प्रांताच्या लक्षात आणून दिले. यावर प्रांतांनी बेकायदेशीररित्या केलेला भराव तहसीलदारांना आदेश देऊन काढून टाकण्यात येईल व सबंधितांना दंड ठोठावला जाईल, असे सांगितले होते. असे असतानाही हा भराव आजही जोमाने सुरु आहे.

संजय सावंत यांना माहिती अधिकारात मिळालेल्या पान २ वर



**जिल्हा प्रशासनाचे आदेश डंपरखाली, आरोपींवर गुन्हा दाखल करण्याची मागणी**

**१० वर्षापासून पर्यावरण रक्षणासाठीच्या लढ्याला यश येईना**

### प्रांताधिकारी रजेवर, तहसिलदार फिरतीवर

मिळकतखार येथील ग्रामस्थ अनधिकृत भरावाप्रकरणी प्रशासनाकडे दाद मागण्यासाठी गेले असता प्रांताधिकारी मुकेश चव्हाण हे रजेवर गेले आहेत, तर अलिबाग तहसिलदार फिरतीवर गेल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे ग्रामस्थांनी प्रशासनावर नाराजी व्यक्त केली आहे.

### प्रकरण काय?

अलिबाग तालुक्यातील रेवस बंदराजवळील मिळकतखार येथील खाडीमध्ये बेकायदेशीर भराव केल्याप्रकरणी मांडवा सागरी पोलीस ठाण्यात वासवानी रिसॉर्ट तर्फे कार्यकारी संचालक यांच्यावर सन २०१४ मध्ये गुन्हा दाखल आहे. याच जागेत पुन्हा माती भराव सुरू झाला असून याबाबत कोकण आयुक्तांकडेदेखील तक्रार दाखल केली होती. काँग्रेसचे माजी आमदार स्व. मधुकर ठाकूर व मिळकतखार येथील ग्रामस्थांनी सन २०१४ मध्ये या अनधिकृत भरावाकडे शासनाचे लक्ष वेधले होते. त्यानुसार महसूल विभागाचे तत्कालीन मंडळ अधिकारी श्रीकांत कवळे यांनी पाहणी करून पर्यावरण अधिनियम १९८६ चे कलम १५ व प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५२ अन्वये वासवानी रिसॉर्ट तर्फे कार्यकारी संचालक, जनक हरकिसनादास वासवानी यांच्यावर शासनातर्फे मांडवा सागरी पोलीस ठाण्यात क्र.०५/२०१४ अन्वये गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर पुन्हा सन २०२२ साली याच कारणासाठी त्यांच्यावर पुन्हा गुन्हा दाखल झाला होता.

> मिळकतखारमधील ही जागा नो-डेव्हलपमेंट क्षेत्रात येत असल्याचा अहवाल सहाय्यक संचालक नगररचना यांनी २०१४ मध्येच तहसिलदार यांना दिला आहे. त्यामुळे बेकायदेशीर भराव करणाऱ्यांवर गेल्या १० वर्षात २०१४ व २०२२ मध्ये दोन गुन्हे दाखल झाले आहेत. पर्यावरण कायद्यानुसार एकच गुन्हा वारंवार घडत असेल तर त्या जागेची जबाबदारी असणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांवर कर्तव्यात कसुर केल्याप्रकरणी गुन्हा दाखल होणे गरजेचे आहे. याबाबतची तक्रार लवकरच शासनाकडे करणार आहे.
>
> – संजय सावंत, सामाजिक कार्यकर्ते

# गोगावलेंचा सर्वसामान्यांना दणका

## लवकरच होणार एसटी तिकिटाची दरवाढ

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

एकिकडे लाडकी बहिण योजनेच्या माध्यमातून सरकारने महिलांना पंधराशे रुपये दिले. तर दुसरीकडे सर्वसामान्यांसाठी आवश्यक असणाऱ्या वस्तुंच्या, वाहतुकीच्या दरात वाढ केली आहे. सरकारच्या या दुटप्पी वागणुकीबद्दल अनेक नागरिकांनी प्रश्न उपस्थित केला आहे. अशातच नव्या वर्षात राज्य परिवहन (एसटी) महामंडळाच्या बसगाड्यातून प्रवास करताना सर्वसामान्यांच्या खिशावर अतिरिक्त भार येणार आहे. एसटी महामंडळाने सर्व प्रकारच्या बसगाड्यांमध्ये १४ टक्के भाडेवाढीचा प्रस्ताव तयार केला आहे. महामंडळाच्या आगामी संचालक मंडळाच्या बैठकीत हा प्रस्ताव मंजूर केल्यानंतर राज्य सरकारच्या मंजुरीनंतर याची अमंलबजावणी नव्या वर्षात अर्थात जानेवारी २०२५ पासून होण्याचे संकेत महामंडळाचे अध्यक्ष आ. गोगावले यांनी पान २ वर



### बस पुरवठादारांना कारणे दाखवा नोटिस

सध्या एसटी महामंडळाकडे १४ हजार बसेस असून, उपलब्ध प्रवाशांसासाठी त्या अत्यंत अपुऱ्या पडत आहेत. त्यापैकी अनेक बसेस अंत्यत जुन्या झाल्या आहेत. तसेच काही बसेस कालबाहय होण्याच्या उंबरठ्यावर आहेत. हि वस्तुस्थिती लक्षात घेता निविदा पात्र संस्थानी नवीन बसेस वेळेत पुरवठा करणे अत्यंत आवश्यक होते. तथापि, त्या संस्था बसेस पुरविण्याबद्दल सक्षम का नाहीत? याची शहानिशा करून त्यांना कारणे दाखवा नोटिस पाठवुन द्यावी, असे निर्देश अध्यक्ष गोगावले यांनी एसटी प्रशासनाला दिले.

# कातळपाड्यात गळा दाबून हत्या

## उसने दिलेले पैसे देण्या-घेण्यावरून वाद

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील कातळपाडा येथील इसमाचा गळा दाबून हत्या करण्यात आली. उसने दिलेले पैसे देण्या घेण्यावरून हा वाद झाला असून या गुन्ह्यातील दोघांना पोलिसांनी गुरुवारी अटक केली आहे. ही घटना कातळपाडा येथे बुधवारी रात्री घडली. याप्रकरणी पोयनाड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार,अमित प्रफुल्ल वाघ (वय ३७) रा. कातळपाडा असे या मयताचे नाव आहे. अमितने



कोपरी-कुर्डूस येथील व्यक्तींकडून उसने पैसे घेतले होते. ती रक्कम परत दिली नाही. त्याचा राग धरून चंद्रकांत म्हात्रे आणि अक्षय म्हात्रे यांनी अमित वाघ याच्या घरी रात्री जाऊन उसने दिलेल्या पैशाची मागणी केली. त्यावेळी वाघ आणि म्हात्रे यांच्यात शाब्दीक वाद झाला. हा वाद विकोपाला पोहचला. त्या दोघांनी शिवीगाळी करीत हाताबुक्क्याने व लाथेने मारहाण केली. त्यानंतर त्याला घरातून बाहेर पडवीमध्ये खेचत आणले. त्यानंतर चंद्रकांत याने अमितची मान दाबली. अक्षयने अमितच्या गुप्त भागावर लाथ मारून पुन्हा त्याला मारहाण केली. त्यामध्ये तो गंभीर जखमी झाला.ही घटना कातळपाडा येथे अमित वाघ याच्या घरात रात्री पावणे बाराच्या दरम्यान घडली. झालेल्या दुखापतमध्ये अमितचा मृत्यू झाला. या घटनेनंतर दोघेही पसार झाले. या घटनेची माहिती मिळताच पोयनाड पोलीस व स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने त्यांचा शोध सुरू केला. अखेर गुरुवारी सायंकाळच्या दरम्यान त्यांना पकडण्यास यश आले. याप्रकरणी खून करणाऱ्या चंद्राकांत म्हात्रे व अक्षय म्हात्रे यांच्याविरोधात पोयनाड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्या दोघांनाही अटक केल्याची माहिती समोर येत आहे.

# ऋषिकेश तायडे यांचा शेकापमध्ये प्रवेश

## बाळाराम पाटील यांच्या उपस्थितीत ठाणे शहर अध्यक्षपदी नियुक्ती



**। ठाणे । प्रतिनिधी ।**

किसान काँग्रेसचे ठाणे शहर अध्यक्ष ऋषिकेश तायडे यांनी शेकापत प्रवेश केला आहे. शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांच्या आदेशाने व माजी आ. बाळाराम पाटील यांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला असून ऋषिकेश तायडे यांची ठाणे शहर अध्यक्षपदीदेखील नियुक्ती करण्यात आली आहे.

यावेळी भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे ठाणे जिल्हा ध्यक्ष प्रसाद साळवी, युवक आघाडीचे निखिल शशिधरण व विष्णू येलकरदेखील उपस्थित होते. त्यांनी ऋषिकेश तायडे यांना नवीन जबाबदारीसाठी शुभेच्छा दिल्या. ऋषिकेश तायडे हे एक अनुभवी नेते आणि समाजसेवक आहेत. ते पूर्वी काँग्रेस पक्षाशी संबंधित होते. किसान काँग्रेसचे ठाणे शहर जिल्हाध्यक्ष म्हणून त्यांनी काम केले आहे. त्या काळात त्यांनी शेतकरी आणि कामगारांच्या कल्याणासाठी अतिशय परिश्रम घेतले. भारतीय शेतकरी कामगार पक्षात प्रवेश करून त्यांनी गोरगरिबांच्या प्रश्नांवर काम करण्याचा आणि स्थानिक तरुणांचा विकास मजबूत करण्याचा संकल्प केला आहे. यावेळी बोलताना बाळाराम पाटील यांनी पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी पान २ वर

## शिक्षिकेकडून विद्यार्थ्याला अमानुष मारहाण

**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण येथील कारमेल हायस्कूलमध्ये माणूसकीला काळीमा फासेल असा प्रकार शिक्षिका रसिका साळवी यांच्याकडून घडला आहे. इयत्ता चौथीमध्ये शिकत असणारा विद्यार्थी स्पर्धेत भाग घेत नाही, म्हणून त्याला प्लास्टिकच्या पाईपने अमानुष मारहाण केल्याचा प्रकार समोर आला आहे.

या विषयी सविस्तर वृत्त असे की, कारमेल हायस्कूलमध्ये वार्षिक क्रिडा व सांस्कृतिक कार्यक्रम सुरू आहेत. यामध्ये वैयक्तिक स्पर्धा असून या स्पर्धेमध्ये पीडित विद्यार्थ्याने सहभाग घेतला नाही, म्हणून क्रीडा शिक्षिका रसिका साळवी यांनी या विद्यार्थ्याला प्लास्टिकच्या पाईपने हातावर, पायावर, पाठीवर तसेच पार्श्वभागावर अमानुषपणे मारले. शाळा सुटल्यानंतर विद्यार्थी घरी गेला. शिक्षिकेच्या मारायच्या भितीने त्याने आपल्या पालकांना काहीच सांगितले नाही. दुसऱ्या दिवशी विद्यार्थी शाळेमध्ये गेला नाही, कारण त्याने माराचा मानसिक धक्का घेतला होता. तरीही त्याने आपल्या पालकांना काहीच सांगितले नाही. परंतु पीडित विद्यार्थ्याचे वडिल त्याला तिसऱ्या पान २ वर

## भाविकांवर राहणार सीसीटीव्हीची नजर

# चौल यात्रेसाठी पोलीस सज्ज

**प्रमोद जाधव**

**। अलिबाग ।**

चौल-भोवाळे येथील यात्रेची तयारी गेल्या अनेक दिवसांपासून सुरू आहे. ही तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. शनिवार (दि.१४) पासून यात्रेला सुरुवात होणार आहे. या यात्रेत येणाऱ्या भाविकांसह संपूर्ण यात्रेच्या सुरक्षेसाठी रेवदंडा पोलीस सज्ज झाले आहेत. चौल भोवाळे येथील चोरी प्रकरणानंतर पोलीस सतर्क झाले असून यावर्षी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांसह अनेक सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहेत.







रेवदंडा परिसरातील चौल-भोवाळे येथे दत्तजयंतीनिमित्त १४ डिसेंबरपासून यात्रेला सुरुवात झाली आहे. १८ डिसेंबरपर्यंत ही यात्रा राहणार आहे. या पाच दिवसात पान २ वर

> चौल भोवाळे येथील यात्रा शनिवारपासून सुरु होत आहे. सुरक्षेच्या दृष्टीने कडक पाऊल उचलले आहे. ग्रामपंचायतीच्या मार्फत सहा ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहेत. पोलिसांचा बंदोबस्त दिवस-रात्र या दोन टप्प्यात राहणार आहे. पोलिसांद्वारे वेळोवेळी गस्त घातली जाणार असून महिला सुरक्षा दृष्टीनेदेखील अंमलबजावणी करण्यात येणार आहे.
>
> – श्रीकांत किरवले-सहाय्यक पोलीस निरीक्षक, रेवदंडा



# ग्रामस्थांनी महामार्गाचे काम थांबवले

**। कोलाड । वार्ताहर ।**

मुंबई-गोवा महामार्गावरुन गोवे गावाकडे जाणारा रस्ता ठेकेदाराच्या आडमुठेपणामुळे बंद करण्यात आला आहे. यामुळे या मार्गावरून कोलाड नाक्यावर तसेच कोलाडकडून गोवे गावाकडे जाणारा मार्ग बंद झाल्यामुळे विद्यार्थ्यांसहित ग्रामस्थांना नाहक त्रास सहन करावा लागत असुन यामुळे गोवे पुई ग्रामस्थ आक्रमक होऊन रस्त्यावर उतरले असुन आमच्या विविध मागण्या पूर्ण झाल्याशिवाय महामार्गाचे काम करुन देणार नाही अशा संबंधित ठेकेदाराला इशारा देण्यात आला व काम बंद करण्यात आले.

यावेळी विभागीय अध्यक्ष नरेंद्र जाधव, गोवे ग्रामपंचायत सरपंच महेंद्र पोटफोडे, सदस्य नितीन जाधव, नरेंद्र पवार, गाव समिती अध्यक्ष बळीराम जाधव, उपाध्यक्ष सत्कार कापसे, सचिव श्रीधर गुजर, खजिनदार शंकर दहिंबेकर, सुरेश जाधव, प्रविण पवार, भरत जाधव, राजा जाधव, कमलाकर शिर्के, महादेव जाधव, नंदा वाफिलकर, नितीन वारकर, महेंद्र जाधव, पांडुरंग जाधव, हसन म्हसलाई, विश्वनाथ धामणसे, सुनिल दळवी, अशोक धामणसे, उल्हास पाटील, ठेकेदार, पाटबंधारे खात्याचे अधिकारी, पोलीस अंमलदार नरेश पाटील उपस्थित होते.

चौपदरीकरणाच्या कामाला १७ वर्षे पूर्ण झाल्यानंतर कोलाड परिसरातील रस्ता करण्यासाठी ठेकेदाराला जाग आली आहे. परंतु गोवे गावाकडे जाणारा रस्ता बंद करण्यात आला आहे. हायवेवरून उन्हाळी भातशेतीला पाणीपुरवठा करणारा चेंबर तोडण्यात आला आहे. महामार्गासाठी संपादीत करण्यात आलेली जमिनींची मार्किंग केली नाही. विविध मागण्यासाठी ग्रामस्थांकडून तीव्र आंदोलन करण्यात आले.

> **मुंबई-गोवा महामार्गांवरून गोवे गावाकडे जाणारा मार्ग खुळा करुन देणे,संपादीत केलेली जमिनीची मार्किंग करुन देणे,भातशेतीला पाणी पुरवठा करणारा चेंबर बांधून देणे किंवा इतर मार्गांनी भातशेतीला पाणीपुरवठा करुन देणे हे काम वेळेवर झाले नाही तर येथील शेतकऱ्यांना नुकसानभरपाई द्यावी लागेल. ही कामे पहिली पूर्ण झाली नाहीत तर चौपदरीकरणाचे काम करून देणार नाही.**
>
> **महेंद्र पोटफोडे**
> **गोवे ग्रामपंचायत सरपंच**



# मोफत नेत्र तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स मुरुड आणि आर झुनझुनवाला शंकरा नेत्र रुग्णालय पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने आज अंजुमन हायस्कूल परिसर पंचक्रोशी मजगाव येथे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिरात शंकरा रुग्णालयातील डॉक्टर आणि तंत्रज्ञ डोळ्यांच्या दोषाने त्रस्त असलेल्या लोकांची तपासणी करण्यासाठी उपस्थित होते. या शिबिराचा मुरुड परिसरातील सुमारे २०० लोकांनी लाभ घेतला.

या शिबिरात २५ जणांना मोतीबिंदू आढळून आले असून त्यांना मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी पनवेल येथील शंकरा हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले आहे.

महाविद्यालयाचे अध्यक्ष जैनुद्दीन कादिरी व प्रभारी प्राचार्य डॉ.साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ.फिरोज शेख व प्रा. निदा गोरामे यांनी स्वयंसेवकांसह शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी परिश्रम घेतले.

## ग्रुप ग्रामपंचायत देवळी
## ता.माणगाव, जि.रायगड
## निविदा सूचना

ग्रुप ग्रामपंचायत देवळी मध्ये १५ वित्त आयोग योजने अंतर्गत खालील काम करण्यासाठी ठेकेदारांकडून निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ क्र. | कामाचे नाव अंदाजपत्रकीय रक्कम | अंदाजपत्रकीय रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी | निविदा सादर करणेची अंतिम तारीख | १ टक्का इसारा रक्कम | कोरे निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | उपकेंद्र दुरूस्ती करणे | ५३७७८/- | २०/१/२०२५ | १८/१२/२०२५ | ५३७/- | २००/- |
| २ | देवळी कोंड दत्त मंदिराकडे जाणारा रस्ता पेव्हर ब्लॉक बांधणे | १३५०००/- | २०/१/२०२५ | १८/१२/२०२५ | १३५०/- | २००/- |
| ३ | देवळी कोंड सभागृह येथे सार्वजनिक शौचालय बांधणे | १०८२६७/- | २०/१/२०२५ | १८/१२/२०२५ | १०००/- | २००/- |
| ४ | मूर येथे सार्वजनिक विहिरीवर चौथरा व पत्राशेड बांधणे | १०००००/- | २०/१/२०२५ | १८/१२/२०२५ | १०००/- | २००/- |
| ५ | मूर स्मशानभूमीला पेव्हर ब्लॉक बसविणे | १३३५१७/- | २०/१/२०२५ | १८/१२/२०२५ | १३३५/- | २००/- |
| ६ | देवळी तलाव दुरूस्ती करणे. | २३९२६०/- | २०/१/२०२५ | १८/१२/२०२५ | २३९२/- | २००/- |
| ७ | ग्रामपंचायत हद्दीत कचरा कुंड्या वाटप करणे | १०००००/- | ३०/१२/२०२४ | १८/१२/२०२५ | | |
| ८ | ग्रामपंचायत हद्दीतील मुलींना सॅनिटरी नॅपकिन खरेदी करणे. | ७५८५२/- | ३०/१२/२०२४ | १८/१२/२०२५ | | |
| ९ | मूर बौद्धवाडी येथे बोअरवेल मारणे | ११६४९९/- | २०/१/२०२५ | १८/१२/२०२५ | ११६४/- | २००/- |
| १० | देवळी बौद्धवाडी येथे बोअरवेल मारणे | १०५९३२/- | २०/१/२०२५ | १८/१२/२०२५ | १०५९/- | २००/- |

**अटी व शर्ती**

१) प्राप्त निविदा दि.१९/१२/२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता ग्रामपंचायत कार्यालय देवळी येथे उपस्थितांच्या समक्ष मा.सरपंच यांच्या हस्ते उघडण्यात येईल.
२) ठेकेदार नोंदणीकृत असावा.
३) कोणतीही एक अथवा अनेक निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा.सरपंच देवळी यांना राखून ठेवला आहे.
४) प्रत्येक देयकातून शासन नियमाप्रमाणे रक्कम कपात केल्या जातील. मा.उपभियंता सा़ो बांधकाम/पाणीपुरवठा उपविभाग माणगाव यांचेकडील तांत्रिक अधिकारी व ग्रा.पं चे पदाधिकारी सदस्य यांचे मार्गदर्शनाखाली सदर काम देखरेखीखाली करण्याचे असून काम समाधानकारक नसेल तर त्याच स्थितीत थांबवून कार्यारंभ आदेश रद्द करणेचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवलेला आहे.
५) काम अंतिमरित्या पूर्ण झाल्यानंतर ६ महिन्यानंतर कामाची स्थिती पाहून सुरक्षा अनामत परत केली जाईल.

सही/-
**ग्रामसेवक**
**ग्रुप ग्रामपंचायत देवळी**

सही/-
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत देवळी**

**DISTRICT CONSUMER DISPUTES REDRESSAL FORUM RAIGAD-ALIBAG**
**COLLECTOR OFFICE BULDING,SECOND FLOOR, NEAR HIRAKOT TALAV**
**TAL-ALIBAG, DIST-RAIGAD-402201**
**Website-www.confonet.nic.in**
**Under the Consumer Protection Act, 2019**
Consumer Case No. 23/84 To CC/23/95

1. Prakash Jaganath Sapane CC/23/84
2. Bhaskar Janu Kondilkar CC/23/85
3. Shatrughna Haribhau Nighukar CC/23/86
4. Sachin Dharma Nagaonkar CC/23/87
5. Paresh Kashinath Patil CC/23/88
6. Vyankatesh Kamlakar Kadu CC/23/89
7. Rajesh Harishchandra Auti CC/23/90
8. Naresh Kamlakar Patil & Rajinikant Naresh Patil CC/23/91
9. Santosh Balaram Bhoir CC/23/92
10. Avinash Ramkrushna Patil & Aditya Avinash Patil CC/23/93
11. Vikas Narhari Patil CC/23/94
12. Umesh Dattatrey Mhatre CC/23/95

.... Petitioner/Complaiant/Appellant
Versus
Golden motors through proprietor Santosh Suresh Vengurlekar alice Sandip Suresh Kandalkar .... Opposite Party/Respondent (s)
To

**Opposite Party/Respondent Name :**

1. Golden motors through preprietor Santosh Suresh Vengulekar alice Sandip Suresh Kandalkar
1. Room no. 838, 4th Floor Building no. 11 Abhyuday Nagar, Kalachowki Mumbai 2.604 Balaji Sipali sukapur, new panvel. dist-Raigad

3. Golden Motors Through Properietor Vikrant Ravindra Telore
1. R.B. 1/247/32, central Railway colony, Parel mumbai 2. Pushpak Society, 201, Pali devad road, sukapur, new panvel dist-Raigad

**जा.क्र.जिग्रातनिआ/राय/जा.नो./२०२४/**
**दिनांक :-**

**जाहीर प्रकटन**

वर नमूद तक्रारदार यांनी सामनेवाले यांच्या विरुद्ध ग्राहक संरक्षण कायद्याखाली तक्रार केलेली आहे. यातील विरुद्ध पक्ष यांना नोटीस पाठविली असता स्विकारत नाहीत/पत्ता बदलला/मिळून येत नाही. म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, विरुद्ध पक्ष यांनी वर नमूद पत्त्यावर दिनांक ०६ जानेवारी २०२५ रोजी ठिक सकाळी १०.३० वाजता वेळेत स्वतः अगर तर्फे प्रतिनिधी मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरुद्ध पक्ष हे हजर न राहिलेस ग्राहक तक्रार आयोगाचा एकतर्फी आदेश पारित करणेत येऊन पुढील आदेश करण्यात येईल यांची दखल घ्यावी. मे. अध्यक्ष जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, रायगड-अलिबाग यांचे आदेशानुसार.

ठिकाण : अलिबाग-रायगड
दिनांक :-

सही/-
**प्रबंधक,**
जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, रायगड

# सामाजिक प्रभाव पुरस्काराने विजयभूमी युनिव्हर्सिटी सन्मानित




**। कर्जत । वार्ताहर ।**

एस.पी. जैन. व्यवस्थापन व संशोधन संस्था व प्रिंसीपल फॉर रिस्पॉंसिबल मॅनेजमेंट एज्युकेशन इंडिया च्या कार्यक्रमात विजयभूमी युनिव्हर्सिटीच्या कन्याथॉनला सामाजिक प्रभाव पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

कन्याथॉन ही २०११ साली इंडियन फायनान्शियल लिटरेसी मुहमेंट, संस्थांच्या विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी सुरू केलेली मुलींच्या सक्षमीकरणासाठीची चळवळ आहे. यामध्ये जगजित शेठ स्कुल ऑफ मॅनेजमेंट. आणि विजयभूमी विद्यापीठ कर्जत तालुक्यातील जांबरुंग यांनी सहभाग घेतलाहोता. कार्यक्रम सामाजिक न्याय विभागाच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आला होता.

यावेळी प्रमुख वक्ते म्हणून रमण मॅगसेसे पुरस्कार विजेते आणि सफाई कर्मचारी आंदोलनाचे संस्थापक बेजवाडा विल्सन उपस्थित होते. आंतरराष्ट्रीय परीक्षकांनी विजयभूमी युनिव्हर्सिटीचे कन्याथॉन उपक्रमाला उल्लेखनीय सामाजिक परिणाम आणि सहभागाबद्दल गौरविण्यात आले.

कन्याथॉनचे महत्त्वपूर्ण कामगिरी- पुणे (बुधवार पेठ) आणि मुंबई (कामाठीपुरा) येथील रेड लाईट एरियातील १५ मुलींच्या शिक्षणाला पाठिंबा- २० लाखांहून अधिक शिष्यवृत्ती प्रदान करून विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी सहाय्य - ५ कन्याथॉन शिक्षण केंद्रांद्वारे ३०० हून अधिक विद्यार्थ्यांना इंग्रजी आणि संगणक कौशल्यांचे प्रशिक्षण- अक्षय पात्र फाउंडेशनच्या सहकार्याने १ वर्षाच्या मध्यान्ह भोजनाचा पुरवठा विजयभुमी युनिव्हर्सिटीच्या कन्याथॉनला मिळालेला हा पुरस्कार टीम कन्याथॉनसाठी मोठी प्रेरणा असून, मुलींच्या सक्षमीकरणासाठी काम सुरुच राहील असे विजयभूमी युनिव्हर्सिटी जांबरुख च्या संचालिका कल्पना पडोदे यांनी मत व्यक्त केले आहे.

## ग्रुप ग्रामपंचायत, पाथरज
**ता. कर्जत, जि. रायगड.**

जावक क्र. दिनांक : १२/१२/२०२४

**जाहिरात**

ग्रुप ग्राम पंचायत पाथरज ता. कर्जत जि. रायगड दिनांक:-१३/१/२०२४

ग्रुप ग्रामपंचायत पाथरज ता.कर्जत जि.रायगड येथील १५ वा वित्त आयोग व ग्रामनिधी असलेल्या खालील विकास कामाकरिता इच्छुक नोंदणीकृत ठेकेदारांकडून लिफाफा पद्धतीने मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा भरण्याची तारीख | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | नागेवाडी समाजमंदिरासमोर शेड करणे | २५०००० | १३/१२/२४ ते २०/१२/२४ | सकाळी ११ ते सायं.६.१५ पर्यंत |
| २ | जांभूळवाडी समाजमंदिर दुरुस्ती करणे | २००००० | १३/१२/२४ ते २०/१२/२४ | सकाळी ११ ते सायं. ६.१५ पर्यंत |
| ३ | धोत्रेवाडी अंतर्गत रस्ता करणे | ३००००० | १३/१२/२४ ते २०/१२/२४ | सकाळी ११ ते सायं. ६.१५ पर्यंत |
| ४ | मोरेवाडी अंतर्गत रस्ता करणे | २००००० | १३/१२/२४ ते २०/१२/२४ | सकाळी ११ ते सायं.६.१५ पर्यंत |
| ५ | शिलारवाडी व्यायाम शाळा दुरुस्ती करणे | २००००० | १३/१२/२४ ते २०/१२/२४ | सकाळी ११ ते सायं.६.१५ पर्यंत |
| ६ | जळकटवाडी दफनभूमीकडे जाणारा रस्ता तयार करणे | २००००० | १३/१२/२४ ते २०/१२/२४ | सकाळी ११ ते सायं. ६.१५ पर्यंत |
| ७ | खोंडेवाडी समाजमंदिर दुरुस्ती करणे | २००००० | १३/१२/२४ ते २०/१२/२४ | सकाळी ११ ते सायं. ६.१५ पर्यंत |
| ८ | बोरवाडी समाजमंदिर दुरुस्ती करणे | २००००० | १३/१२/२४ ते २०/१२/२४ | सकाळी ११ ते सायं. ६.१५ पर्यंत |
| ९ | खरबाचीवाडी समाजमंदिर दुरुस्ती करणे | २००००० | १३/१२/२४ ते २०/१२/२४ | सकाळी ११ ते सायं. ६.१५ पर्यंत |
| १० | लोभेवाडी विहिरीकडे जाणारा रस्ता तयार करणे | २००००० | १३/१२/२४ ते २०/१२/२४ | सकाळी ११ ते सायं. ६.१५ पर्यंत |
| ११ | पाथरज शाळा दुरुस्ती करणे | २००००० | १३/१२/२४ ते २०/१२/२४ | सकाळी ११ ते सायं. ६.१५ पर्यंत |
| १२ | खोंडेवाडी शाळेला ग्रिल बसविणे/ दुरुस्ती | २००००० | १३/१२/२४ ते २०/१२/२४ | सकाळी ११ ते सायं. ६.१५ पर्यंत |
| १३ | मार्गाचीवाडी अंतर्गत रस्ता करणे | २००००० | १३/१२/२४ ते २०/१२/२४ | सकाळी ११ ते सायं. ६.१५ पर्यंत |
| १४ | ताडवाडी समाजमंदिर दुरुस्ती करणे | २००००० | १३/१२/२४ ते २०/१२/२४ | सकाळी ११ ते सायं. ६.१५ पर्यंत |
| १५ | पाथरज व्यायाम शाळा दुरुस्ती करणे | २००००० | १३/१२/२४ ते २०/१२/२४ | सकाळी ११ ते सायं. ६.१५ पर्यंत |
| १६ | किकवी अंतर्गत रस्ता करणे | २००००० | १३/१२/२४ ते २०/१२/२४ | सकाळी ११ ते सायं. ६.१५ पर्यंत |
| १७ | जांभूळवाडी व्यायाम शाळा दुरुस्ती करणे | २००००० | १३/१२/२४ ते २०/१२/२४ | सकाळी ११ ते सायं. ६.१५ पर्यंत |
| १८ | डोंगरपाडा अंतर्गत रस्ता करणे | २००००० | १३/१२/२४ ते २०/१२/२४ | सकाळी ११ ते सायं. ६.१५ पर्यंत |
| १९ | नागेवाडी अंतर्गत रस्ता करणे | २००००० | १३/१२/२४ ते २०/१२/२४ | सकाळी ११ ते सायं. ६.१५ पर्यंत |
| २० | शिलार विहिरीकडे जाणारा रस्ता तयार करणे | २००००० | १३/१२/२४ ते २०/१२/२४ | सकाळी ११ ते सायं. ६.१५ पर्यंत |
| २१ | लोभेवाडी सार्वजनिक शौचालय दुरुस्त करणे | ९०००० | १३/१२/२४ ते २०/१२/२४ | सकाळी ११ ते सायं. ६.१५ पर्यंत |
| २२ | ताडवाडी सार्वजनिक शौचालय बांधणे | ९०००० | १३/१२/२४ ते २०/१२/२४ | सकाळी ११ ते सायं. ६.१५ पर्यंत |
| २३ | पाथरज सार्वजनिक शौचालय बांधणे | ३००००० | १३/१२/२४ ते २०/१२/२४ | सकाळी ११ ते सायं. ६.१५ पर्यंत |
| २४ | धोत्रे गाव अंतर्गत गटारे करणे | १६५००० | १३/१२/२४ ते २०/१२/२४ | सकाळी ११ ते सायं. ६.१५ पर्यंत |
| २५ | कंपोस्ट खड्डे करणे किकवी, पाथरज मार्गाचीवाडी, जांभूळवाडी | १६०००० | १३/१२/२४ ते २०/१२/२४ | सकाळी ११ ते सायं. ६.१५ पर्यंत |
| २६ | धोत्रेवाडी शाळेला तार कंपाउंड करणे | ३००००० | १३/१२/२४ ते २०/१२/२४ | सकाळी ११ ते सायं. ६.१५ पर्यंत |
| २७ | ताडवाडी शाळेकडे जाणारा रस्ता तयार करणे | १००००० | १३/१२/२४ ते २०/१२/२४ | सकाळी ११ ते सायं. ६.१५ पर्यंत |
| २८ | शिलार राजिप शाळेला फरशी बसविणे | १५०००० | १३/१२/२४ ते २०/१२/२४ | सकाळी ११ ते सायं. ६.१५ पर्यंत |
| २९ | किकवी शाळेला फ्लोरिंग करणे | २५०००० | १३/१२/२४ ते २०/१२/२४ | सकाळी ११ ते सायं. ६.१५ पर्यंत |

**अटी व शर्ती**

१ प्राप्त निविदा उघडण्याची दिनांक :- २१/१२/२०२४ रोजी
२. विकास कामांचे अंदाजपत्रक पाहण्यासाठी ग्रा.पं. कार्यालयात उपलब्ध आहेत.
३. नोंदणीकृत ठेकेदाराना प्राधान्य देण्यात येईल.
४. प्रत्येक देयकातून शासन निर्णया प्रमाणे कपात केली जाईल.
५. कोणतीही निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा आधिकार ग्रा. प. पाथरज यांचेकडे राहील.
६. काम झाले नंतर निधी उपलब्धतेनुसार अदा करण्यात येईल.

सही/-
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत पाथरज**
**ता. कर्जत जि. रायगड**

पान १ वरून

## २२ फेब्रुवारीला होणार आंगणेवाडीची जत्रा

मसुरे गाव येथील आंगणेवाडी या वाडीतील आंगणे कुटुंबीयांची भराडी देवी आहे. आंगणे कुटुंबियांची खासगी देवी असा फलकही या मंदिरावर लावण्यात आलेला आहे. असा फलक असला तरी देवीचे दर्शन सर्वांसाठी खुले आहे. कोकणातील भाविकांची देवीवर श्रद्धा आहे. आंगणे कुटुंबियांचे मंदिर असले तरी ते आता संपूर्ण कोकणाचे झाले आहे. भाविक येथे नवस बोलतात, तो पूर्ण होत असल्याची त्यांची श्रद्धा आहे.

भराडी देवी यात्रेची तारीख ही देवीचा कौल घेऊन ठरवली जाते. भराडी देवीच्या नावाचीही अख्यायिका आहे. भराडावर म्हणजेच माळरानावर देवी साक्षात प्रकट झाल्याचे मानले जाते. त्यामुळे या देवीला भराडी देवी हे नाव पडलेले आहे. आंगणेवाडीची यात्रा आता कोकणवासीयांची जत्रा झाली आहे. मुंबईतील चाकरमानीही या यात्रेसाठी नित्यनेमाने येत असतात. दरवर्षी सुमारे ७ ते ८ लाख भाविक भराडी देवीच्या दर्शनासाठी केवळ दीड दिवसांच्या जत्रेमध्ये सहभागी होतात. आंगणेवाडीच्या भराडी देवीचा नैवेद्य खास असतो. आंगणे कुटुंबियांच्या माहेरवाशिणी तो अबोल राहून करतात. या जत्रेमध्ये सहभागी झालेल्या प्रत्येक भाविकाला त्याचा लाभ घेता येतो.

## मंत्रिपदाचा फार्म्युला ठरला?

भाजपकडे गृह विभाग, नगर विकास, कायदा, सामान्य प्रशासन, ग्रामीण विकास, ऊर्जा, सार्वजनिक बांधकाम, पर्यावरण, वन, आदिवासी हे विभाग येऊ शकतात. तसेच शिवसेनेकडे सार्वजनिक बांधकाम, कामगार, शालेय शिक्षण, राज्य उत्पादन शुल्क, पाणी पुरवठा आणि स्वच्छता, वाहतूक तर अजित पवारांच्या राष्ट्रवादीकडे वित्त व नियोजन, गृहनिर्माण, वैद्यकीय शिक्षण, अन्न व नागरी पुरवठा, महिला व बालकल्याण, मदत व पुनर्वसन, अन्न व औषध प्रशासन हे विभाग येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

भाजपला २०, एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला १२ आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला १० मंत्रीपदे दिली जाणार आहेत. गृहमंत्री अमित शहा यांच्यासोबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या बैठकीत हा फॉर्म्युला ठरल्याची माहिती सूत्रांनी दिली. महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात मुख्यमंत्र्यांसह जास्तीत जास्त ४३ मंत्री असू शकतात.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आपल्या पहिल्या मंत्रिमंडळाचा विस्तार १४ डिसेंबर रोजी करणार असल्याचे सांगितले जात आहे. त्यानंतर १६ डिसेंबरपासून राज्याचे हिवाळी अधिवेशन नागपुरात सुरु होत आहे. यामुळे त्यापूर्वी मंत्रिमंडळाचा विस्तार केला जाणार आहे. शिंदे सेनेकडून अडीच-अडीच वर्ष मंत्रिपद असे सूत्र ठरल्याचे सांगितले जात आहे.

## सर्वसामान्यांचे हाल, ठेकेदार मालामाल

माहितीनुसार नगर रचना आणि मूल्य निर्धारण विभाग रायगड अलिबाग यांनी त्यांच्या दि. २० डिसेंबर २०१४ च्या तहसिलदार अलिबाग यांना दिलेल्या अहवालामध्ये मिळकतखार येथील भराव हा अनधिकृतपणे केला असल्याचे निर्देशनास आणले होते. या भरावामुळे सीआरझेडचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आले आहे, असे नमूद केले आहे. असे असतानाही पुन्हा या जागेत अनधिकृत भराव करून सीआरझेड व पर्यावरण कायद्याचे उल्लंघन केल्याप्रकरणी प्रकल्प व्यवस्थापनासोबतच जबाबदार महसूल अधिकाऱ्यांवरही गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी संजय सावंत यांनी कोकण आयुक्तांकडे केली होती.

## तहसिलदारांच्या आदेशाकडे कानाडोळा?

**गेले सहा दिवस तहसिलदार विक्रांत पाटील सारळ मंडळ अधिकारी नलिनी पाटील यांना जागेवर जाऊन पाहणी करण्याचे आदेश दिले असल्याचे सांगत आहेत. मात्र अद्याप पाटील यांनी कोणताही अहवाल सादर केला नाही. यावरुन तहसिलदारांच्या आदेशाला नलिनी पाटील यांनी केराची टोपली दाखवली असल्याचे दिसून येत आहे.**

## गोगावलेंचा सर्वसामान्यांना दणका

दिले आहेत. भंडारा विभागातील अपघात आणि कुर्ला बस अपघाताच्या धर्तीवर एसटी महामंडळाचे अध्यक्ष भरत गोगावले यांनी मुंबई सेंट्रलमधील महाराष्ट्र वाहतूक भवन येथे तातडीची बैठक बोलावली होती. यात बस पुरवठादारांसह एसटीचे वरिष्ठ अधिकारी तसेच महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर व एसटीचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. एसटी अपघात रोखण्यासाठी चालकांचे प्रशिक्षण, मानसिक आरोग्य आणि वाहनांचे तांत्रिक निर्दोषत्व या त्रिसूत्रीवर भर देणार असल्याचे अध्यक्ष भरत गोगावले यांनी सांगितले

दररोज ५५ लाख प्रवाशांना सुरक्षित सेवा देण्याच्या उददेशाने एसटी महामंडळ गेली ७६ वर्ष काम करीत आहे. रस्त्यावरील अपघात कमी करण्यासाठी चालकांचे सुयोग्य प्रशिक्षण, त्यांचे मानसिक आरोग्य सुदृढ करणे या बरोबरच तांत्रिकदृष्ट्या निर्दोष बसेस उपलब्ध करुन देणे या त्रिसुत्रीवर यापुढे भर देण्यात येत असून, प्रवाशांची सुरक्षितता हेच एसटीचे अंतिम ध्येय राहील असे प्रतिपादन एसटीचे अध्यक्ष आमदार भरत गोगावले यांनी केले.

सध्या एसटी महामंडळाच्या चालकांना अपघात होऊ नये यासाठी दर ६ महिन्याला उजळणी प्रशिक्षण दिले जाते. या प्रशिक्षणामध्ये चालकांच्या मानसिक आरोग्याबरोबरच त्यांचे बस चालवण्याचे कौशल्य विकसित करण्यावर भर दिला जातो. त्यानंतर प्रत्यक्ष वाहन चालन चाचणी घेऊन त्यांना पुनःश्च सेवेमध्ये दाखल केले जाते. तसेच कर्तव्यावर असताना संबंधित चालकाने नशापान न करणे याचे काटेकोर पालन केले पाहिजे. हिच पध्दत एसटीकडे कार्यरत असलेल्या खाजगी चालकांना देखिल वापरण्याच्या सूचना अध्यक्ष गोगावले यांनी एसटी प्रशासनाला दिल्या.

## ऋषिकेश तायडे यांचा शेकापमध्ये प्रवेश

तरुण आणि सशक्त नेतृत्वाची गरज असल्याचे अधोरेखित केले. त्यांनी ऋषिकेश तायडे यांच्या कार्यक्षमतेवर विश्वास ठेवत त्यांच्या नेतृत्वाखाली पक्ष अधिक बळकट होईल आणि त्याचा विस्तार होईल, असा विश्वास व्यक्त केला. यावेळी तायडे यांनी पक्षनेतृत्वाचे आभार मानले आणि आपल्यावर टाकलेल्या विश्वासाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. त्यांनी भारतीय शेतकरी कामगार पक्षाच्या मूल्यांना प्रामाणिकपणे जपत ठाणे शहरातील लोकांची निःस्वार्थ सेवा करण्याचा दृढनिश्चय व्यक्त केला.

## शिक्षिकेकडून विद्यार्थ्याला अमानुष मारहाण

दिवशी आंघोळीला घेउन गेले असता त्यांच्या लक्षात आले की, आपल्या मुलाच्या अंगावर मारायचे वळ (डाग) आहेत. तेव्हा मात्र पिडीत विद्यार्थ्याचे वडील व आई यांनी कारमेल हायस्कूल गाठले. महत्त्वाची बाब म्हणजे पिडीत विद्यार्थ्याची आईसुध्दा एक शिक्षिका आहे. त्यामुळे तिला माहित आहे की, शिक्षकांनी विद्यार्थ्यांशी कसे वागायचे, कसे बोलायचे. मात्र आपल्या मुलाच्या शरिरावरील मारण्याच्या खुणा पाहुन पीडित विद्यार्थ्याची आई अवाक झाली. हे सर्व होऊनही कारमेल हायस्कूल प्रशासन अरेरावी करण्यात कमी पडले नाही. पीडित मुलाच्या आई-वडिलांवर दबाव टाकण्यासाठी काही राजकीय मंडळींना पाचारण केले. तेव्हा मात्र पीडित विद्यार्थ्याच्या आई-वडिलांनी रौद्ररूप दाखवले. तेव्हा राजकीय मंडळींनीदेखील काढता पाय घेतला.

पीडित विद्यार्थ्याचे वडील हे मोठे उद्योजक असून आई शिक्षिका आहे तर आजोबा हे एके काळचे पेण तालुक्यातील राजकारणातील बडे नेते म्हणून ओळखले जायचे. ही सर्व पार्श्वभूमी पाहिल्यावर राजकीय मंडळींना शाळेच्या बाजूने धावत येणे महागात पडेल, याची जाणीव झाली. त्यानंतर पोलिसांनी हस्तक्षेप करून सर्व प्रकार पोलीस ठाण्यात नेला. तेव्हा पोलीस निरिक्षक संदीप बागूल यांनी दोन्ही बाजू ऐकून पीडित मुलाच्या पालकांना सांगितले की, आपण ज्याप्रमाणे निर्णय घेणार त्याप्रमाणे आम्ही कायदेशीर कारवाई करू. अखेर पीडित मुलाच्या आई-वडिलांनी माणुसकी दाखवित शिक्षिकेकडून माफीनामा लिहून घेतला आणि प्रकरण मिटविले.

## चौल यात्रेच्या सुरक्षेसाठी पोलीस सज्ज

लाखो पर्यटक व भाविक दर्शनासाठी येणार आहेत. खाद्य पदार्थांपासून घरगुती, खेळाच्या साहित्यांची दुकाने या यात्रेत उभारण्यात येणार आहेत.

मागील दोन वर्षापूर्वी दत्तमंदिरातील चांदीचे प्रभावळ चोरीला गेले होते. त्याचा तपास अद्याप लागला नाही. त्यामुळे यंदा यात्रेमध्ये पोलिसांनी अधिक सर्तकता राखण्यासाठी वेगवेगळ्या उपाययोजना सुरु केल्या आहेत. चोरट्यांवर नजर ठेवण्यासाठी टेहळणी कक्ष व पोलीस मदत कक्ष बांधण्यात येणार आहे. प्रवेशद्वारापासून मंदिरापर्यंत अशा अनेक ठिकाणी पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. एकूण ८० पोलीस त्याठिकाणी नेमण्यात आले आहेत. त्यामध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांचा समावेश असणार आहे.

गर्दीमध्ये महिलांची छेडछाड करणाऱ्यांवर लक्ष ठेवण्यासाठी महिला छेडछाड विरोधी पथक नेमण्यात आले आहे. २४ तास ही यंत्रणा तैनात राहणार असल्याची माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत किरवले यांनी दिली.

**दर पाऊण तासाने एसटी बस**

चौल- भोवाळेमधील यात्रेला सुरुवात होत आहे. भाविकांना यात्रेबरोबरच दर्शनासाठी वेळेवर पोहचता यावे, यासाठी अलिबाग एसटी बस आगारामार्फत जादा एसटी बस फेरीची व्यवस्था करण्यात आली आहे. चौल यात्रा स्पेशल या बसेस सुरु करण्यात येणार आहेत. दर पाऊण तासाने बसेस सोडण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यात्रेमध्ये एसटी महामंडळाचे कक्ष असून त्या ठिकाणी कर्मचारी तैनात केले जाणार असल्याची माहिती आगार व्यवस्थापक राकेश देवरे यांनी दिली.

**निवडक**

## सोनसाखळी चोराला अटक

**पनवेल :** सुनील देशी बार जवळील कट्ट्यावर एक व्यक्ती झोपला असताना कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांच्या गळ्यातील तीन तोळे वजनाच्या ज्याची किंमत १ लाख २० हजार रुपये इतकी असलेल्या सोन्याची चैनी चोरुन नेल्याची तक्रार नेरुळ पोलीस ठाण्यात करण्यात आली होती. त्या तक्रारीच्या आधारे समांतर तपास गुन्हे शाखा कक्ष पनवेलचे वपोनि उमेश गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली तांत्रिक तपासाच्या आधारे या गुन्ह्यातील आरोपीचा शोध घेत आरोपी शेखर हटकर (२६) याला ताब्यात घेण्यात आले आहे.

## अनधिकृत बांधकामावर कारवाई

**पनवेल :** पालिकेच्या अतिक्रमण विभागाच्यावतीने कळंबोली गावातील परडी येथील आरसीसी अनधिकृत बांधकामांवर आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानूसार बुधवारी (दि.११) अतिक्रमणावर तोडक कारवाई करण्यात आली. यावेळी उपायुक्त रविकिरण घोडके, सहाय्यक आयुक्त श्रीराम पवार, सहाय्यक आयुक्त सुबोध ठाणेकर, अतिक्रमण विभाग प्रमुख सदाशिव कवठे, प्रभारी अधिक्षक अरविंद पाटील, कळंबोली प्रभागातील अतिक्रमण विभागाचे कर्मचारी उपस्थित होते. तसेच, पोलीस विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

## फसवणूक करणाऱ्यांना अटक

**पनवेल :** बनावट जॉब ऑफर लेटर आणि जॉईन लेटर बनवून खोटे शिक्के मारून २ कोटी ७१ लाख ५० हजारांची फसवणूक करणाऱ्या दोन आरोपींना पनवेल शहर पोलिसांनी घणसोली येथून अटक केली आहे. सौनक भास्कर चौधरी आणि आरुषी दोशी अशी दोघांची नावे आहेत. यातील एक आरोपी फरार असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. शंतनु म्हात्रे हे करावे गाव येथे राहत असून आरोपी सौनक चौधरी याची पत्नी आरुषी दोशी आणि वडील भास्कर चौधरी यांनी संगणमताने ही फसवणूक केली आहे.

## १४ डंपर चालकांवर कारवाई

**पनवेल :** उलवेमधील सिडकोच्या मोकळ्या जागेत अनधिकृतपणे डेब्रीज टाकण्यासाठी आलेले १४ डंपर सिडकोच्या पथकाने वाहतूक पोलिसांच्या मदतीने पकडले आहेत. या कारवाईत पोलिसांनी सर्व डंपर जप्त करुन सर्व डंपर चालकांना ताब्यात घेतले आहे. हे डंपर चालक मुंबईतील डेब्रीज उलवेमध्ये मोकळ्या जागेत टाकण्यासाठी आल्याचे त्यांच्या चौकशीत आढळून आले आहे. पोलिसांनी आता हे डेब्रीज टाकण्यास सांगणाऱ्या डेब्रीज माफियांचा शोध सुरु केला आहे.

## टोल नाक्यावरील स्वच्छतागृह बंद

**पनवेल :** सायन पनवेल महामार्गावरील खारघर टोल नाक्यावर स्वच्छतागृह उभारण्यात आले आहे. या स्वच्छतागृहाची दुरवस्था झाल्यामुळे ६ महिन्यांपूर्वी स्वच्छतागृहाच्या नुतनीकरणाचे काम हाती घेण्यात आल्यामुळे स्वच्छतागृह बंद ठेवण्यात आले होते. पुणे येथून येताना खालापूर नंतर खारघर येथे टोलनाका असल्यामुळे बहुतांशी प्रवाशी लघुशंकेसाठी टोलनाक्यावर थांबतात. मात्र, नुतनीकरणाचे काम पूर्ण होऊन जवळपास ३ महिने झाल्यानंतरही स्वच्छतागृह बंद असल्यामुळे प्रवाशांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे.

# प्रकाशमय परिसर ठेवण्यात प्रशासनाला अपयश

## लाखो रुपये खर्चूनही चारफाटा चौक अंधारातच

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

मुंबई-पुणे भागातून येणाऱ्या पर्यटकांचे कर्जत तालुक्यात आल्यावर पहिले चारफाटा हे महत्वाचे ठिकाण आहे. मात्र, हाच चारफाटा हुतात्मा भाई कोतवाल चौक गेली अनेक महिने रात्रीच्या वेळी अंधारात असतो. शासनाने कर्जत चारफाटा चौक येथे परिसर उजळण्यासाठी हायमास्ट बसविला आहे, मात्र तेथे वीज पुरवठा केल्यानांतर येणारे विजेचे बिल कोण भरणार, असा प्रश्न असल्याने वीज पुरवठ्याविना तो हायमास्ट बंद अवस्थेत आहेत.



कर्जत तालुक्यात येणाऱ्या पर्यटकांची संख्या दररोज वाढत आहे. पूर्वी फक्त माथेरान या पर्यटन स्थळी जाण्यासाठी पर्यटक येथे येत होते. मात्र, गेल्या चार-पाच वर्षात पर्यटक साप्ताहिक सुट्ट्यांशिवाय इतर दिवशी देखील कर्जत तालुक्यात येऊ लागले आहे. शनिवार-रविवार या दोन दिवशी मुंबई-पुणेकडून येणाऱ्या पर्यटकांमुळे कर्जत तालुक्यातील चारफाटा हे ठिकाण वाहतूक कोंडीचे हॉटस्पॉट बनला आहे. याच चारफाटा येथून कर्जत शहरात, माथेरान-नेरळकडे तसेच कर्जत स्टेशन आणि मुरबाडकडे रस्ता जातो. त्यामुळे या चौकात वाहनांची कायम वर्दळ असते. मात्र, याच चारफाटा येथे रात्रीच्या वेळी लक्ष प्रकाशमय परिसर ठेवण्यात प्रशासनाला अपयश आले आहे.

कर्जत चारफाटा येथे शासनाच्या माध्यमातून लाखो रुपये खर्चून उभा करण्यात आलेले विजेचा हायमास्ट बंद अवस्थेत आहे. कर्जत चारफाटा येथे कर्जत नगरपरिषदेची हद्द संपते आणि पुढे दोन बाजूला हालिवली ग्रामपंचायतीची हद्द तर एका त्रिकोणातील भाग हा कर्जत नगरपरिषद हद्दीत येतो. यामुळे त्या पथदिव्यांवरील दिवे उजळण्यासाठी वीज कोणी द्यायची आणि त्या विजेच्या बिलाची रक्कम कोणी भरायची, हा प्रश्न समोर आला आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामधून या हायमास्ट दिव्याची उभारणी करण्यात आली आहे. मात्र, हा हायमास्ट ज्या ठिकाणी बसवलेला आहे ती जागा हलवली ग्रामपंचायतीची हद्दीतील आहे. हालिवली हि एका गावाची ग्रामपंचायत असल्याने या ग्रामपंचायतीचे महसुली उत्पन्न अत्यंत अल्प आहे. त्यामुळे चारफाटा येथील विजेच्या दिव्याचे बिल भरण्याची आर्थिक स्थिती नसल्याने हालिवली ग्रामपंचायतीने त्या हायमास्टवरील दिव्याचे बिल भरण्यास असमर्थता दर्शवली आहे. त्यामुळे चारफाटा चौकातील हायमास्ट हे बंद अवस्थेत आहे.

> **कर्जत पालिका एखादा हायमास्ट उभा करते आणि त्याला वीज पुरवठा करण्याची जबाबदारी दुसऱ्यावर ढकलत नसल्याने पालिकेने आपली जबाबदारी समजून त्या हायमास्टसाठी विजेची सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी आहे. पालिकेने तो हायमास्ट उभारताना आपल्या हद्दीत उभारला असता तर विजेच्या बिलाचा प्रश्न आला नसता आणि त्यामुळे पालिकेने तो हायमास्ट तेथून काढून आपल्या हद्दीत उभा करावा.**
> **- गुरुनाथ पालकर, माजी नगरसेवक**

> **आमच्या ग्रामपंचायतीची लोकसंख्या आणि उत्पन्न पाहिले तर ग्रामपंचायतीमधील कर्मचाऱ्यांना महिना पगार कसा द्यायचा, असा प्रश्न असतो. यातच कर्जत पालिकेने त्या विजेच्या दिव्याचे वीज बिल भरण्यासाठी हालिवली ग्रामपंचायतीला सांगितले होते. मात्र, कर्जत नगरपरिषद सक्षम असून त्यांनीच हे बिल भरायला हवे.**
> **- सुरेश बोराडे, ग्रामस्थ, हालीवली**

# घरपट्टी थकीत ठेवणाऱ्यांना नोटिसा

**। नेरळ । प्रतिनिधी ।**



### पाणीपट्टीत वाढ होण्याची शक्यता

**नेरळ ग्रामपंचायतीतील पाणीपट्टीत वाढ होण्याची शक्यता असून रायगड जिल्हा परिषदेकडून तसे विचार सुरु आहेत. सध्या ग्रामपंचायतीत प्रशासकीय राजवट असल्याने राजिपचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून घरपट्टीबद्दल आढावा घेतला जात आहे. नेरळमध्ये ५ हजार ५०० पाणीपट्टी ग्राहक असून १०० ते २००च्या आसपास पाणीपट्टी एका कुटुंबाला आकारली जाते. त्यात नेरळ ग्रामपंचायतीतील पाणी हे जलशुद्धीकरण प्रकल्पामधून शुद्ध करून वितरित केले जाते. असे असताना देखील येथील पाणीपट्टी कमी आहे. त्यामुळे पाणीपट्टीत वाढ केल्यास पंचायतीतील महसुल वाढ होण्यास मदत होणार असल्याचे बोलले जात आहे.**

रायगड जिल्ह्यातील मोठ्या समजल्या जाणाऱ्या नेरळ ग्रामपंचायतीमधील महसूल वाढीचे उद्दिष्ट राहिले असल्याचे दिसून येत आहे. या ग्रामपंचायतीकडून घरपट्टी वसुलीसाठीथकबाकीदारांनानोटिसा पाठवण्यास सुरुवात केली आहे. तसेच, नेरळ ग्रामपंचायतीमधील पाणीपट्टी आकारणी हि आजुबाजुंच्या ग्रामपंचायती पेक्षा निम्मी असून भविष्यात पाणीपट्टीत वाढ होण्याची शक्यता आहे.

नेरळ, आनंदवाडी, जुम्मापट्टी अशी तीन महसुली गावे नेरळ ग्रामपंचायतीत असून ६ आदिवासी वाड्यांचा समावेश आहे. तसेच, येथील लोकसंख्या आता ३० हजार पार गेली आहे. मात्र, तरीदेखील या ग्रामपंचायतीतील आर्थिक उत्पन्नांचे गणित जुळत नसल्याने राजिप असमाधानी आहे. नेरळ गावात साधारण १४ हजार मालमत्ता धारक असून त्यांच्याकडून साधारण अडीच कोटींचा महसूल वर्षाला जमा झाला पाहिजे. मात्र, काही ठराविक मालमत्ताधारक हे अनेक वर्षे मालमत्ता कर भरत नसल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे नेरळ ग्रामपंचायतीतून महसूल संकलन हे ७५ ते ८० टक्के यापुढे कधीही गेले नाही. त्यामुळे या ग्रामपंचायतीतील घरपट्टी सतत थकीत ठेवणाऱ्या २ हजार मालमत्ताधारकांना ग्रामपंचायतीकडून नोटिसा देण्यात आल्या आहेत.

# चक्री जुगाराला परवानगी देऊ नये

## उरणच्या महिला वर्गाची मागणी

**। उरण । वार्ताहर ।**

उरण तालुक्यात यात्रा, क्रिकेट व इतर खेळांचा हंगाम सुरू झाल्याने मोठ्या प्रमाणात चक्रीच्या जुगाराचे डाव रंगण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. तरी या चक्रीच्या जुगारांना पोलिसांनी परवानगी देऊ नये, अशी मागणी महिला वर्गाकडून जोर धरू लागली आहे.



उरण तालुक्यातील गावोगावच्या यात्रांचा हंगाम सुरू होत आहे. त्याच बरोबर नाईट क्रिकेट व इतर खेळांचे सामने देखील मोठ्या प्रमाणात तीनही पोलीस ठाण्याच्या हद्दीत संपन्न होत असतात. यादरम्यान, चक्रीच्या जुगाराचा डाव मोठ्या प्रमाणात सुरू असल्याचे चित्र पहायला मिळते. यामुळे अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत.

दोन दिवसांवर उरण शहरातील दत्त जयंतीची यात्रा संपन्न होणार आहे. यावेळी शहरातील काही ठिकाणी चक्रीचा जुगाराचा डाव रंगणार आहे. त्यानंतर यात्रा व क्रिकेट सामने सुरू होतील. त्यावेळीही चक्रीचा जुगार मोठ्या प्रमाणात सुरू असतो. चक्रीचा जुगार हा रात्रीच्या वेळेस कुठल्या तरी कोपऱ्यात सुरू असतो. त्यावेळी चक्रीचा जुगारवाले आम्हांला परवानगी दिली असल्याचे खोटेनाटे सांगून वेळ मारून नेत असतात. तरी, उरणमधील तीनही पोलीस ठाण्याने अशा चक्रीच्या जुगारांना परवानगी देऊ नये, अशी मागणी महिला वर्गांनी मुख्यमंत्री व गृहमंत्र्यांकडे केली आहे.

# उपसरपंचपदी नेहा सावंत यांची निवड



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील नसरापूर ग्रुपग्रामपंचायतचे रिक्त असलेल्या उपसरपंचपदी नेहा सावंत यांची बिनविरोध निवड झाली आहे. नेहा सावंत या शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाच्या कार्यकर्त्या असून श्वेता हडप यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त पदासाठी निवडणूक घेण्यात आली होती.

नसरापूर ग्रुप ग्रामपंचायतचे उपसरपंच श्वेता हडप यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला होता. त्यामुळे रिक्त असलेल्या उपसरपंच या पदासाठी थेट सरपंच आणि पिठासिन अधिकारी जयवंती कोळंबे यांच्या अध्यक्षतेखाली निवडणूक घेण्यात आली. नेहा सावंत यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने उपसरपंचपदी त्यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

# पोस्ट कार्यालयाची स्थिती बिकट

**। चाणजे । वार्ताहर ।**

पोस्टखाते देशाच्या विकासाला बळकटी देणारे अत्यावश्यक खाते आहे. यामुळे पोस्टाचे कामकाज सुरक्षित व स्तुस्थितीत असलेल्या जागेत असायला पाहिजे. मात्र, स्वातंत्र्य मिळून ७७ वर्षे झाली तरी देखील उरण तालुक्यातील पोस्ट कार्यालयासाठी इमारत नाही. यामुळे आजपर्यंत पोस्टाचे कामकाज भाड्याच्या तेही मोडकळीस आलेल्या धोकादायक जागेत होत आहे. त्यामुळे येथील कर्मचारी व पोस्टात येणाऱ्या लोकांच्या जीवाला धोका होण्याची भीती आहे. सरकारने उरण पोस्ट कार्यालयाच्या जागेची पाहणी करून, उरणच्या शेकापच्या महिला आघाडीच्या अध्यक्षा सीमा घरत यांनी सुचित केल्यानुसार उरण पोस्ट कार्यालयासाठी स्वत:च्या मालकीची इमारत उभी करावी, अशी मागणी उरणवासीयांनी केली आहे.

# आशा सिंघानिया यांना राज्यस्तरीय पुरस्कार

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अर्चना ट्रस्ट मुंबई या सामाजिक संस्थेच्या संस्थापक ट्रस्टी आशा सिंघानिया यांना सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल राज्यस्तरीय अनुभूती जनसेवा सन्मान पुरस्कार जाहीर झाला आहे. टी.एम. जी. क्रिएशन्स आणि इनोव्हेटिव्ह मानबिंदू प्रकाशन या नामांकित संस्थेच्या संयुक्त विद्यमाने हा सन्मान सोहळा रविवारी (दि.२९) मुंबई येथे आयोजित करण्यात आला आहे.



आशा सिंघानिया यांनी १९८३ पासून अर्चना ट्रस्टच्या माध्यमातून पनवेल तालुक्यातील विविध आदिवासी वाड्या वस्त्यांवर पक्की घरे, पाणी पुरवठा, समाजमंदिर, वीज जोडणी तसेच स्वयं रोजगारसाठी विविध साहित्य देऊन त्यांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावण्याचा प्रयत्न केला आहे. विशेष म्हणजे गेली तीस वर्ष गोरगरीब, निराधार आदिवासी मुलांच्या शिक्षणासाठी मोफत निवासी वसतिगृह त्या चालवीत आहेत. आदिवासी समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी, विविध प्रशिक्षण शिबीर, आरोग्य शिबीर, जाणीव जागृती अभियान तसेच शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी अर्चना ट्रस्टच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न करीत आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेत आशा सिंघानिया यांना राज्यस्तरिय पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

# रामकी कंपनी दुर्घटनेबाबत तातडीने कार्यवाही करा

## माजी आमदार बाळाराम पाटील यांचे निर्देश

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

तळोजा एमआयडीसी येथील रामकी कंपनीची भिंत काही दिवसांपूर्वी कोसळली होती. यासंदर्भात शेकापचे माजी आमदार बाळाराम पाटील यांनी पालिका आयुक्त मंगेश चितळे, कंपनीतील अधिकारी, प्रदूषण नियंत्रण मंडळ यांची बैठक आयोजित करून लवकरात लवकर कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.



यावेळी माजी नगरसेवक ज्ञानेश्वर पाटील, शेकाप पनवेल मनपा जिल्हा कार्यालयीन चिटणीस देवेंद्र मढवी, पनवेल महानगरपालिकेचे अधिकारी आदी उपस्थित होते. तळोजा एमआयडीसीसह मुंबई परिसरातील कंपन्यांच्या रासायनिक कचऱ्यावर प्रक्रिया करून विल्हेवाट लावण्याचे काम रामकी ग्रुपची मुंबई वेस्ट मॅनेजमेंट कंपनी करते. दोन वर्षापूर्वी येथील प्रदूषणामुळे त्रस्त असलेल्या नागरिकांनी कंपनीभोवती सुरू केलेल्या उंच सुरक्षा भिंतीला विरोध केला होता. यातच वर्षभरापूर्वी बांधण्यात आलेली भिंत गुरुवारी कोसळली होती. ही भिंत कोसळल्यामुळे ग्रामस्थ चिंतेत आहेत. यावेळी योग्य सूचना देऊन लवकर कार्यवाही करण्याचे निर्देश माजी आमदार बाळाराम पाटील यांनी दिले आहेत.

**शेकापचे माजी आ. बाळाराम पाटील यांनी पनवेल पालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांच्या दालनात कंपनीतील अधिकारी, प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि महानगरपालिकेचे अधिकारी यांच्यासोबत संयुक्त बैठक आयोजित केली होती.**





**भारती सोनोग्राफी सेंटर अलिबागच्यावतीने स्वर्गीय भारती विद्युत शहा यांच्या पुण्यतिथी निमित्त अलिबाग तालुक्यातील सागाव येथील राजिप शाळेत मंगळवारी (दि.१०) मोफत रक्तगट तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तगट तपासणी शिबिरात शाळेतील २६ विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.**

## शेतीच्या कामासाठी बैलगाडीचे मोठे योगदान

# वैरण साठविण्यासाठी शेतकऱ्यांची लगबग

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

**भात शेतीची कापणी झाल्यावर शेतकरी आपल्या शेतात मळणी उभी करुन झोडणी करीत असतात. मात्र, या पासून मिळालेला पेंढा सुरक्षितस्थळी ठेवण्यासाठी शेतकऱ्यांची मोठी धडपड सुरु आहे. पेंढा वाहनांतून वहातुक केल्यास खूप खर्च येत असतो. मात्र, एखाद्याकडे बैलगाडी असेल तर शेतीच्या कामासाठी त्यांचे मोठे योगदान ठरत असल्याचे मत राम जाधव या शेतकऱ्याने कृषीवलच्या प्रतिनिधी बोलताना व्यक्त केले आहे.**



गुरे म्हणजे संसाराला हातभार लावणारी पाळीव जनावरे, असा उल्लेख शेतकरी वर्ग करीत आहे. उन्हाळ्यात शेतकऱ्याचा जास्तीजास्त वेळ शेतकामे करण्यापेक्षा जास्त जनावरांना चारा उपलब्ध करण्यामध्येच जात आहे. पुर्वी शेतात अथवा मैदानात जनावरे चरायला सोडली तरीही त्यांच्या खाद्याचा प्रश्न मार्गी लागत असे. मात्र, आता वणवे, औद्योगिकरण, माती उत्खलन, वृक्ष तोड या सर्व कारणांमुळे पर्यावरणाचा समतोल ढासळत चालला आहे. त्यातच पाणी टंचाईची झळ निर्माण होत असल्याने शेतकरी मोठ्या अडचणीत सापडला आहे. वाढत्या महागाईमुळे गाय, म्हैस, बैल या जनावरांच्या खाद्याच्या किंमीत देखील मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून, शेतकऱ्यांना पशुधन सांभाळणे मोठ्या कष्टाचे होत आहे.

त्यामुळे ज्या शेतकरी वर्गाकडे पशुधनआहेतत्यांनात्यांचीचाऱ्याची व्यवस्था करताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. ग्रामीण भागात पावसाळ्यानंतर एक-दोन महिन्यांत जनावरांच्या वैरणीचा गंभीर प्रश्न असतो. कारण जंगलात पावसाळी निर्माण होणारा चारा उन्हाळी सुकल्यामुळे त्यांचे गवतात रुपांतर होते. परंतु, वणव्यामुळे सुकलेले गवत जळून खाक होते. यामुळे शेतकरी वर्गाकडे जनावरांच्या चाऱ्याची मोठी समस्या निर्माण होते. यामुळे भाताची झोडणी होताच वैरण साठविण्याची लगबग शेतकरी वर्गात सुरु आहे.

> **पुर्वी ग्रामीण भागात प्रत्येक शेतकरी वर्गाकडे बैलगाडी असायची. दळणवळण करण्यासाठी बैलगाडीचे मोठे योगदान होते. मात्र, शेती कमी झाल्यामुळे बैलगाडी कालबाह्य होत चालली आहे.**
> **- लक्ष्मण जाधव, बैलगाडी मालक, आंबिवली**

> **पुर्वी प्रत्येक घरासमोर बैलगाडी असायची. पावसाळा गेला की पुन्हा बैलगाडी रस्त्यावर दिसायची. मात्र, सध्या हे चित्र बदलत चालले आहे. आज आपल्याला बैलगाडी तुरळक प्रमाणात पहायला मिळत आहे. भविष्यात हीच बैलगाडी फक्त पुस्तकातच पहायला मिळेल का, अशी शंका निर्माण होत आहे.**
> **- राजेश पाटील, पर्यावरण प्रेमी**

# पेण रेल्वेस्थानकाला टीसीची गरज

**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण हे रायगड जिल्ह्यातील मध्यवर्ती ठिकाण असून कोकण रेल्वेच्या प्रवासातील देखील महत्त्वाचे ठिकाण मानले जाते. परंतु, आजच्या स्थितीला पेण रेल्वेसह स्थानकात कोणत्याच लांब पल्ल्यांच्या गाड्या थांबल्या जात नाहीत. यासाठी वेळोवेळी पेणकरांनी आंदोलने केली असून रेल्वे मंत्र्यांच्या दालनापर्यंत पेणकर पोहोचले आहेत. परंतु, आजही लांब पल्ल्याच्या गाड्या पेणला थांबवल्या जात नाहीत.





रेल्वे प्रशासनाकडून सांगण्यात आले की, रेल्वे स्थानकावरून प्रवासी जास्त प्रमाणात प्रवास करत नाही. त्यामुळे पेण येथे लांब पल्ल्याच्या गाड्या थांबवता येत नाहीत. तांत्रिक दृष्ट्या पाहिले तर रेल्वे प्रशासनाची ही बाब खरी आहे. कारण प्रत्यक्ष दृष्ट्या पेण रेल्वे स्थानकावरून मोठ्या प्रमाणात प्रवासी प्रवास करत असतात, परंतु रेल्वेच्या उत्पन्नात दिसून येत नाही. याचाच अर्थ मोठ्या प्रमाणात प्रवासी बिना तिकीट प्रवास करत आहेत. जर अशा प्रवाशांवर लगाम टकायची असेल तर पेण रेल्वे स्थानकात पुर्ण वेळ टीसीची गरज आहे. जे बिना तिकीट प्रवास करतात त्यांच्यावर कायदेशीर कारवाईसाठी पुर्ण वेळ टीसीची गरज आहे.

# अक्सीर शस्त्रक्रिया हवी

तमाम सर्व नेते राजकीय फाटाफुटी, चिखलफेक आणि निवडणुकांचा प्रचार यामध्ये अडकलेले असल्याने राज्यकारभार कसा रसातळाला गेला याचे उदाहरण समोर आले आहे. राज्यभरातील इस्पितळांमध्ये बनावट औषधांचा पुरवठा झाल्याचे हे प्रकरण आहे. बीडमधील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात पुरवलेल्या औषधांच्या नमुना परीक्षणात ती बोगस असल्याचे दिसून आले. त्याच दरम्यान नागपूर, वर्धा, भिवंडी अशा इतर ठिकाणच्या चाचण्यांमध्येही हेच आढळले. याच्या पोलिस तक्रारी दाखल झाल्या आहेत. काही कंपन्यांची नावे समोर आली आहेत. मात्र आता भंडाफोड झाल्याने केवळ वरवरची कारवाई होणार की या रॅकेटवर कायमची शस्त्रक्रिया करण्याची हिंमत दाखवली जाणार हा खरा प्रश्न आहे. आमचे राजकारण अजूनही मंत्रिपदांचे वाटप, कोणाला कोणते खाते, शिंदे-दादांचे काटशह आणि रुसवेफुगवे यांच्यामध्ये अडकलेले आहे. या स्थितीत प्रशासन नावाची चीज काही शिल्लक आहे का असाच प्रश्न आहे. नेत्यांचा सावळागोंधळ चालू असल्याचा फायदा घेऊन अधिकारी मंडळी हे प्रकरण दडपण्यासाठी प्रयत्न करण्याची दाट शक्यता आहे. यामध्ये काही राजकारणीही सामील असण्याची शक्यता आहे. शिवसेना ठाकरे गटाने गेल्या मंत्रिमंडळातले आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांच्यावर काही आरोप केले आहेत. या सर्वांना वाचवले जाणार की दोषींना कायमची जरब बसेल अशी शिक्षा होणार हा यातला कळीचा सवाल आहे. कारण, हा खरोखरीचा जगण्या-मरण्याचा मुद्दा आहे. ही बनावट औषधे घेऊन वाटेल ते दुष्परिणाम होऊ शकतात. कदाचित माणसे मरूही शिकतात. त्याविषयी आपण एक राज्य म्हणून संवेदना व कर्तव्यभावना दाखवणार की नाही हा तो मुद्दा आहे. बीडच्या रुग्णालयात खोकला, ताप, सर्दी, घसादुखी इत्यादींवर दिल्या जाणाऱ्या गोळ्या बनावट असल्याचे उघड झाले. गेल्या वर्षी मार्च ते मे मध्ये या औषधांचे नमुने घेतले गेले होते. त्यांच्या तपासणीचा अहवाल आता समोर आला.

## सरकारी रुग्णालयांना फटका

हा अहवाल समोर येण्यास इतका उशीर का झाला, अन्न व औषध प्रशासन विधानसभेच्या निवडणुका होईपर्यंत थांबले होते का यांची उत्तरेही या निमित्ताने मिळायला हवीत. प्राथमिक माहितीनुसार, उत्तर प्रदेश, उत्तराखंड व केरळ या राज्यातील कंपन्यांमार्फत ही औषधे पुरवल गेली होती. राज्यातील विविध एजन्सीजमार्फत त्यांची खरेदी करून सरकारी रुग्णालयांना पुरवठा केला गेला होता. मक्याची पावडर आणि तोंडाला लावण्याची टाल्कम पावडर घालून ही औषधे बनवली गेली होती असे सांगतात. यामुळे रुग्णांवर काही दुष्परिणाम झाले असले तरी समोर येणे कठीण आहे. कारण, सरकारी रुग्णालयात उपचार घेणारे हे अत्यंत गरीब थरातील असतात. त्यांना समजा रुग्णालयात किंवा नंतर बाहेर गेल्यावर काही गंभीर आजार झाला किंवा मृत्यू झाला तरी त्याबाबत काही दाद-फिर्याद होण्याची शक्यता नाही. एकाच वेळी खूप मोठ्या प्रमाणात मृत्यूच्या घटना झाल्या तरच कदाचित असा प्रकार उघडकीस येऊ शकतो. १९८६ मध्ये मुंबईच्या जेजे रुग्णालयात रुग्णांना ग्लिसेरॉलमधून बाधा होऊन चौदा जणांचा मृत्यू झाला. तरीही हे प्रकरण सहजासहजी उघड झाले नव्हते. नंतर ओरडा झाल्यावर या प्रकरणी लेंटिन आयोग नेमण्यात आला व सरकारी औषध खरेदीबाबत या आयोगाने कठोर निर्बंध घालून दिले. मात्र त्यांचे पालन केले जात नाही. सरकारी खरेदी म्हणजे चरण्याचे कुरण असेच समजले जाते व यात मंत्र्यांपासून ते अधिकाऱ्यांपर्यंत सर्व जण हात मारतात असे सर्रास बोलले जाते. आधीच एक तर आपल्या सरकारी रुग्णालयांची अवस्था दयनीय आहे. त्यात तेथे पुरवली जाणारी औषधेही बनावट असणे म्हणजे सामान्य माणसाच्या डोक्यावर आकाशीची कुऱ्हाड पडण्यासारखेच आहे. आपले विरोधी पक्षही इतके गलितगात्र झाले आहेत की जनतेच्या अशा जीवनमरणाच्या प्रश्नावर आवाज उठवण्याचे ते विसरून गेले आहेत. त्याचा फायदा सत्ताधारी वर्ग घेत असतो. यावेळी तरी तसे होऊ नये.

## पाळेमुळे खणून काढा

अंबाजोगाईतील फिर्यादीनंतर आता धाराशीवमध्ये लोहाच्या गोळ्याही बनावट असल्याचे आढळले. पाठोपाठ नांदेडमध्येही असाच प्रकार दिसून आला. ज्या कंपन्यांनी हा पुरवठा केला आहे त्यांनीच राज्याच्या इतर भागांमध्येही औषधे दिली आहेत. त्या सर्वांची सखोल चौकशी व्हायला हवी. औषध कंपन्यांचे मालक, वितरक, अधिकारी इत्यादींचे संगनमत असल्याखेरीज असे प्रकार घडू शकत नाहीत. शिवाय याला वरच्या राजकीय नेत्यांचा वरदहस्त असणारच. एकूण यात शेकडो कोटींचे व्यवहार झालेले असू शकतात. राजकारणी आणि त्यांचा निवडणुकीतला पैसा कोठून येतो याचे उत्तर हे अशा प्रकरणांमध्ये मिळत असते. २०२२ मध्ये उझबेकिस्तानमध्ये खोकल्याच्या गोळ्यांचा बनावट पुरवठा झाल्याने चौदा मुलांचा मृत्यू झाला होता. औषधे पुरवणारी कंपनी भारतीय होती. त्यामुळे जगभरात भारताचे नाक कापले गेले होते. औषध निर्मिती व निर्यातीत भारत जगात पहिल्या दहा देशांमध्ये आहे. आपली औषधे अमेरिका व इतर प्रगत देशांमध्येही जातात. आपण त्यांच्या दर्जाबाबत प्रचंड काटेकोर आहोत हे दिसायला हवे. त्यासाठी खरे तर आपल्याकडे बनावट औषधांविरुध्द कडक मोहीम राबवली जायला हवी होती. पण न खान दूंगा वगैरे दावे करणारे मोदी किंवा स्वतःला लोकांचे सरकार म्हणणारे शिंदे हे असल्या गोष्टींबाबत कुचकामी असतात. काही ठिकाणी तर त्यांच्या पक्षांचे थेट हितसंबंध यात अडकलेले असू शकतात. आता या प्रकरणाची तड लावायला हवी. तानाजी सावंत किंवा तत्सम जे जबाबदार असतील त्यांच्यावर कारवाई व्हायलाच हवी. पण केवळ तिथेच न थांबता वा केवळ एखाद्या एजन्सीला काळ्या यादीत न टाकता या प्रकरणाची पाळेमुळे खणून काढली पाहिजेत. कारण, काळ्या यादीतल्या कंपन्या पुन्हा वेगळ्या नावाने काम करू लागतात हा सार्वत्रिक अनुभव आहे. लाडक्या बहिणी, भाऊ, शेतकरी इत्यादींना पैसे देऊन त्यांची तोंडे बंद केली की ते अशा प्रकरणांबाबत आवाज उठवणार नाहीत असा सरकारचा अंदाज असावा. लाडक्या आणि दोडक्या जनतेने तो खोटा पाडायला हवा.

विचार

# असुरक्षित दिल्ली

*दिल्लीतील कायदा सुव्यवस्थेचे सध्या तीन तेरा वाजले आहेत. अरविंद केजरीवाल यांच्यावरील हल्ल्याने दिल्ली सुरक्षित नाही, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले. दिल्लीला पूर्ण राज्याचा दर्जा नाही. दिल्लीची सुरक्षा व्यवस्था केंद्र सरकारकडे आहे. दिल्ली सरकारला याबाबत काहीच करता येत नाही. एकीकडे जगभर दिल्लीमधील प्रदूषणाची चर्चा असताना दुसरीकडे दिल्लीतील कायदा आणि सुव्यवस्थेची लक्तरे लाल किल्ल्यावर टांगली गेली आहेत.*



अजय तिवारी

देशाची राजधानी असलेल्या दिल्लीतील कायदा आणि सुव्यवस्थेचे तीन तेरा वाजले आहेत. एका पक्षाचे प्रमुख आणि माजी मुख्यमंत्री असलेल्या अरविंद केजरीवाल यांच्यावरील हल्ल्याने दिल्ली सुरक्षित नाही, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले. दिल्लीला पूर्ण राज्याचा दर्जा नाही. दिल्लीची सुरक्षा व्यवस्था केंद्र सरकारकडे आहे. दिल्ली सरकारला याबाबत काहीच करता येत नाही. एकीकडे जगभर दिल्लीमधील प्रदूषणाची चर्चा असताना दुसरीकडे दिल्लीतील कायदा आणि सुव्यवस्थेची लक्तरे लाल किल्ल्यावर टांगली आहेत. केजरीवाल यांच्यावर हल्ला अशा वेळी झाला आहे, जेव्हा ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलेही भीतीच्या सावटाखाली आहेत. ज्येष्ठ नागरिकांच्या गुन्ह्यांची प्रकरणे गंभीर आहेत. दिल्ली याबाबतही आघाडीवर असल्याचे दिसते. २०२१ मध्ये ज्येष्ठ नागरिकांशी संबंधित ११६६ गुन्हे घडले होते. २०२२ मध्ये ते वाढून १३१५ झाले आहेत. दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या मुंबईमध्ये ज्येष्ठ नागरिकांशी संबंधित ५७२ गुन्हे दाखल झाले आहेत. बंगळुरूमध्ये ही संख्या ४५८ इतकी आहे. लहान मुलांवरील गुन्ह्यांमध्ये दिल्ली अव्वल आहे. तिथे असे ८६८३ गुन्हे दाखल झाले आहेत, तर मुंबईमध्ये ही संख्या ३,१७८ आणि बंगळुरूमध्ये १५७८ आहे. २०२१ च्या तुलनेत २०२२ मध्ये राजधानीमध्ये सायबर गुन्ह्यांची संख्या दुप्पट झाली आहे. २०२१ मध्ये सायबर गुन्ह्यांची ३४५ प्रकरणे होती, ती २०२२ मध्ये ६८५ पर्यंत वाढली आहेत. देशाच्या राजधानीत दररोज पाच दरोडे पडतात. एकीकडे दिल्लीतील वाढत्या गुन्ह्याची चर्चा होत असताना दुसरीकडे दिल्ली पोलिसांवर टीका होत आहे; मात्र त्याच वेळी दिल्ली पोलिसांमधील १३ हजार पदे रिक्त आहेत. दिल्लीची लोकसंख्या, देशाची राजधानी असल्याने अतिमहत्त्वाच्या व्यक्तींचा वावर आणि वाहतूक नियंत्रण आदी बाबी विचारात घेतल्यास दिल्लीसाठी सुमारे ९४ हजार पोलिस कर्मचारी असावेत, असे संख्याशास्त्र सांगते; परंतु प्रत्यक्षात १३ हजार पदे रिक्त आहेत. २०१४ पासून जेमतेम ५.५ हजार जागा भरल्या गेल्या आहेत. आश्चर्याची बाब म्हणजे केंद्र सरकारने दिल्ली पोलिसांच्या बजेटमध्येही कपात केली आहे. २०२४-२५ च्या अंतरिम बजेटमध्ये भाजपने दिल्ली पोलिसांच्या बजेटमध्ये ४.५ टक्के कपात केली. आदल्या वर्षीच्या सुधारित अंदाजाच्या तुलनेत ही घट स्पस्ट दिसते.

दिल्ली दंगलीच्या तपासात दिल्ली पोलिसांवर न्यायालयात ताशेरे ओढले गेले होते. ही दंगल २०२० मध्ये झाली होती. अतिरिक्त सत्र न्यायाधीशांनी पुराव्याशिवाय अहवाल दाखल करून न्यायालयाचा वेळ वाया घालवल्याची टिप्पणी केली होती. दिल्ली दंगलीचा तपास, आरपीओ पत्र आणि पुराव्यांची छेडछाड या प्रकरणी दिल्ली न्यायालयाने एकापेक्षा जास्त वेळा दिल्ली पोलिसांवर ताशेरे ओढले आहेत. १ मे २०२४ रोजी सर्वोच्च न्यायालयानेही 'न्यूज क्लिक' प्रकरणातील दिल्ली पोलिसांच्या भूमिकेकडे बोट दाखवले होते. केजरीवाल यांच्यावरील हल्ल्यानंतर दिल्लीमध्ये गुन्हेगारी आणि असुरक्षितता हा राजकीय मुद्दा बनला आहे, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. येत्या निवडणुकीमध्ये तो मोठा मुद्दा असेल. त्याचा राजकीय फटका भाजपला बसून आम आदमी पक्षाला फायदा होणार आहे. केजरीवाल यांनी दिल्ली विधानसभेत दिल्लीतील सुरक्षेचा मुद्दा उपस्थित केल्यानंतर केंद्राला ठोस उत्तर द्यावे लागणार हे निश्चित आहे.

आकडेवारी दर्शवते की, दिल्ली आता महिला, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांसाठीही सुरक्षित नाही. विधानसभेतील भाषणात केजरीवाल यांनी केंद्र सरकार कायदा आणि सुव्यवस्था राखण्यात अपयशी ठरत असल्याचे स्पष्टपणे सांगितले. माजी मुख्यमंत्री दिल्लीत सुरक्षित नसल्याने पदयात्रेलाही जाऊ शकत नाहीत, मग दिल्लीत सुरक्षित कोण? दिल्लीत कायद्याचे राज्य नाही का, असे प्रश्न उपस्थित होतात. दिल्लीत सततच्या हिंसक घटनांमुळे भीतीचे वातावरण आहे, त्याहूनही खेदजनक बाब म्हणजे गुन्हेगारी रोखण्यासाठी कोणीच पुढाकार घेताना दिसत नाही. केजरीवाल स्वतः बिघडलेल्या कायदा आणि सुव्यवस्थेचे बळी आहेत. दिल्लीतील कायदा आणि सुव्यवस्थेची जबाबदारी केंद्रीय गृह मंत्रालय सांभाळते; मात्र सध्याच्या परिस्थितीत गुन्हेगार बेलगाम झाल्यामुळे कायदा आणि सुव्यवस्थेवर प्रश्न उपस्थित होत आहेत. केजरीवाल यांच्यावरील हल्ल्यावरून हेच सिद्ध होत आहे, की राजकारणीही सुरक्षित नसतील तर सर्वसामान्यांबद्दल कोण बोलू शकते? दिल्लीतील महिला, मुले आणि सर्वसामान्य नागरिकांना भीतीच्या छायेत जगावे लागत आहे. एका घटनेची चर्चा संपण्यापूर्वी दुसरी घटना घडते.

आम आदमी पक्षाचा आरोप आहे की उपराज्यपालांचा बहुतांश वेळ दिल्ली सरकारच्या मंत्र्यांच्या विरोधात अजेंडा चालवण्यातच जातो. ईशान्य दिल्लीतील वेलकम कॉलनीतील राजा मार्केटमध्ये घडलेली एक घटना याचे ताजे उदाहरण आहे. येथे पहाटे साडेपाच वाजता भरदिवसा गोळी झाडली गेल्याने २२ वर्षीय महिला गंभीर जखमी झाली. २० ऑक्टोबर २०२४ रोजी रोहिणी भागात स्फोट झाल्याने प्रशांत विहार येथील केंद्रीय राखीव दलाची शाळेची भिंत पडली आणि कारचे नुकसान झाले. कुठेही गोळी झाडली जाऊ शकते, कुठेही स्फोट होऊ शकतो, असे दिल्लीतले सध्याचे चित्र आहे. अलिकडेच टिळकनगरच्या कार शो रूममध्ये गोळ्या झाडल्या गेल्या. त्यात तीनजण जखमी झाले. पाच कोटी रुपयांची मागणी असलेले खंडणीचे पत्र सोडून गुन्हेगार पळून जातात. खुनाचा आरोपी दिल्ली पोलिस ठाण्याच्या बाथरूममधून उडी मारून फरार होतो. याच सुमारास पूर्व दिल्लीत एका ३५ वर्षीय व्यक्तीची निर्घृण हत्या करण्यात आली. त्याच्या मानेवर आणि पोटावर चाकूने वार केले गेले आहेत. नातेवाईकाच्या घरी ३० वर्षीय तरुण मृतावस्थेत आढळला. दोन भावंडांचे मृतदेह त्यांच्या वडिलांच्या दुकानात सापडले. एक फूड डिलिव्हरी एजंट अलिकडे मृत आढळला. टोळीयुद्धाचाही फटका दिल्लीला बसला आहे. दिल्लीत दररोज २३ लहान मुले, ४० महिला आणि तीन ज्येष्ठ नागरिक गंभीर गुन्ह्यांना बळी पडत आहेत. असे हे एकूण चित्र आहे.

राष्ट्रीय गुन्हे नोंदणी अहवालात दिल्लीमध्ये गुन्हेगारीचे प्रमाण देशात सर्वाधिक असल्याचे म्हटले आहे. आकडेवारीनुसार, दिल्लीमध्ये दररोज ११८९ गुन्हे दाखल होत आहेत. दिल्लीत प्रति लाख रहिवासी १८३२.६ गुन्हे आहेत आणि हा दर देशात सर्वाधिक आहे. त्याच वेळी, जयपूर दुसऱ्या स्थानी आहे; परंतु येथील गुन्ह्यांचे आकडे दिल्लीच्या तुलनेत प्रति लाख ९१६.७ म्हणजेच निम्मे आहेत. येथे लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे देशातील सरासरी गुन्हेगारी दर लाख लोकसंख्येमागे २५८.१ आहे, तर दिल्लीत हा आकडा १८३२.६ आहे. आता दिल्लीतील महिला घाबरलेल्या आहेत. तेथील महिलांवरील गुन्ह्यांचे प्रमाण १४४.४ टक्के म्हणजेच देशात सर्वाधिक आहे तर राष्ट्रीय सरासरी ६६.४ आहे. दररोज सरासरी तीन घटनांसह दिल्लीमध्ये वर्षभरात बलात्काराच्या १२१२ घटना नोंदल्या जात आहेत. मुंबईच्या तुलनेत दिल्लीमध्ये महिलांवरील गुन्हे दुप्पट आहेत. दिल्लीमध्ये महिलांवरील गुन्ह्यांच्या घटना वार्षिक १४,१५८ आहेत. मुंबईत हा आकडा ६,१७६ आहे. बंगळुरूमध्ये हाच आकडा ३,९२४ आहे. म्हणजेच दिल्ली महिलांसाठी बंगळुरूपेक्षा तिप्पट असुरक्षित आहे. एक लाख लोकसंख्येमागे महिलांवरील सर्व प्रकारच्या गुन्ह्यांच्या बाबतीत दिल्ली दुसऱ्या क्रमांकावर आहे. दिल्लीत हा दर १८५.९ आहे.

आश्चर्याची बाब म्हणजे दिल्लीचे उपराज्यपाल महिलांसाठी शहर सुरक्षित बनवण्यासाठी पुढाकार घेण्याऐवजी दुसऱ्याच कामात व्यस्त आहेत. दिल्ली परिवहन महामंडळाच्या बसमध्ये आजही बहिणींना मार्शल भैया आठवतात. केजरीवाल यांनी २०१५ बसमध्ये मार्शल तैनात केले होते. निर्भया घटनेनंतर बसमध्ये कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. त्यामुळे या मार्शल्सची भूमिका महत्त्वाची ठरली. नोव्हेंबर २०२३ मध्ये उपराज्यपालांनी दहा हजारांहून अधिक मार्शल निवृत्त केले. घराबाहेर बसमधून मोफत प्रवास करणाऱ्या महिलांना या निर्णयानंतर असुरक्षिततेचा सामना करावा लागत आहे. हा मुद्दा केवळ मार्शलच्या पुनर्नियुक्तीचा नाही, तर महिलांच्या सुरक्षिततेशी संबंधित आहे. मुख्यमंत्री आतिशी यांनी अलिकडेच म्हटले की भाजप नेते विजेंद्र गुप्ता यांनी उपराज्यपालांची भेट घेऊन मार्शल नियुक्त करण्यास राजी केल्यास त्या केजरीवाल यांना निवडणुकीदरम्यान विजेंद्र गुप्ता यांच्या विरोधात उमेदवार उभे करू नयेत, अशी विनंती करतील. साहजिकच मार्शल्सची बडतर्फी आणि पुनर्स्थापना हा मोठा राजकीय मुद्दा बनला आहे.

विशेष

# सोनिया गांधी आणि मनरेगाचा अधिकार

तुषार गायकवाड

देशात वा राज्यात जे काही चुकीचे सुरु आहे. त्यामागे गांधी, नेहरु, काँग्रेस हेच जबाबदार आहेत. हा अजेंडा काही नवीन नाही. पण 'मनरेगा' सारख्या पोट भरण्यासाठी हक्काचे काम मिळवून देणाऱ्या योजनेस 'रमणा' म्हणणे हा असंवेदनशीलपणा. उद्या नेहरुंच्या धोरणांमधून निर्मिलेल्या आयआयटींना किंवा नद्यांवरील धरणांना 'रेवडी' म्हटले गेल्यास आश्चर्य वाटू नये.

मनरेगा (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार गँरेटी अधिनियम) हा भारतीय कामगार कायदा युपीए सरकारने २००५ साली जनतेला दिला. आपल्या राज्यघटनेमध्ये देशातल्या जनतेला, राजकीय व सामाजिक अधिकार बहाल केले आहेत. मात्र जनतेला कोणताही आर्थिक अधिकार दिलेला नाही. हा अधिकार सर्वप्रथम मनरेगाने भारतीय नागरिकांना दिला.

गरीब भारतीयांना रोजगार हक्काची हमी या कायद्यांतर्गत मिळते. देशातील ग्रामीण कुटुंबांना वित्तीय वर्षात शंभर दिवस प्रति कुटुंब कुशल रोजगार देता येतो. मनरेगा मधून कोणालाही मोफत किंवा घरबसल्या पैसे दिले जात नाहीत. ज्या भारतीयांना रोजगार नाही, अशांना रोजगाराची सरकारी व घटनात्मक हक्काची हमी मनरेगा कायद्यांतर्गत मिळते आणि कामाच्या मोबदल्यात पैसे मिळतात. मोफत (फुकट) काहीही नाही!

२०१४ नंतर आणलेली 'शेतकरी सन्मान योजना' किंवा अलिकडची 'लाडकी बहीण' योजना यांसाठी कोणतीही घटनात्मक तरतूद नाही. तसंच इथे ना कामाची हमी ना काम करण्याची गरज. या योजना मोफत पैसे देणाऱ्या आहेत. हा मूलभूत फरक युपीएचा मनरेगा कायदा व एनडीएच्या रमणा, रेवडी वाटप कार्यक्रम या दोहोंत आहे.

गोरगरिबांना केंद्रस्थानी ठेवल्यानेच केवळ मनरेगा नाही, तर माहितीचा अधिकार, अन्न सुरक्षा अधिकार, शिक्षणाचा अधिकार, आदिवासींचा वनहक्क कायदा, भूमी अधिग्रहण कायदा हे युपीए सरकारच्या कार्यकाळात झाले. गरिबांचे जीवनमान उंचावणारे हे सर्व कायदे होते. मनरेगामुळे हक्काने काम आणि कामाचा मोबदला मिळत गेल्याने अनेक गरीब कुटुंबांतील मुले, एरवी घरीच बसली असती ती शिक्षण घेऊ लागली. देशाच्या उभारणीत गरिबांना सहभागी करून घेणारी ही धोरणे होती.

या धोरणांना मूर्त रूप देण्यात देशाच्या राष्ट्रीय सल्लागार परिषदेचे योगदान म्हत्वाचे ठरले. युपीए सरकारने राष्ट्रीय सल्लागार परिषद (नॅशनल ॲडव्हायझरी कौन्सिल) तयार करताना डॉ. मनमोहन सिंग यांच्याशी सल्लामसलत केली होती. संसदेत किंवा मंत्रिमंडळ बैठकीत चर्चेस पुरेसा वेळ मिळू शकत नसे. अशावेळी राष्ट्रीय सल्लागार परिषदेतील आयएएस अधिकारी, दर्जेदार अभ्यासू मंडळी मिळून स्वतंत्रपणे सखोल अभ्यास करुन जनतेसाठी अधिक फायदेशीर कायदा कसा आणता येईल? यासाठी स्वतंत्र अभ्यास अहवाल तयार करायचे. तसा अभ्यास अहवाल मंत्रिमंडळापुढे जायचा. मंत्रिमंडळाने त्यामध्ये आवश्यक ते बदल केल्यावर मग कायद्याचा मसुदा तयार होवून संसदेत यायचा. त्यावर व्यापक चर्चा होवून विरोधकांच्या मतांचा आदर करुन मग अंतिम मसुदा ठरुन त्याप्रमाणे बहुमताने संसदेत कायदा संमत व्हायचा.

ज्याप्रमाणे स्थायी समिती काम करते. त्याच प्रकारे राष्ट्रीय सल्लागार परिषद काम करत होती. स्थायी समितीचा अहवाल किंवा राष्ट्रीय सल्लागार परिषदेचा अहवाल आल्यास त्यावर कार्यवाही करण्याचा अधिकार सर्वस्वी सरकारचाच असतो. त्याचप्रमाणे राष्ट्रीय सल्लागार परिषदेकडून आलेला अभ्यास अहवाल स्विकारायचा की नाकारायचा? हादेखील सरकारचाच अधिकार होता. मोदी (एनडीए) सरकारने सत्तेत आल्यानंतर राष्ट्रीय सल्लागार परिषद बंद करुन टाकली.

राष्ट्रीय सल्लागार परिषद सोनियाजी गांधी यांच्या नेतृत्वाखाली काम करत असे. त्यामुळे संसदेत होणारे कायदे हे सोनिया गांधींनी संसदेला बायपास करुन ड्राफ्ट केले म्हणून टिका करणारे कोण आहेत ते सर्वश्रृत आहे. पण सांविधानिक अधिकारानुसार, प्रायव्हेट बिल तरतुदी (खाजगी विधेयक तरतूद) अंतर्गत देशातील कोणताही नागरिक बिलाचा मसुदा तयार करुन सरकारला देऊ शकतो. तो मसुदा स्विकारायचा की नाकारायचा? हा अधिकार सर्वस्वी सरकारचा आहे. त्यामुळे, राष्ट्रीय सल्लागार परिषदेने सुचवलेल्या मसुद्यांची चर्चा मंत्रीमंडळात होत असे. आवश्यक त्या सुधारणा करुन त्यांचे पुढे कायद्यात रुपांतर करुन संविधानिक अधिकार जनतेला बहाल केले जात असत.

मुळात कोणत्याही सरकारचे प्राथमिक उद्दीष्ट्य देशात वा राज्यात असलेली सत्ता टिकवणे व पुढील निवडणूक जिंकणे हे असतेच, असायलाच हवे. याबाबत कोणतेही दुमत असता कामा नये. आता यामध्ये सत्ताधाऱ्यांच्या दोन वेगवेगळ्या भूमिका स्पष्ट करता येतील. एक म्हणजे जनतेला काहीतरी भव्य दिसेल अशा गोष्टी करुन सतत प्रसिध्दीच्या झोतात राहून सरकारची लोकप्रियता वाढवणे/टिकवणे. आणि दुसरे म्हणजे सर्वसामान्य जनतेला केंद्रस्थानी ठेवून पायाभूत सुविधांची निर्मिती करत सर्वांच्या हिताचे निर्णय घेणे.युपीए सरकारच्या काळात देशातील उद्योगपतींच्या, लोकप्रतिनिधींच्या संपत्तीच्या वाढीचा दर ज्या प्रमाणात होता. त्याच वेळी देशातील हंगर इंडेक्सदेखील एका मर्यादित प्रमाणात होता. युपीए सरकारच्या काळात १२५ देशांपैकी भारत ग्लोबल हंगर इंडेक्स मध्ये ५५ व्या स्थानावर होता. २०१४ साली युपीए सरकार जावून एनडीएचे पूर्ण बहुमताचे मोदी सरकार आले. मोदी सरकारच्या पहिल्याच कार्यकाळात उद्योगपतींच्या, लोकप्रतिनिधींच्या संपत्तीत दिवसागणिक वाढत होवू लागली. तर दुसऱ्या बाजूला देशाचा हंगर इंडेक्स उच्चांकी वाढलेला दिसला. ११७ देशांच्या ग्लोबल हंगर इंडेक्स मध्ये भारताचे स्थान १०२ व्या क्रमांकावर ढासळले.

सर्वसामान्य भारतीयांचे उत्पन्न कमी होवून अदानी, अंबानी यांसारखे उद्योगपती श्रीमंत होताना दिसतात. यास मनरेगा सारख्या योजना कारणीभूत नसून सत्ताधाऱ्यांचे धोरण व भाजपाला संघटितपणे ३७ टक्क्यांच्या आसपास मिळणारे राष्ट्रीय मताधिक्य कारणीभूत आहे. यावरही सरकार आपली कातडी वाचवण्यासाठी सर्व्हे आणि आकडेवारी चुकीची आहे, म्हणत पळ काढण्याचा प्रयत्न करते. या सरकारमध्ये प्राथमिकता लोकांना सुविधा देवून निवडून येण्यापेक्षा, लोकांच्या भावना चेतवून निवडून येण्यास दिली जाते. देशाच्या प्राथमिक शिक्षण व आरोग्य व्यवस्थेवर खर्च करुन भरघोस मतदान मिळत नाही. त्यामुळे मूठभर विवेकशून्य लोकांच्या भावना व अस्मितांच्या राजकारण करुन देशाच्या सर्वांगिण विकासास खीळ बसत आहे. यामागील प्रमुख कारण निवडणूका जिंकणे इतकेच आहे. युपीए सरकारने असला थिल्लरपणा कधीच केला नाही. सोनियाजी गांधी यांचेशी लोकांचे वैचारिक मतभेद असू शकतात, असावेत. राजकीय विरोध असावा. पण गरीब नागरीकांस घटनात्मक अधिकार बहाली करण्याचे जे ऐतिहासिक काम सोनियाजींनी केले. ते देशाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरले गेलेय.

सासू इंदिराजी गांधी व पती राजीवजी गांधी यांच्या पश्चात नेहरुंचा वारसा खऱ्या अर्थाने सिध्द करणाऱ्या सोनियाजी गांधी यांना वाढदिवसाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा!!

**साभार**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**१२ डिसेंबर**

**१८५९**:- ज्ञानेश्वरांच्या 'अनुभवामृता' चे टीकाकार रामचंद्र बळवंत डोंगरे यांचा जन्म. आत्माराम महाराजांनी 'अनुभवामृता' वर दिलेल्या प्रवचनांच्या आधारे डोंगरे बुवांनी लिहिलेली टीका 'अनुभवामृत : अमृतवाहिनी' ह्या नावाने प्रसिध्द. **१८८६ :-** कोशकार आणि सर्वसंग्रह या मासिकाचे संपादक माधव चंद्रोबा डुंकले यांचे निधन. त्यांची महत्त्वपूर्ण साहित्यिक कामगिरी म्हणजे 'शब्दरत्नाकर' हा संस्कृत-मराठी शब्दकोश. डॉ. भाऊ दाजी लाड ह्यांच्यामुळे त्यांना मराठी संतकाव्याची गोडी निर्माण झाली. त्यासाठी पदरतोड करुन 'सर्वसंग्रह' नावाचे मासिक सुरु केले. काव्याचे चरण, शब्द न तोडता अखंड लिहिण्याची व छापण्याची पध्दती बदलून माधवरावांनी शब्द तोडून स्वतंत्रपणे देण्याची व आवश्यक तेथे विरामचिन्हे देण्याची पध्दती नव्यानेच सुरु केली. कवितेचा अन्वयासह कठीण शब्दांच्या व अर्थाच्या टीपा देऊन ती छापणे ही त्यांची संपादन पध्दत होती. त्यांनी मोरोपंताचे आर्यभारत, वामन पंडीत, संत तुकाराम, रामदास, मुक्तेश्वर **१८८६ :-** कोशकार आणि सर्वसंग्रह या मासिकाचे संपादक माधव चंद्रोबा डुंकले यांचे निधन. त्यांची महत्त्वपूर्ण साहित्यिक कामगिरी म्हणजे 'शब्दरत्नाकर' हा संस्कृत-मराठी शब्दकोश. डॉ. भाऊ दाजी लाड ह्यांच्यामुळे त्यांना मराठी संतकाव्याची गोडी निर्माण झाली. त्यासाठी पदरतोड करुन 'सर्वसंग्रह' नावाचे मासिक सुरु केले. काव्याचे चरण, शब्द न तोडता अखंड लिहिण्याची व छापण्याची पध्दती बदलून माधवरावांनी शब्द तोडून स्वतंत्रपणे देण्याची व आवश्यक तेथे विराम चिन्हे देण्याची पध्दती नव्यानेच सुरु केली. कवितेचा अन्वयासह कठीण शब्दांच्या व अर्थाच्या टीपा देऊन ती छापणे ही त्यांची संपादन पध्दत होती. त्यांनी मोरोपंताचे आर्यभारत, वामन पंडीत, संत तुकाराम, रामदास, मुक्तेश्वर आदींच्या प्राचीन कविता प्रसिध्द केल्या. **१९२०** : - तत्त्वज्ञानविषयक ग्रंथाचे कर्ते श्रीनिवास हरी दीक्षित यांचा जन्म. भारतीय तत्त्वज्ञान नीतिमीमांसा, तर्कशास्त्र, नैतिक आणि सामाजिक तत्त्वज्ञान आणि ग्रंथ प्रसिध्द. **१९२३ :-** लेखक, पत्रकार रामचंद्र अण्णाजी जोशी यांचा जन्म. यशवंतराव चव्हाण, बाबूराव शेटे आणि यांच्या जीवनावर त्यांनी पुस्तके लिहिलीत तसेच यशवंतरावांच्या पत्नी वेणुताईंच्या जीवनावर ही 'ज्योत अनंताची' हे पुस्तक लिहिले. **१९२४** :- ख्यातनाम साहित्यिक डॉ. विद्याधर गंगाधर पुंडलिक यांचा जन्म. समीक्षक टेकडीवरचे पीस', देवचाफा', 'माळ', 'फॅन्टॅसिया' हे कथा संग्रहासह 'चक्र', 'चौफुला' हे एकांकिकासंग्रह, 'चार्वाक', 'माता द्रौपदी', 'कुणीकडून कुणीकडे' ही नाटके तसेच 'आवडलेली माणसे' (व्यक्तिचित्रे) आणि 'शाश्वताचे रंग' (समीक्षात्मक) ही त्यांची साहित्यसंपदा. समीक्षक, व्यक्तिचित्रकार, नाटककार, कथाकार, एकांकिका लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक असलेले आणि कथालेखनाच्या तसेच नाट्यलेखनाच्या क्षेत्रात स्वतःची वेगळी वाट शोधणारा लेखक असा लौकिक त्यांनी प्राप्त केला होता. आपल्या वैविध्यतेने मराठी साहित्यात त्यांनी मोलाची भर टाकली. याची प्रचिती 'वॉर्ड नं ७', 'आजी शरण येते' या कथेतून येते. 'पोपटी चौकट' या कथासंग्रहातील कथा लहान मुलांपासून ते वृध्दांपर्यंतच्या कथा गुंफल्या आहेत. अनेक ग्रंथांचे संपादनही त्यांनी केले. 'माझी सखी', 'दोन शहरांची गोष्ट' ह्या अनुवादीत कादंबऱ्याही त्यांच्या नावावर आहे. एकंदरीत त्यांच्या लेखनावर नजर टाकली तर त्यांच्या लेखनाला किती विविध पदर आणि अंगे होती हे वाचकांच्या लक्षात येते. **१९२६** : - मराठी विश्वकोशाचे अभ्यागत संपादक प्रा. मधुकर अनंत खांडवे यांचा जन्म. 'औद्योगिक भूगोल' आणि मानवी भूगोलाची प्राकृतिक पार्श्वभूमी' ही दोन पाठ्यपुस्तके त्यांच्या नावावर आहेत.

- **संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१३ डिसेंबर

१) श्री. शरद दत्तात्रेय माळी
गोंधळपाडा, अलिबाग, १३-१२-१९४७

२) श्रीम. जयश्री दत्तात्रय क्षीरसागर
चेंढरे, अलिबाग, १३-१२-१९४७

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते



चि. शांतनु सचिन ढवळे,
वाढदिवसानिमित्त, अलिबाग

# राज्यात कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर

## कोंबिंग ऑपरेशनवरुन सुषमा अंधारेंनी सरकारला फटकारले

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबई मराठवाड्यातील परभणी येथे बुधवारी (दि.११) संध्याकाळपासून पोलीस प्रशासनाने कोंबिंग ऑपरेशन सुरु केले आहे. राज्याला गृहमंत्री नाही, अशा परिस्थितीत राज्यातील कायदा-सुव्यवस्थेची जबाबदारी कोणी आणि कशी हाताळावी हा प्रश्न निर्माण झाला असल्याचा सवाल करत परभणीत सुरु असलेली पोलीस कारवाई चुकीची असल्याचा आरोप सुषमा अंधारे यांनी केला आहे. शिवसेना (उद्धव ठाकरे) नेत्या सुषमा अंधारे यांनी एक व्हिडिओ समाज माध्यमावर पोस्ट करत परभणीतील कोंबिंग कारवाईवरुन सरकारला धारेवर धरले आहे.



सुषमा अंधारेंनी एक व्हिडिओ सोशल मीडियावर पोस्ट केला आहे. त्यात त्या म्हणाल्या की, विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर झाला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राजीनामा दिला, त्यानंतर ते काळजीवाहू मुख्यमंत्री राहिले आहेत. तेव्हापासून आतापर्यंत राज्याला गृहमंत्री नाहीय. त्यामुळे राज्यातील कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला तर तो कोणी हाताळावा आणि कसा हाताळावा, हा प्रश्न निर्माण झाला आहे, असे सांगत त्यांनी महाराष्ट्रातील मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री यांच्या सरकारवर जोरदार टीका केली आहे.

सुषमा अंधारे पुढे म्हणाल्या की, परभणी हा अत्यंत संवेदनशील जिल्हा आहे. पँथर चळवळीतील अनेक नेत्यांचे निवासस्थान परभणीमध्ये आहे. अशा परिस्थितीत परभणीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील संविधानाची प्रतिकृती उद्धवस्त केली जात असताना त्याची प्रतिक्रिया उमटणार हे स्वाभाविकच होते. आंबेडकरी विचारांच्या संघटनांनी पुकारलेला बंद ही सहाजिक प्रतिक्रिया होती. त्यासाठी पोलिसांकडून पूर्वतयारी करणे आपेक्षित होते. व्यापरपेठेला तशी कल्पना देणे आपेक्षित होते. एकदा बंद पुकारला आहे तेव्हा व्यापरपेठेकडूनही बंदला प्रतिसाद देणे आपेक्षित होते. परंतु, काही लोकांनी व्यापरपेठा चालू ठेवल्या. बंदला संमिश्र प्रतिसाद मिळाला. बाजारपेठेतील काही दुकाने सुरु होती, ती बंद करण्यासाठी आंदोलकांकडून बंदचा आग्रह धरण्यात आला. आंदोलकांनी आवलंबलेल्या मार्गाचे समर्थन करता येत नाही, मात्र अशी घटना घडण्याला कारणीभूत पोलीस यंत्रणा आहे, राज्याचे गृहखाते जबाबदार आहे, असा आरोप अंधारेंनी गृह खात्यावर केला आहे.

### कोंबिंगच्या नावाखाली तरूणांचे आयुष्य बरबाद

**सुषमा अंधारे म्हणाल्या की, पोलीस खात्याकडून तिथे कोंबिंग ऑपरेशनच्या नावाखाली आंबेडकरी तरुणांचे आयुष्य आणि भविष्य उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न राज्य सरकारकडून चालू असेल तर हा निंदनीय आणि निषेधार्ह प्रकार आहे. विटंबनेच्या घडलेल्या घटनेची चौकशी करण्यापेक्षा कोंबिंग ऑपरेशनच्या नावाखाली पिढ्या बरबाद करण्याच्या घटनेचा शिवसेना ठाकेर गट निषेध करत असल्याचे सुषमा अंधारे म्हणाल्या आहेत.**

# महायुतीत मंत्रिपदावरून धुसफूस सुरूच

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

महायुती मोठे बहुमत मिळवून सत्तेवर आली. मात्र, मंत्रिपदावरून धुसफूस सुरूच आहे. हायप्रोफाईल मंत्रिपदे आपल्याला मिळावीत यासाठी भारतीय जनता पक्षासह शिंधे गट आणि अजित पवार गटात 'दम लगाके हयशा' सुरू आहे. सर्वाधिक जागा मिळवणारी भाजपा शिंदे आणि दादा गटाला क्रीम खाती देण्यास तयार नाहीत. किंबहुना शिंदेंकडील क्रीम खाती स्वतःकडे खेचू पाहत आहे. शिंदे गट आणि अजित पवार गट आपली खाती सोडण्यास तयार नसल्याने अखेर दिल्ली गाठण्याची वेळ महायुतीवर आली आहे.

दरम्यान, मुख्यमंत्र्यांसह दोन उपमुख्यमंत्र्यांचा शपथविधी झाला आहे. आता मंत्रिमंडळाच्या



विस्ताराची गडबड सुरू असून १४ डिसेंबरला विस्तार होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. त्या दिशेने हालचालीही सुरू झाल्या आहेत.

भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंगळवारी ठाणे येथे जाऊन एकनाथ शिंदे यांची भेट घेतली होती. दोघांमध्ये मंत्रिमंडळ विस्ताराबाबत चर्चा झाल्याची माहिती समारे येत आहे.

भाजपाश्रेष्ठी काही महत्त्वाची मंत्रिपदे शिंदे गटाला देण्यास तयार नाही, हा संदेश घेऊन बावनकुळे शिंदे यांच्याकडे गेल्याची माहिती मिळत आहे.



# वाघरळ पाड्यावर भूमाफियांचे अतिक्रमण

**। पालघर । प्रतिनिधी ।**

वसई पूर्वेच्या वाघरळ पाडा येथे मोठ्या प्रमाणावर पर्यावरणाचा ऱ्हास सुरू असून बेकायदेशीररीत्या बांधकामे केली जात आहेत. स्थानिक आणि महसूल प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याने निसर्गरम्य वाघरळ पाडा नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. या परिसरातील नैसर्गिक पाणवठे बुजवण्यात आले असून अगणित झाडांची कत्तल झाली आहे. त्यामुळे परिसराला बकाल स्वरुप आले आहे. पाड्यातील पर्यावरणाचा ऱ्हास करणाऱ्यांवर शासनाने कडक कारवाई करावी अशी मागणी पर्यावरण प्रेमींनी केली आहे.

वसईतील राजवली तालुक्यातील वाघरळ हा आदिवासी पाडा आहे. जंगल आणि हिरव्यागार डोंगरांनी हा परिसर बहरलेला आहे. मात्र, भूमाफियांनी या भागातील पर्यावरण नष्ट करण्यास सुरुवात केली आहे. सध्या येथील हजारो झाडांची कत्तल करण्यात आली आहे. महत्त्वाची बाब म्हणजे डोंगर फोडून त्यातील माती उपसाचे काम सुरू आहे. तसेच, तेथील दगड अनधिकृतपणे उचलून नेण्यात येत आहेत. तसेच, पाड्यालगतचा संपूर्ण डोंगराळ भाग पूर्णपणे सपाट करून या ७० एकर परिसरात चाळी बांधण्याचे काम सुरू आहे. सध्या तेथील अर्ध्याहून जमिनीवरील झाडे-झुडपे नष्ट केली आहेत. तेथे भूमाफियांनी कब्जा केल्याचे दिसून येत आहे. यामुळे काही वर्षांपूर्वी याच ठिकाणी दरड कोसळण्याची घटना घडली होती यामध्ये अनेक नागरिकांना आपला जीव गमवावा लागला होता. वसई-विरार शहर हे अनधिकृत बांधकामाचे जणूकाही माहेरघरच बनले आहे.

# 'सूर्यघर वीज योजनेचा लाभ घ्यावा'

। रसायनी । वार्ताहर ।

महावितरणाकडून योजनेचा लाभ नागरिकांनी घ्यावे असे सर्वत्र आवाहन होत आहे. वासांबे ग्रुप ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेत गुरुवारी (दि.१२) प्रधानमंत्री सुर्यघर मोफत वीज योजनेची माहिती देण्यात आली. ही माहिती महावितरण पनवेल ग्रामीण उपकार्यकारी अभियंता राख, गुण नियंत्रण विभागाचे सहाय्यक अभियंता प्रविण म्हात्रे, मोहोपाडा विजवितरण सहाय्यक अभियंता लक्ष्मीकांत गलांडे यांनी दिली. तसेच, ही योजना नागरिकांपर्यंत पोहचण्यासाठी वासांबे ग्रामपंचायतीकडून जनजागृती व्हावी, असे आवाहन केले.

# वर्षा गायकवाडांकडून सरकारचा समाचार

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

महायुती मोठे बहुमत मिळवून सत्तेवर आली आहे. मात्र, मंत्रिपदावरून धुसफुस सुरूच असून मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या दिल्लीवारी सुरू आहेत. गृहखाते कुणाकडे असणार, हे देखील स्पष्ट झालेले नाही. एकीकडे मंत्रिपदांवरून साठमारी सुरू असताना दुसरीकडे महाराष्ट्रात कायदा सुव्यवस्थेचा बोजवारा उडाला आहे. याच मुद्द्यावरून काँग्रेस खासदार वर्षा गायकवाड यांनी महायुती सरकारसह



केंद्राचा खरपूस शब्दात समाचार घेतला आहे.

दिल्लीत संसद परिसरात बोलताना वर्षा गायकवाड म्हणाल्या की, २३ तारखेला निकाल लागला, पण सरकार बनवायला ५ तारीख उजाडावी लागली आहे. देशाच्या संविधानाच्या माध्यमातून महामहीन राज्यपालांचा अधिकार अध्यक्षांनी वापरला आणि संविधान विरोधी सरकार निर्माण झालेल. त्यावेळी मोठा इव्हेंट केला. त्यात कोट्यवधींचा खर्च करण्यात आला. परंतु, यावेळी फक्त मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्र्यांनी शपथ घेतली आहे. यातच महाराष्ट्र आणि मुंबईमध्ये कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. कुर्ल्यात मोठी घटना घडली. त्यात सात लोकांचा दुर्दैवाने मृत्यू झालेला आहे. परभणी येथे आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर असणाऱ्या संविधानाच्या पुस्तकाची विटंबणा करण्यात आली. यामुळे जातीय तणावाचे वातावरण निर्माण झाले आहेत. पोलिसांनी केलेल्या लाठीमारमध्ये अनेक लोक जखमी झालेले आहेत. सगळ्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी सरकारच पूर्ण नाही, कारण खातेवाटप झालेले नाही. ही दुर्दैवी गोष्ट आहे, असे देखील वर्षा गायकवाड म्हणाल्या आहेत.

# मनोर-पालघर महामार्गावर अपघात | तरूणाचा जागीच मृत्यू

**। पालघर । प्रतिनिधी ।**

मनोर-पालघर महामार्गावर दोन दुचाकींना पिकअपने दिलेल्या धडकेनंतर झालेल्या भीषण अपघातामध्ये तरूणाचा जागीच मृत्यू झाला आहे. तर, त्याची बहिण गंभीर जखमी झाली आहे.

सोमवारी सकाळी मनोरच्या धुपोंडा पाड्यातील विशाल चांदमल यादव (१९) आणि त्याची बहीण डिंपल चांदमल यादव (२२) दोघेही मनोर-पालघर रस्त्यावरून दुचाकीने पालघरकडे जात होते. नेटाळी व गोवाडे गावच्या वळणावर पाठीमागून आलेल्या पीकअप टेम्पोने विशाल यादव चालवत असलेल्या दुचाकीला पाठीमागून ठोकर मारल्याने अपघात झाला. अपघातात विशालचा जागीच मृत्यू झाला, तर डिंपल यादव गंभीर जखमी झाली. याचवेळी पालघरकडून मनोरच्या दिशेने जात असलेल्या दुचाकीला याच पीकअप टेम्पोची धडक बसल्याने झालेल्या अपघातात दुचाकीस्वार रुपेश डगला (२४) गंभीर जखमी झाला आहे. याप्रकरणी टेम्पो चालक नौशाद अजमुना कुरेशी (४९) याच्या विरोधात गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे.

# कर्नाटकातील मंत्र्यांना शिवसैनिकांनी अडवले



**। कोल्हापूर । प्रतिनिधी ।**

कर्नाटकातील माजी मंत्री व विद्यमान आमदार गुरूवारी कोल्हापूरच्या अंबाबाईच्या दर्शनासाठी आल्यावर शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाच्या शिवसैनिकांकडून त्यांच्या गाड्या अडवण्यात आल्या होत्या. दुपारी एकच्या सुमारास मंदिर परिसरातील या गोंधळामुळे वातावरण काही काळ तणावपूर्ण बनले होते. यावेळी, माजी मंत्री प्रभू चव्हाण व सुनील कुमार यांना शिवसैनिकांनी अडविल्यानंतर त्यांनी सध्या बेळगावमध्ये सुरू असलेल्या अधिवेशनात तुमच्या भावना मांडू, असे आश्वासन दिल्यानंतर वातावरण निवळले.

ठाकरे सेनेचे नेते व कार्यकर्ते गुरूवारी जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन देण्यासाठी गेले होते. याचवेळी त्यांना कर्नाटकातील लोकप्रतिनिधी कोल्हापुरात आल्याची बातमी मिळाली होती. त्यांनी थेट अंबाबाई मंदिरात आलेल्या लोकप्रतिनिधींना अडवत जाब विचारला की, मराठी भाषिकांना मराठी एकीकरण समितीच्या महामेळाव्याला येऊ दिले जात नाही. तर, तुम्हालाही महाराष्ट्रात फिरू देणार नाही, अशी भूमिका त्यांनी मांडली होती. तसेच, ठाकरे सेनेचे उपनेते विजय देवणे म्हणाले की, सोमवारी शिवसैनिक महामेळाव्यासाठी जात असताना कोगनोळी येथे त्यांना अडवण्यात आले होते. मेळाव्यादरम्यान मराठी भाषकांना अटक करण्यात आली. ही दडपशाही आम्हाला मान्य नाही. जर कर्नाटकमध्ये जात असताना मराठी भाषकांना अडवत असतील आणि कर्नाटकातील लोकप्रतिनिधी महाराष्ट्रात, कोल्हापुरात येत असतील, तर शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षातर्फे कर्नाटकांच्या लोकप्रतिनिधींना अडवणार, असे त्याचवेळी जाहीर केले होते. त्यामुळे गुरूवारी अंबाबाई मंदिरात आलेल्या कर्नाटकातील आमदार, माजी मंत्र्यांना अडवण्यात आले होते.

# 'धनेश' वाचविण्यासाठी निसर्गप्रेमी एकवटले

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

जंगलतोडीमुळे प्रजाती अस्तित्वाच्या भवितव्यासाठी धडपडणाऱ्या 'हॉर्नबिल' अर्थात 'धनेश' पक्ष्याला वाचविण्यासाठी आता निसर्गप्रेमी पुढे आले आहेत. जिल्हाभरात चळवळ उभी करण्याच्या दृष्टीने धनेशची घरटी असलेल्या ठिकाणांची माहिती गोळा करण्यासाठी गावोगाव सरपंचांसह निसर्गप्रेमींना आवाहन करण्याबाबत नियोजन करण्यात येत आहे. तसेच, चिपळूण शहर परिसरात 'हॉर्नबिल फूड प्लान्ट नर्सरी' उभारण्याच्या दृष्टीने नियोजन करण्यात येत आहे. या संदर्भात नुकतीच पर्यावरण व पक्षी निरीक्षक अभ्यासकांची बैठक झाली.

देवरूख येथील नर्सरीच्या धर्तीवर चिपळूण अर्थात उत्तर रत्नागिरी विभागासाठी उपयुक्त



ठरेल, अशी नर्सरी उभारण्याकरिता प्रयत्न सुरू झाले आहेत. नुकत्याच झालेल्या बैठकीत 'हॉर्नबिल अर्थात धनेश' या पक्ष्याच्या प्रजातीचे संवर्धन करण्यासाठी त्याचबरोबर अन्य दुर्मीळ होत असलेल्या पक्ष्यांबाबत अभ्यास करण्यासाठी चर्चा करण्यात आली. धनेश पक्ष्याची प्रजाती पर्यावरण व निसर्ग संतुलनाच्या दृष्टीने महत्त्वाची मानली जाते. या प्रजातीमध्ये भविष्यात वाढ होण्याकरिता आता पक्षी अभ्यासक पर्यावरण व निसर्गप्रेमींनी चळवळ उभी करण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत. त्या करिता जिल्हाभरातील गावागावातून निसर्गप्रेमींसह गावातील प्रमुख गावकर, सरपंच यांच्या माध्यमातून धनेशची घरटी असलेल्या झाडांची व ठिकाणांची माहिती गोळा करण्याकरिता नियोजन सुरू झाले आहे. त्यानुसार लवकरच संबंधित व्यक्तिंना संपर्क करून अशी माहिती निसर्गप्रेमींकडे कशाप्रकारे पाठवावी, याचे नियोजन हाती घेण्यात आले आहे.

# शिंदेंच्या आमदारांवर महायुतीची नाराजी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

महायुती सरकारमध्ये मंत्रीपदांवरून धुसफुस कायम आहे. अधिकच्या मंत्रीपदांसाठी अडवणूक करणाऱ्या शिंदे गटाबद्दल भारतीय जनता पक्षासह अजित पवार गटातील आमदारही नाराजी व्यक्त करत आहेत. इतकेच नव्हे तर शिंदे गटातच आपापसात यावरून वाद निर्माण झाले आहेत. भ्रष्टाचाराचे आरोप असलेल्या आणि आपल्याच आमदारांची



कामे टाळणाऱ्या मंत्र्यांना पुन्हा मंत्रीपद देऊ नका, असा सूर शिंदे गटासह भाजप आमदारांमध्येही उमटत आहे.

शिंदे गटाकडे ५७ आमदार असल्याने हायप्रोफाईल खात्यांसह अधिकची मंत्रीपदेही मिळावीत यासाठी एकनाथ शिंदेंची धडपड सुरू आहे. परंतु, अनेक मंत्र्यांबद्दल शिंदे गटातील आमदारांचीच तक्रार असल्याने त्या मंत्र्यांना पुन्हा मंत्रीपद देण्यास भाजपकडूनही विरोध होत आहे. त्यात अब्दुल सत्तार, संजय राठोड, तानाजी सावंत, गुलाबराव पाटील, दादा भुसे यांच्यासह केसरकर यांचा समावेश आहे. त्यांनी मंत्रीपदावर असताना आपली कामे जाणीवपूर्वक रखडवली, असा आमदारांचा आरोप आहे.

# शाळेसमोर दारूच्या बाटल्यांचा खच

**। तळा । वार्ताहर ।**

तळा शहरातील रायगड जिल्हा परिषदेच्या मराठी शाळेसमोर असलेल्या मैदानावर मोठ्या प्रमाणावर दारूच्या रिकाम्या बाटल्या पडलेल्या अवस्थेत आढळून आल्या आहेत. यामुळे रात्रीच्या वेळी हे मैदान मद्यपींचा अड्डा बनला असल्याचे दिसून येत आहे.

शहरातील मराठी शाळेसमोर असलेल्या गोपीनाथ वेदक मैदानावर शाळेतील विद्यार्थी नेहमी खेळाचा सराव करत असतात. हिवाळी क्रीडा स्पर्धा जवळ आल्याने या मैदानावर नेहमीच विद्यार्थ्यांची वर्दळ असते. गुरूवारी सकाळी विद्यार्थी व शिक्षक वर्ग शाळेत येत असताना त्यांना शाळेसमोरच मैदानावर दारूच्या रिकाम्या बाटल्या पडलेल्या व काही फुटलेल्या अवस्थेत दिसून आल्या. हे दृश्य पाहून शिक्षक व विद्यार्थ्यांकडून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. पोलिसांनी रात्रीच्या वेळी गस्त घालून अशा मद्यपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

## मराठी साहित्य संमेलनाची तारीख जाहिर

# २१ फेब्रुवारीपासून दिल्लीत आयोजन

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

**यंदा अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन दिल्लीमध्ये होणार आहे. २१ ते २३ फेब्रुवारी दरम्यान या साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. शरद पवार हे या साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष असणार आहेत. त्यामुळे त्यांनी पत्राद्वारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना प्रमुख अतिथी म्हणून या साहित्य संमेलनाला उपस्थित राहण्याची विनंती केल्याची माहिती समोर येत आहे.**




दरम्यान, काही दिवसांपूर्वी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे, विधानसभा निवडणुकीपूर्वीच हा निर्णय घेण्यात आला आहे. या सर्व पार्श्वभूमीवर हे साहित्य संमेलन विशेष असणार आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र पाठवले आहे. ज्यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्लीत होणाऱ्या मराठी साहित्य संमेलनाला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहावे, अशी विनंती त्यांनी केली आहे.

यंदाचे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन दिल्लीमध्ये होणार आहे. शरद पवार हे या साहित्य संमेलनाचे स्वगत अध्यक्ष आहेत. त्यामुळे शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मराठी साहित्य संमेलनाला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहण्याची विनंती केली आहे. यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार का, हे पाहाणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# हिंदूंच्या रक्षणासाठी मुस्लीम रस्त्यावर

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

बांगलादेशमध्ये सुरू असलेल्या हिंदुवरील अत्याचार याच्या विरोधात बुधवारी (दि.११) मुंब्रा येथील दारूल फलाह मशिदीसमोर मुस्लीम बांधवांकडून निषेध आंदोलन करण्यात आले होते. बांगलादेश येथील हिंदू बांधवांच्या रक्षणासाठी केंद्र सरकारने आंतरराष्ट्रीय पातळीवरून बांगलादेश युनिस सरकारवर दबाव आणावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे.

शेख हसीना यांना सत्तेतून हटवल्यानंतर बांग्लादेशात अल्पसंख्य समुदाय, विशेषतः हिंदूंवर हल्ल्यांमध्ये वाढ झाली आहे. नुकतेच हिंदू भिक्षू चिन्मय




कृष्ण दास यांना राजद्रोहाच्या खटल्याखाली अटक करण्यात आली आहे. या घटनेनंतर हिंसा उफाळून आली. कट्टरपंथीयांनी हिंदूंवर अत्याचार करण्यास सुरूवात केली. यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर संताप व्यक्त होत आहे. या हिंसाचाराचा निषेध करण्यासाठी मौलाना अब्दुल वहाब, मौलाना एहसान, मौलाना अय्याज, शाहरूख सय्यद, कादीर मेमन, सहार युनीस शेख यांच्यासह मुंब्रा-कौसा येथील मौलवी, मुस्लीम बांधवांनी निदर्शने केली. यावेळी 'हिंदू बांधवांचे रक्षण करा', असे फलक झळकवित आंदोलकांनी बांगलादेश सरकारविरुद्ध जोरदार घोषणाबाजी केली.

निवडक

## दिघोडे येथे ज्ञानेश्वरी पारायण

**पनवेल :** दिघोडे ग्रामस्थ मंडळाच्या व्यवस्थापनाखाली ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा श्री हनुमान मंदिर दिघोडे येथे आयोजित करण्यात आला होता. श्री समर्थ गोविंदबाबा वहाळकर यांच्या हस्ते मंगल कलश पूजन करून सोहळ्याची सुरुवात झाली. यावेळी पनवेल महानगर पालिका माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे उपस्थित होते. श्री १००८ महामंडळेश्वर रामकृष्णानंद सरस्वती महाराज यांच्या नेतृत्वाखाली भव्य ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन केले होते.

## तंबाखूमुक्त कार्यशाळा !

**माणगाव :** लोकनेते अशोकदादा साबळे विद्यालयात माणगाव गट शिक्षण अधिकारी सुरेखा तांबट यांच्या मार्गदर्शनाखाली तालुकास्तरीय तंबाखूमुक्त कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेमध्ये सर्व जिल्हा परिषदेचे तसेच खाजगी शाळेचे ७७ मुख्याध्यापक उपस्थित होते. या कार्यशाळेच्या माध्यमातून प्रशांत उबाळे यांनी उपस्थित मुख्याध्यापकांना तुमच्या शाळा तंबाखू मुक्त करून विद्यार्थ्यांना तंबाखूच्या विषारी व्यख्यापासून दूर ठेवण्यासाठीचे महत्त्वपूर्ण माहिती दिली.

## हनुमान नगर येथे श्रीदत्त जयंती

**खांबः** घोसाळे रोड हनुमान टेकडीच्या पायथ्याशी वसलेल्या हनुमान नगर येथील श्री दत्त मंदिर येथे दत्तजयंती जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त विविध धार्मिक व अध्यात्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती ग्रामस्थांकडून देण्यात आली आहे. गेल्या अनेक वर्षांची यशस्वी परंपरा राखत संपन्न होणाऱ्या श्रीदत्त जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त धार्मिक तथा अध्यात्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न होणार आहेत.

## वेतनकरारास मंत्र्यांची मंजुरी

**मुंबई :** भारतातील बंदर व गोदी कामगारांना १ जानेवारी २०२२ पासून लागू होणारा वेतन करार २७ सप्टेंबर २०२४ रोजी मुंबई येथे संपन्न झाला असून, या वेतन कराराला केंद्रीय नौकानयन मंत्री सर्वानंद सोनोवाल यांनी मंजुरी दिली असल्याचे मंत्रालयाचे सचिव सुजित कुमार यांनी लेखी आदेशाने कळविले आहे. झालेल्या वेतन कराराची अंमलबजावणी त्वरित करण्यासाठी भारतातील प्रमुख बंदरांमध्ये सर्व कामगार संघटनांनी एकजुटीने आंदोलन केले.

## गुरुदत्त मंदिराचा वर्धापनदिन

**नेरळ :** नेरळ गावात २५ ग्रामस्थांनी एकत्र येत तेथील चिंचेच्या झाडाखाली समाज प्रबोधनाचे काम करण्याच्या इराद्याने मंदिर बांधण्याचा निर्णय घेतला. चिंचआळी ग्रामस्थ यांनी एकत्र येत नेरळ गावात नसलेले श्री दत्तगुरु महाराज यांचे मंदिर बांधले. त्या मंदिराला २७ वर्षे पूर्ण झाली असून मर्गाशिष एकादशीपासून श्री दत्त जयंतीपर्यंत महोत्सव साजरा होत आहे.दरम्यान, मंदिर संस्थानकडून श्री गुरुदत्त जयंती उत्सव सोहळा ११ डिसेंबर ते १४ डिसेंबर या कालावधीत साजरा होणार आहे.

# पिक विम्यासाठी शेतकऱ्यांचा पुढाकार

### सात हजार ७३४ शेतकऱ्यांनी उतरविला विमा; विमा योजनेसाठी शासनाकडून सुमारे ६४ कोटी रुपयांची तरतूद

**। अलिबाग । प्रमोद जाधव ।**

**बदलत्या हवामान अवकाळी पाऊस अशा अनेक समस्यांमुळे आंबा उत्पादक शेतकरी कायमच संकटात सापडला आहे. त्यामुळे या शेतकऱ्यांनी फळपीक विमा उतरवण्यासाठी पुढाकार घेतला आहे. यावर्षी सात हजार ७३४ शेतकऱ्यांनी विमा उतरविला आहे. गतवर्षीच्या तुलनेने यावर्षी एक हजारहून अधिक शेतकऱ्यांनी विमा काढल्याची माहिती कृषी विभागाकडून प्राप्त झाली आहे.**





रायगड जिल्ह्यामध्ये एक लाख हेक्टर हून अधिक भात पिकाचे क्षेत्र आहे. भात पिकाबरोबरच गेल्या काही वर्षापासून फळपीक लागवडीवरही शेतकरी लक्ष देऊ लागले आहेत. शेत जमीनीबरोबरच मोकळ्या जागेमध्ये आंब्याची लागवड शेतकरी करीत असल्याचे चित्र आहे.

जिल्ह्यामध्ये फळपिकाचे क्षेत्र २२ हजार २४४ हेक्टर इतके आहे. त्यामध्ये आंबा लागवडीचे क्षेत्र १५५४७ हेक्टर इतके आहे. त्याम ध्ये उत्पादन उत्पादनक्षम क्षेत्र सुमारे १३ हजार हेक्टर आहे. फळपिक लागवडीच्या ७० टक्के क्षेत्र आंब्याचे असल्याची माहिती समोर येत आहे.

जिल्ह्यामध्ये वीस हजारहून अधिक आंबा उत्पादक शेतकरी आहेत. आंब्याचे क्षेत्र वाढावे शेतकऱ्यांना त्यातून उत्पन्न मिळावे यासाठी कृषी विभागाकडून प्रोत्साहन दिले जाते. त्यामुळे तरुणाई देखील आंबा लागवडीवर भर देत आहे.

मात्र जिल्ह्यामध्ये अवकाळी पाऊस पडणे वातावरणात बदल होणे या प्रकारामुळे अंबा उत्पादनावर त्याचा परिणाम होत आहे. शेतकरी आर्थिक अडचणीत सापडण्याची भीती कायमच राहिली आहे.

त्यामुळे पुनर्रचित हवामान आधारित फळपिक विमा योजना गेल्या काही वर्षांपासून सुरू आहे. जिल्ह्यातून सुरुवातीला या योजनेला फारसा प्रतिसाद मिळाला नाही परंतु गेल्या दोन वर्षात यामध्ये आमुलाग्र बदल झाल्याचे चित्र आहे.

मागच्या वर्षी ६ हजार ३२९ शेतकऱ्यांनी फळ पिक विमा उतरवला होता. त्यासाठी शेतकऱ्यांना २९ हजार रुपये मोजावे लागले होते. या शेतकऱ्यांना १९ कोटी ५० लाख रुपयाची रक्कम विम्याच्या स्वरूपात प्राप्त झाल्याची माहिती कृषी विभागाने दिली.

यावर्षी देखील पिक विमा उतरवण्यासाठी कृषी विभागाकडून आवाहन करण्यात आले होते. या आवाहनाला शेतकऱ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. नोव्हेंबर अखेरपर्यंत सात हजार ६३४ शेतकऱ्यांनीयावर्षीपिकविमाकाढला आहे. यंदा मात्र पिक विम्यासाठी १४ हजार रुपये शेतकऱ्यांना मोजावे लागले. गतवर्षीच्या तुलनेने यावर्षी १५ हजार रुपये कमी खर्च झाले. विमा योजनेसाठी शासनाकडून सुमारे ६४ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आले आहे.

### अशी करावी लागते मेहनत

**झाडाच्या बाजूला असलेले गवत काढणे, सुकलेल्या फांद्या काढणे, झाडाच्या बाजूला खड्डा करून त्यावर पालापाचोळा टाकून सेंद्रीय खत तयार करणे, फवारणी करणे, आंबे काढणे, पेटीत ठेवणे, त्याची वाहतूक करणे अशू अनेक कामे शेतकऱ्यांना करावी लागतात.**

## धार्मिक पर्यटन स्थळांची सहल संपन्न

**। उरण । वार्ताहर ।**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांचा किमान एक किल्ला सेकंडरी स्कूल चिरनेर दहावी १९८५ ग्रुपच्या प्रत्येक सहलीत पाहिला जातो. या ग्रुपची सहल इंदोरी किल्ला, चाकणचा संग्रामदुर्ग, तुळापुर, वढू बुद्रुक, लेण्याद्री, शिवनेरी, ओझर येथे गेली होती.या सहलीत चिरनेर, भोम, कळंबुसरे येथील १६ वर्गमित्रांचा समावेश होता.

३२० मावळ्यांच्या सोबतीने फिरंगोजी नरसाळा याने हजारो मोगल सैन्याबरोबर ५५ दिवस लढा दिला होता. त्या किल्ल्याची आता बरीच पडझड झाली आहे.छत्रपती शिवाजी महाराज यांची जन्मभूमी असलेला शिवनेरी किल्ला ५०० पायऱ्या न थांबता, न थकता हे ५५ ते ६० वयाचे वर्गमित्र सहज चढून गेले. छत्रपती शिवाजी महाराज की जय, धर्मवीर संभाजी महाराज की जय, जिजाऊ माते की जय, जय भवानी..जय शिवराय या घोषणांनी किल्ले परिसर दुमदुमुन जात होता. छत्रपती शिवाजी महाराज यांची मंदिरे, स्मारके उभारण्यापेक्षा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या किल्ल्यांकडे लक्ष देऊन त्यांची डागडुजी करणे आवश्यक आहे. तरच छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास पुढील पिढीला समजेल असे मत मिलिंद खारपाटील यांनी व्यक्त केले. याचबरोबर सुर्यकांत म्हात्रे, प्रकाश नारंगीकर, प्रकाश फोफेरकर, रोहिदास ठाकूर यांनीही विचार मांडले.

शिवनेरी किल्ल्याजवळ पारुंडे येथे असलेल्या वेद कस्तुरी मचाण हाऊस मध्ये वस्ती करण्यातआली. निसर्गसौंदर्याने नटलेल्या, निसर्गाची सानिध्यात असलेल्या या मचाण हाऊस मध्ये मित्रांनी भरपूर मजा केली.ही दोस्ती तुटायची नाय या कवितेची आठवण यावेळी झाली. या सहलीत वर्गमित्रांकडून बनवले जाणार्या स्वादिष्ट जेवणावर सर्व मित्रांनी यथेच्छ ताव मारला. या सहलीत अष्टविनायकांपैकी लेण्याद्री आणि थेऊर या देवस्थानाचे दर्शन करण्यात आले.

## श्रमसंस्कार निवासी शिबिराचे उद्घाटन

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

युथ फॉर माय भारत, युथ फॉर डिजीटल लिटरसी हे सुंदर ब्रीद वाक्य घेवून राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार निवासी शिबिराचे आयोजन दरवर्षी केले जाते. संपूर्ण जगात भारत देश युवकांचा राष्ट्र ओळखले जाते. आपण नशीबवान आहात, एनएसएस कॅम्प सहभागी होण्याची संधी मिळाली आहे. मुलींना सात दिवस दूर राहण्याची संधी दिली म्हणजे आईवडीलांचा तुमच्यावर प्रचंड विश्वास आहे. तो विश्वास सार्थकी ठरवत शिबिरात चांगले काम करण्याचे आवाहन केटीएसपी मंडळाचे कार्यवाह किशोर पाटील यांनी उद्घाटनप्रसंगी बोलताना केले.

ते पुढे म्हणाले की होराळे गावातील विठ्ठल मंदिरात गुरूवर्य रामदास महाराज यांच्या मार्गदर्शन कामकाज चालतं या पवित्र ठिकाणी शिबीर होतय हे भाग्यचं आहे.

मुंबई विद्यापीठ अंतर्गत के.एम. सी.महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग मार्फत युथ फॉर माय भारत,युथ फॉर डिजीटल लिटरसी हे सुंदर ब्रीद वाक्य घेवून होराळे गावात विशेष श्रमसंस्कार निवासी शिबीर सात दिवस चालणार आहे. या शिबीराचे उद्घाटन केटीएसपी मंडळाचे उपाध्यक्ष अबुबकर जळगांवकर यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी कार्यवाह किशोर पाटील,संचालक दिनेश गुरव, राजू अभाणी, कॉलेजचे प्र. प्राचार्य दयानंद गायकवाड, जयंत पाठक, होराळे ग्रामपंचायत सदस्य केशव बुरूमकर, सुधाकर पाटील, कल्पेश पाटील, डॉ.प्रा.विकास सुर्यवंशी, डॉ. प्रा. गाडे, डॉ. प्रा.विनायक गांदल, डॉ. प्रा. पंचगले, प्रा.हिरवा आदी उपस्थित होते.

राष्ट्रीय एकात्मता, राष्ट्रीय सहिष्णूतेचे धडे एनएनसमधून मिळतात ते धडे घेवूनच देशपातळीवरचे विद्यार्थी घडून देश पातळीवर नेतृत्व करतात असे मत प्र. प्रचार्य दयानंद गायकवाड यांनी बोलताना सांगितले.

## दुचाकी अपघातात एक गंभीर

**म्हसळा :** सकलप फाट्याजवळ दुचाकीस्वाराने रस्त्यावरील म्हशीला धडक मारून गंभीर जखमी झाल्याची घटना घडली. अरविंद पांडुरंग पवार हे आपली दुचाकी घेऊन तहसील कार्यालय म्हसळाकडे येत असता सकलप फाट्याजवळ उभ्या आसलेल्या म्हशीला जोरदार धडक मारून अपघात घडला. यामध्ये अरविंद पवार यांच्या डोक्याला गंभीर जखमा झाल्या. रुग्णालयाचे डॉ.महमद रहाटविलकर यांनी रुग्णावर उपचार करून माणगाव येथे पाठविले. तेथून त्यांना अधिक उपचारासाठी मुंबईकडे पाठविल्याचे समजते.

## खालापूरात जलजीवन मिशनची आढावा बैठक

**। खोपोली । प्रतिनिधी ।**



जल जीवन मिशन अंतर्गत पाणी योजनेचे काम लवकरात लवकर करा असे आदेश गटविकास अधिकारी संदीप कराड यांनी संबंधित ठेकेदारांना आढावा बैठकीत दिले आहे.तर तांत्रिक आडचणी दुर करीत मे महिण्याच्या योजना पूर्ण होतील असा विश्वास गटविकास अधिकारी संदीप कराड यांचे बैठकी दरम्यान बोलताना व्यक्त केला आहे.

राष्ट्रीय जलजीवन मिशन अंतर्गत नळपुरवठा योजनेअंतर्गत एकूण९२योजनासुरूआहे.यामधील २० योजना पूर्ण झाली आहे. उर्वरीत योजनासांठी कोट्यवधीचा निधी उपलब्ध होवून योजना पूर्ण होत नसल्यामुळे भविष्यात पाणी टंचाईला सामोरे जावे लागू शकते यामुळेच सदरील योजनेचा आढावा घेण्यासाठी ग्रामपंचायतीचे सरपंच, ग्रामसेवक आणि ठेकेदार यांची संयुक्त बैठक गटविकास अधिकारी संदीप कराड यांच्या अध्यक्षतेखाली पंचायत समितीच्या सभागृहात आयोजित केली होती.याप्रसंगी पाणीपुरवठा विभाग उपअभियंता संतोष चव्हाण,सर्व ग्रामपंचायतीचे सरपंच,ग्रामसेवक,संबंधित ठेकेदार उपस्थित होते.

खालापूरात ९२ नळपाणी पुरवठा योजना सुरू आहे त्यामधील २० योजना पूर्ण झाल्या आसून ८ योजना आठवड्यात पूर्ण होतील उर्वरीत योजनांना जागेचा किंवा इतर तांत्रिक आडचणी येत आहेत.अशी तक्रार लक्षात घेवून सरपंच आणि ठेकेदारांची संयुक्त बैठक घेवून तांत्रिक आडचणी सोडविण्याचा प्रयत्न करीत येत्या दोन महिण्यात योजना पूर्ण करण्याचे आदेश दिल्याचे गटविकास अधिकारी संदीप कराड यांनी सांगितले.

## निता पाटील यांचे निधन

**। भाकरवड । वार्ताहर ।**

निवृत्त मुख्याध्यापिका निता पाटील यांचे वयाच्या ६४ व्या वर्षी हृदयविकाराच्या झटक्याने मंगळवारी (दि.१०) निधन झाले.

निता पाटील या प्राथमिक शिक्षिका म्हणून कार्यरत होत्या. त्यांनी शिक्षिका ते मुख्याध्यापिका अशी ३५ वर्ष सेवा केली. आपल्या सेवेत माणगाव, मुरूड, चौल, नागाव बंदर, भाकरवड, पेझारी येथे सेवानिवृत्त झाल्या त्यांच्यावर कमळपाडा गावच्या स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांचे दशक्रिया विधी गुरुवारी (दि.१९) ओंकारेश्वर मंदिर पेझारी येथे तर तेरावे रविवारी (दि.२२) राहत्या घरी होणार आहेत. त्यांच्या पश्चात मुलगा अभय, मुलगी मिनल, शामल, नातू , दिर, भावजय, जावई असा मोठा परिवार आहे.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- वरसोली, रायगड.. आदर्श नगर येथे N.A.४.५ गुंठे चे (एकूण ३६ गुंठे), ८ प्लॉट एकत्रित अथवा वेगवेगळे विकणे आहेत. अपेक्षित किंमत ₹.६३ लाख प्रत्येकी, एकत्रित ५.०४ कोटी (५ कोटी ४ लाख) संपूर्ण चेक पेमेन्ट - ९८२२२५७९२९
- किहीम, रायगड.. समुद्रकिनाऱ्यापासून ३५० मीटर अंतरावर ३५० मिटर चा प्लॉट विकणे आहे. अपेक्षित किंमत ₹.१.०५ कोटी, (१ कोटी ५ लाख) बंगल्या साठी योग्य - ९८२२२५७९२९
- नोकरी! नोकरी !! नोकरी!!! ✻ नवोदित पाहिजेत..✻ केवळ पुरुष उमेदवार, शिक्षण -१२वी, पदवीधर, द्वी पदवीधर . पगार - ₹१०,०००/- ते १२०००/- पर्यंत. (योग्यतेनुसार) कामकाज कालावधी - दिवस पाळी ८ तास. ठिकाण - अलिबाग, चेंढरे. ९८२२०९५८०३.
- अलिबाग एस्टीस्टँन्डजवळ दुकान गाळा विक्री करणे आहे. ९७६४५४८६७९
- अलिबागमध्ये ऑफिस कामासाठी कॉम्प्युटर नॉलेज असलेली मुलगी पाहिजे. संपर्क :- ९२६०१०१४४७
- रिसोर्टमध्ये काम करण्यास जोडपं हव आहे !! संपर्क : ९६०७१०२३५७ ठिकाण - सासवणे
- तत्काळ पाहिजे : अलिबाग येथे हॉटेलमध्ये काम करण्यासाठी असिस्टंट कुक आणि वेटरची आवश्यकता आहे. संपर्क : ०८४८३९७३१०३
- अलिबागपासून एक किलोमीटर अंतरावर एक एकर रहिवासी (R zone) जमीन रिसॉर्ट साठी लीजवर देणे आहे. संपर्क : ९९६०२६४६६०/९४२२४९४६०३
- सहारा ट्रॅव्हल्स अलिबाग मध्ये ऑफिस कामासाठी स्थानिक मुलगी पाहिजे १०/१२ वी ९२७०५६०४५६

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## बोर्लीमांडला येथे सिकलसेल सप्ताह

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**



मुरूड तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र बोर्ली-मांडला येथे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. पायल राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली रुग्णांची सिकलसेल सोल्युबिलिटी तपासणी करण्यात आली. सिकलसेल पांढरे कार्ड निरोगी रुग्णांना देण्यात आले.

यावेळी तालुका सिकलसेल सहाय्यक शालीकराव पावरा यांनी सिकलसेल आजाराविषयी सविस्तर माहिती सांगताना म्हणाले की, सर्वसाधारण व्यक्तीच्या शरीरात लाल रक्त पेशींचा आकार गोल व लवचिक असतात पेशींचे आयुष्य १२० दिवस असते. पण सिकलसेल आजारामध्ये या पेशींना ऑक्सिजन मिळाला नाही तर विळ्यासारखा होतो. सिकलसेल पेशींचे आयुष्य हे २० ते ३० दिवस असते. इंग्रजी भाषेत सिकल म्हणजे विळा आणि सेल म्हणजे पेशी म्हणून या आजारास सिकलसेल आजार असे म्हणतात. सिकलसेल हा लाल पेशीमध्ये होणारा आजार आहे.

सिकलसेल रुग्णांमध्ये रक्तक्षय कमी असणे, अशक्तपणा, हातापायावर सुज येणे, कमरेची व सांधेदुखी काविळ, पक्षघात, पित्ताशय न भरून येणाऱ्या जखमा, मूत्रपिड निकामी होणे, डोळ्यांवर परिणाम होणे, असह्य वेदना, जंतुसंसर्ग, शारीरिक त्रास मानसिक त्रास अशी लक्षणे आढळतात.

सिकलसेल सोल्युबिलिटी टेस्ट ही चाचणी जिल्हा सामान्य रूग्णालय, ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र, मोफत तपासणी केली जाते तरी रुग्णानी यांचा फायदा घ्यावा असे आवाहन यावेळी तालुका सिकलसेल सहाय्यक शालीकराव पावरा यांनी केले.

डॉक्टरचा सल्ला घेणे, अँटिबायोटिक, हायड्रॉक्सीयुरिया गोळ्या घेणे, रक्त वाढीसाठी फॉलिक असिडच्या गोळ्या नियमित घेणे, सिकलसेल रुग्णांनी अति परिश्रम कामे न करणे, वेळीवेळी विश्रांती घेणे, आहारामध्ये पालक, बिट, गुळ, शेंगदाणे, डाळिंब, शेवंगाची भाजी, काळे मनुके, खजूर, मासे, अंडी, संत्री, हिरव्या पालेभाज्या, मोड आलेले कडधान्य पदार्थ खाणे आवश्यक आहे, असे यावेळी डॉ. पायल राठोड यांनी सांगितले.

## ज्ञानप्राप्ती ही यशाची गुरुकिल्ली -डॉ. कोकणे

**। रसायनी । वार्ताहर ।**

कौशल्य विकास व स्वच्छता उपक्रम आदींना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय सेवा योजना (एन. एस. एस.) विभाग अभिनव ज्ञान मंदिर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय व जे. एस. एस. रायगडच्या माध्यमातून प्लास्टिक बंदी जनजागृती उपक्रम राबवण्यात आला. सदर उपक्रमाप्रसंगी गावकऱ्यांना व एन.एस.एस स्वयंसेवक यांना यशाची गुरुकिल्ली व कागदी पिशव्या बनवविणे ह्या विषयावर मार्गदर्शन मुख्य मार्गदर्शक डॉ. विजय कोकणे यांच्या माध्यमातून करण्यात आले.

संस्थापक अध्यक्षा डॉ. मेधा सोमैया, अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, उपाध्यक्ष रत्नप्रभा बेल्हेकर, संचालक डॉ. विजय कोकणे, अभिनव ज्ञान मंदिर संस्थेचे अध्यक्ष श्री गणेश वैद्य, प्राचार्य डॉ. प्रवीण घोडविंदे व व्यवस्थापक मंडळ यांच्या मार्गदर्शनातून भारत सरकारच्या कौशल्य विकास योजने अंर्तगत कार्यक्रम राबवित असतांना याप्रसंगी जन शिक्षण संस्थान रायगडचे संचालक डॉ. विजय कोकणे, कार्यक्रम अधिकारी प्रा. सुजित देशमुख, प्रा. प्राचीता पालकर, प्रा. संजीवनी खांडेकर, प्रा. प्रतीक्षा माळी हिमांशू भालकर हे कर्मचारी व स्वयंसेवकदेखील कार्यक्रम राबवित असताना उपस्थित होते.

### १७ रथांच्या मिरवणुकीने भक्तीमय वातावरण

# नागोठण्यात जैन सकल संघाची नगर प्रदक्षिणा

**। नागोठणे । वार्ताहर ।**



नागोठणे नगरीतील सर्व नागरिकांच्या सुख-शांती-समृद्धी आणि अध्यात्म उन्नतीसाठी तसेच जीवनभर आपली कृपादृष्टी नागोठणे नगरीवर ठेवणारे नागोठणे अधिष्टाज तीर्थकर परमात्मा श्री चंद्रप्रभस्वामी दादांची १५० वर्षानंतरची नगरचर्या अर्थात मंदिरातून बाहेर आयोजित केलेली नगर प्रदक्षिणा परमपूज्य आचार्य भगवंत देवकीर्तिसूरीश्वरजी महाराज, परमपूज्य पन्यासप्रवर रत्नकीर्ति महाराज, चार गुरुदेव आणि १८ साध्वीजी भगवंत यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवारी(दि.११) संपूर्ण नागोठणे शहरातून मोठ्या उत्साहात संपन्न झाली.

जैन धर्मियांचे सर्वात मोठे तीर्थक्षेत्र असलेल्या राजस्थान राज्यातील पालीताना येथे या मूर्तींची निर्मिती करण्यात आली असून त्यानंतर १९१० साली या मूर्तींची प्रतिष्ठापना नागोठणे येथील जैन मंदिरात करण्यात आली.

नागोठणे जैन मंदिरातील मूर्ती घडविण्यात आलेल्या गोष्टीला १५० वर्षे पूर्ण झाल्याने बुधवारी (दि.११)सकाळी ९ वाजता सजविलेल्या १७ रथांमधून भगवान महावीर व इतर देवतांच्या मूर्ती विराजमान करून सुरू झालेली ही नगर प्रदक्षिणा नागोठण्यातील जैन मंदिरापासून सुरू करण्यात आली. नंतर बाजारपेठ, छत्रपती शिवाजी महाराज चौक, ग्रामपंचायत कार्यालय, नागोठण्याची ग्रामदेवता श्रीजोगेश्वरीमातामंदिर, गांधी चौक, के.एम.जी. विभाग प्रवेशद्वार मार्गे पुन्हा जैन मंदिरात पोहोचल्यानंतर दुपारी १.३० वाजण्याच्या सुमारास या नगर प्रदक्षिणाचा समारोप करण्यात आला.

या नगर प्रदक्षिणा दरम्यान रथांमधील विराजमान देवतांवर नागोठण्यातील सर्वच ठिकाणी तांदूळ व फुलांचा वर्षाव करण्यात आला. नगर प्रदक्षिणाच्या निमित्ताने नागोठण्यात ठिकठिकाणी आकर्षक रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या तसेच स्वागताचे बॅनरही लावण्यात आले होते.

दुःख, दारिद्र्य यांचा नाश करून सर्वांना सर्व प्रकारची भरभराटी लाभावी तसेच देवतांची कृपादृष्टी सर्वांना मिळून सर्वांना सुख-शांती लाभावी यासाठी सजवलेल्या रथांमध्ये विराजमान करण्यात आलेल्या भगवान महावीर व इतर देवतांवर जैन व इतर समज बांधवांनी पुष्पवष्टी करून देवतांचे मनोभावे दर्शन घेतले.

हा धार्मिक सोहळा यशस्वी होण्यासाठी जैन सकल संघ नागोठणेचे अध्यक्ष प्रकाश जैन, जुगराज जैन, किशोर जैन, नरेंद्र जैन, जैन सकल संघाचे सर्व पदाधिकारी व नागोठण्यातील जैन बांधव यांनी सहकार्य केले.

# अतिक्रमणांवर लक्ष ठेवण्यासाठी जीआयएस यंत्रणा

**। पनवेल। वार्ताहर ।**

शहरात वाढणारी बेसुमार अनधिकृत बांधकामे, रस्त्यावर थाटलेली दुकाने तसेच फेरीवाल्यांचा उन्माद रोखण्यासाठी याबाबत पारदर्शक उपाय म्हणून पनवेल महानगरपालिका जीआयएस यंत्रणेद्वारे या अतिक्रमणांवर लक्ष ठेवणार आहे. खासगी संस्थेची याकरिता नियुक्ती करण्यात येणार आहे. नुकत्याच पालिकेच्या महासभेत याबाबत निर्णय घेण्यात आला.

सद्यःस्थितीत पूर्वाश्रमीच्या नगरपरिषद भागात आणि ग्रामीण भागात तसेच झोपडपट्टी, तळोजा एमआयडीसी भागात मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केले जात आहे. जीआयएस यंत्रणेद्वारे याच्यावर लक्ष ठेवल्यास वाढणारी अतिक्रमणे पालिकेच्या त्वरित निदर्शनास येतात. त्यामुळे पनवेल महापालिका या तंत्रज्ञानाचा वापर करीत आहे. प्रशासक मंगेश चितळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सर्वसाधारण सभेत जीआयएसप्रणालीवर आधारित अतिक्रमण नियंत्रण यंत्रणा उभारण्याच्या निर्णयाला मंजुरी देण्यात आली. प्रत्येक चार महिन्यांनंतर महापालिका क्षेत्रातील सॅटेलाईट इमेज घेतली जाईल.

## वाढणाऱ्या झोपडपट्टीवर नियंत्रण

**व्होट बँकेसाठी झोपडपट्टी वसविण्याचे प्रकार मुंबई, नवी मुंबईमध्ये झाल्याचे पहावयास मिळाले आहेत. पनवेलमध्येदेखील असे प्रकार सुरुवातीच्या काळात झाले. मात्र, पालिकेने त्यावर वेळेत आळा घातला होता. या यंत्रणेमुळे निश्चितच इतर अनधिकृत बांधकामांसह बेकायदेशीर झोपडपट्टी वाढीवर नियंत्रण राहणार आहे.**

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करूनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीत उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## जाहीर नोटीस

तमाम जनतसे या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते कि, मौजे सासवणे, तलाठी सजा धोकवडे, तालुका अलिबाग जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची शेत जमिन मिळकत आमच्या अशिलानी मिळकतीचे विद्यमान मालक श्री.गणेश कृष्णा भगत, राहणार सासवणे, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड यांचेकडून कायम स्वरूपी खरेदी करण्याकरीता आर्थिक व्यवहार केला असून बयाना/साठेकरार केलेला आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे,

**मौजे सासवणे, तलाठी सजा धोकवडे, तालुका अलिबाग जिल्हा रायगड**

| गाव | सर्वे नं./गट क्र.व उपविभाग | एकूण क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| इंद्रपै | १०/१ | ०.१८.८० हे.आर. | रू.३.४३ पैसे |

वरील शेतजमिन मिळकत विद्यमान मालकाच्या प्रत्यक्ष ताबे कब्जात असून निर्वेध व बोजारहित असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिला आहे, मात्र याउपर सदर मिळकतीवर अथवा मिळकतींच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध तारण, गहाण, लिन, लीज, चार्ज, पोटगी, बोजा, दान, बक्षीस, वारस हक्क, ताबा, कब्जा, वहिवाट, करार, साठेकरार, आर्थिक व्यवहार, फरोक्त, विक्री, जाण्या-येण्याच्या हक्क, इजमेंट अथवा कोणत्याही स्वरूपाचा हक्क, हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार यांचेकडे कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकती दाखल कराव्यात, वरील मुदतीत हरकती प्राप्त न झाल्यास वर नमूद केलेली मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहेत असे समजून विक्री व्यवहार पूर्ण केला जाईल. व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची समज घ्यावी.

अलिबाग — आपला

तारीख : १२/१२/२०२४

**(ॲड.प्रविण म्हात्रे)**
नागडोंगरी-चेंढरे, अलिबाग-रायगड
९८२२११४६४८/९८२२१२४६४८

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक दिपक चंद्रकांत खारकर व अनघा दिपक खारकर यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशीलवार वर्णन पुढीलप्रमाणेः-

**मौजे-ढाक तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| भूमापन क्रं व उपविभाग सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार(रू.पै.) |
|---|---|---|
| १०/१२ | एकूण क्षेत्र १-२३-०० हे.आर.पॉ | ०-५६ |
| १०/१३ | एकूण क्षेत्र १-११-०० हे.आर.पॉ | ०-५५ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयाना-पावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांनी आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हाला ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : १३/१२/२०२४

खरेदीदारा तर्फे वकील
**ॲड.निलेश कान्हु मोरे** मोबा.९८२२६९११०९
ऑफिस पत्ता-शॉप नं.२९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर,
अमराई रोड, कर्जत ता.कर्जत, जि.रायगड ४१०२०१

## जाहीर नोटीस

अर्ज क्र. १६९/२०२४

**मे. कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात**

कु. आदिती विजय शिंदे
वय २८ वर्षे, धंदा : नोकरी,
रा. भांदरे, पो. कविलवहाळ, — अर्जदार
ता. माणगांव, जि. रायगड

विरुद्ध,

१. निबंधक जन्म - मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत मांगरूळ,
ता. माणगांव, जि. रायगड.
२. गटविकास अधिकारी सो., — सामनेवाला
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार कु आदिती विजय शिंदे हिचा जन्म मौजे भांदरे, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. १२/११/१९९६ रोजी राहत्या घरी झाला. त्यांची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दाखला २८/११/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार हिचा जन्म मौजे भांदरे, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. १२/११/१९९६ रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार कु. आदिती विजय शिंदे हिचा जन्म मौजे भांदरे, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. १२/११/१९९६ रोजी राहत्या घरी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव
ता. १२/१२/२०२४

सही/-
कार्यकारी दंडाधिकारी माणगांव

## जाहीर नोटीस

अर्ज क्र. :-१७०/ २०२४

**मे. कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्रीम. शुभांगी सुदाम सुर्वे
लग्नापूर्वीचे नाव
श्रीम. शुभांगी भरत हळदे
लग्नानंतरचे नाव
वय ३८ वर्षे, धंदा गृहिणी — अर्जदार
सध्याचा पत्ता :- रा. सी. १९५
जी.आर. रीव्हर पार्क सोसायटी,
कोजये सिंगणपुर, सुरत सीटी, सुरत,
गुजरात - ३९५००४
कायमचा पत्ता :- रा. बांदलवाडी,
ता. माणगांव, जि. रायगड.

विरुद्ध

१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत कडापे,
ता. माणगांव, जि. रायगड. — सामनेवाला
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्रीम. शुभांगी सुदाम सुर्वे - लग्नापूर्वीचे नाव व श्रीम. शुभांगी भरत हळदे - लग्नानंतरचे नाव यांचा जन्म मौजे बांदलवाडी, ता. माणगाव, जि. रायगड येथे दि. ०७/०४/१९८६ रोजी राहत्या घरी झाला. तिची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दाखला दि. ०४/१२/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार हिने या न्यायालयामध्ये अर्जदार हिचा जन्म मौजे बांदलवाडी, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. ०७/०४/१९८६ रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्रीम. शुभांगी सुदाम सुर्वे -लग्नापूर्वीचे नाव व श्रीम. शुभांगी भरत हळदे लग्नानंतरचे नाव यांचा जन्म मौजे बांदलवाडी, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. ०७/०४/१९८६ रोजी राहत्या घरी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव — सही/-
ता. १२/१२/२०२४ — कार्यकारी दंडाधिकारी माणगांव

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक मिलिंद अनंत कोरडे व मनिषा मिलिंद कोरडे यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशीलवार वर्णन पुढीलप्रमाणेः-

**मौजे-ढाक तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| भूमापन क्रं व उपविभाग सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार(रू.पै.) |
|---|---|---|
| १०/९ | एकूण क्षेत्र ०-१५-०० हे.आर.पॉ | ०-०६ |
| १०/१६/ब | एकूण क्षेत्र ०-३३-०० हे.आर.पॉ | ०-१७ |
| १६/२ | एकूण क्षेत्र १-८२-०० हे.आर.पॉ | ०-७८ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांनी आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हाला ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : १३/१२/२०२४

खरेदीदारा तर्फे वकील
**ॲड.निलेश कान्हु मोरे** मोबा.९८२२६९११०९
ऑफिस पत्ता-शॉप नं.२९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर,
अमराई रोड, कर्जत ता.कर्जत, जि.रायगड ४१०२०१

## जाहीर नोटीस

अर्ज क्र. १७५/२०२४

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्री. महादेव वेटु दसवते
वय: ४५ वर्षे, धंदा शेती, — अर्जदार
रा. नाणोरे,
ता. माणगांव, जि. रायगड.

विरुद्ध

५. निबंधक जन्म - मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
माणगांव नगरपंचायत माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड. — सामनेवाला
६. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहु अर्जदार श्री. महादेव वेटु दसवते यांचे आजोबा कै. लक्ष्मण सुडक्या दसवते हे दि. १५/०४/१९६९ रोजी मौजे नाणोरे, ता. माणगांव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाले. त्यांचे मुत्युची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना क्र. मानपं / जन्म-मृत्यू/ १२९०/२०२४-२५ ने दि. १४/१०/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचे आजोबा कै. लक्ष्मण सुडक्या दसवते हे दि. १५/०४/१९६९ रोजी मयत झाले असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होवून दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देण्यास कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे. किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. महादेव वेटु दसवते यांचे आजोबा कै. लक्ष्मण सुडक्या दसवते हे दि. १५/०४/१९६९ रोजी मौजे नाणोरे, ता. माणगांव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाले. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव : — सही/-
ता. : १२/१२/२०२४ — कार्यकारी दंडाधिकारी माणगांव

## जाहीर नोटीस

अर्ज क्र. १७८ /२०२४

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्री. अजय वेळसी वाघरी
वय ३५ वर्षे, धंदा शेती. — अर्जदार
रा. : मु. पो. तळाशेत (इंदापूर),
ता. माणगांव, जि. रायगड.

विरुद्ध

५. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत तळाशेत,
ता. माणगांव, जि. रायगड. — सामनेवाला
६. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्री. अजय वेळसी वाघरी यांची आई कै. घुगी वेळसी वाघरी ही दि. ११/०७/२०१७ रोजी मौजे तळाशेत ता. माणगांव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाली. त्यांचे मुत्युची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दि. २१/१०/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांची आई कै. घुगी वेळसी वाघरी ही दि. ११/०७/२०१७ रोजी मयत झाली असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होवून दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देण्यास कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे. किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. अजय वेळसी वाघरी यांची आई कै. घुगी वेळसी वाघरी ही दि. ११/०७/२०१७ रोजी मौजे तळाशेत, ता. माणगांव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाली. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव : — सही/-
ता. : १२/१२/२०२४ — कार्यकारी दंडाधिकारी माणगांव

## जाहीर नोटीस

अर्ज क्र. १७७/२०२४

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्री. आदम युनूस रोहेकर
वय : ५७ वर्षे, धंदा : शेती, — अर्जदार
सध्याचा पत्ता : सानिया मंझिल रूम नं. १
वर्धमान नगर, भानवज रोड, खोपोली,
ता. खालापूर, जि. रायगड.
कायमचा पत्ता : मु.पो. मोर्बा,
ता. माणगाव, जि. रायगड

विरूद्ध

१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत मोर्बा,
ता. माणगांव, जि. रायगड.
२. गटविकास अधिकारी सो., — सामनेवाला
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहु अर्जदार श्री. आदम युनूस रोहेकर यांचे आजोबा कै. महमद इसाक शे. आदम रोहेकर हे दि. २९/०२/१९६८ रोजी मौजे मोर्बा, ता. माणगाव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाले. त्यांचे मुत्युची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दि. ३०/०९/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचे आजोबा कै. महमद इसाक शे. आदम रोहेकर हे दि. २९/०२/१९६८ रोजी मयत झाले असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होवून दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देण्यास कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे. किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे, न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. आदम युनूस रोहेकर यांचे आजोबा कै. महमद इसाक शे. आदम रोहेकर दि. २९/०२/२००८ रोजी मौजे मोर्बा, ता. माणगांव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाले. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव : — सही/-
ता. : १२/१२/२०२४ — कार्यकारी दंडाधिकारी माणगांव

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे आशिलांनी मौजे चिकणी ता. मुरुड जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. जयेश तुलशिदास मर्चंट व सौ. मोनिका जयेश मर्चंट रा.मुंबई यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू.पै) |
|---|---|---|---|
| चिकणी ता. मुरूड | ११/१/अ | ०.२६.६० पो.ख ०.०१.०० ०.२७.६० | ६.६३ |

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असुन ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिच्या कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तकारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणुन द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदर मिळकत ही या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरून आमचे आशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहुन मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग — सही /-
दिनांक १३/१२/२०२४

**ॲड. अंकिता अनंत पाटील**
०१. बी विंग, वैद्यबाग बिल्डिंग
जुनी नगरपालिका शेजारी अलिबाग
ता. अलिबाग जि. रायगड ४०२२०१
मो. नं. ७०६६१४३३३८

## जाहीर नोटीस

अर्ज क्र. १७९/२०२४

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्रीम. लक्ष्मी दत्ताराम सावंत
वय ६३ वर्षे, धंदा : शेती — अर्जदार
रा. नाणोरे,
ता. माणगांव, जि. रायगड.

विरुद्ध

५. निबंधक जन्म - मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
माणगांव नगरपंचायत माणगांव, — सामनेवाला
ता. माणगांव, जि. रायगड.
६. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहु अर्जदार श्रीम. लक्ष्मी दत्ताराम सावंत हिचा मुलगा कै. संतोष दत्ताराम सावंत हा दि. १०/०९/२०२२ रोजी मौजे नाणोरे, ता. माणगांव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाला. त्यांचे मुत्युची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना क्र. मानपं/जन्म-मृत्यू/१५६३/२०२४-२५ ने दि. २३/१०/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार हिचा मुलगा कै. संतोष दत्ताराम सावंत हा दि. १०/०९/२०२२ रोजी मयत झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होवून दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देण्यास कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्रीम. लक्ष्मी दत्ताराम सावंत हिचा मुलगा कै. संतोष दत्ताराम सावंत हा दि. १०/०९/२०२२ रोजी मौजे नाणोरे, ता. माणगांव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव : — सही/-
ता. १२/१२/२०२४ — कार्यकारी दंडाधिकारी माणगांव

## जाहीर नोटीस

अर्ज क्र. १७६/२०२४

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्री. महादेव वेदु दसवते
वय : ४५ वर्षे, धंदा : शेती, — अर्जदार
रा. : नाणोरे,
ता. माणगांव, जि. रायगड.

विरूद्ध

१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
माणगांव नगरपंचायत माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.
२. गटविकास अधिकारी सो., — सामनेवाला
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहु अर्जदार श्री. महादेव वेटु दसवते यांची आई कै. लक्ष्मी वेटु दसवते ही दि. २४/०७/२००७ रोजी मौजे नाणोरे, ता. माणगांव, जि. रायगड. येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाली. त्यांचे मुत्युची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना क्र. मानपं/जन्म-मृत्यू /१५६२/२०२४-२५ ने दि. २३/१०/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांची आई कै. लक्ष्मी वेदु दसवते ही दि. २४/०७/२००७ रोजी मयत झाली असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होवून दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देण्यास कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे. किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. महादेव वेदु दसवते यांची आई कै. लक्ष्मी वेदु दसवते ही दि. २४/०७/२००७ रोजी मौजे नाणोरे, ता. माणगांव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाली. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव : — सही/-
ता. : १२/१२/२०२४ — कार्यकारी दंडाधिकारी माणगांव

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे वर्णे, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक प्रविण जयराम गांगल यांचेकडुन खरेदी घेण्याचे ठरविले आहे सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मौजे वर्णे, ता.कर्जत, जि.रायगड येथील जमीन मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| २२ | ८/अ | ०-०६-१० | ०-०६ |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुलअखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. १२/१२/२०२४

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**ॲड. किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो. ९४२२०६८७५५

## जाहीर नोटीस

**अलिबाग येथील उपविभागीय अधिकारी अलिबाग यांच्या न्यायालयात**

भुपेश शांताराम म्हात्रे (म.त.वा) — अपिलार्थी
प्रीत भुपेश म्हात्रे

विरूद्ध

जैन श्वेतांबर पद्य प्रभुजी महाराज — उत्तरार्थी
देवालय पोयनाड तर्फे पंच
अनराज टेकचंद जेठमल

सर्व लोकांस कळविण्यात येते की, सदर नोटीसीत वर्णन केलेल्या खालील वर्णनाच्या मिळकतीबाबत अपिलार्थी यांनी या न्यायालयात टेनन्सी अपील क्र.४९/२०२३ दाखल केले आहे.

| अ.क्र | गावाचे नांव | ग.नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|---|
| १ | मौजे श्रीगांव, ता.अलिबाग | १५५/१ | १-०२-२० | १२.०६ |

सदर अपिलाच्या सुनावणीच्या नोटीसा अपिलार्थी व उत्तरार्थी यांना देण्यात आल्या असता, खाली नमूद केलेल्या उत्तरार्थीना नोटीसांची बजावणी झाली नसल्याने अपिलार्थी यांनी स्थानिक वृत्तपत्रात जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याची विनंती केली आहे.

**उत्तरार्थीचे नाव :**

श्री.जैन श्वेतांबर पद्य प्रभुजी महाराज
देवालय पोयनाड तर्फे पंच
१. श्री.अनराज टेकचंद जेठमल,
२. श्री.गणेशमल कस्तुरचंद मारवाडी,
३. श्री.पूनमचंद कस्तुरचंद मारवाडी,
४. श्री.शेषमल कस्तुरचंद मारवाडी
५. श्री.पुकराज कस्तुरचंद मारवाडी,
क्र. १ ते ५ रा मु.पो.पोयनाड,
ता.अलिबाग जि.रायगड
६. श्री.भास्कर गणपत पाटील,
७. श्री.काशिनाथ गणपत पाटील,
क्र.६ व ७ रा.मु.मेढेखार, पो.पोयनाड
ता.अलिबाग जि.रायगड

सदर अपिलाची पुढील सुनावणीची तारीख दि.१४/०१/२०२५ रोजी निश्चित करण्यात आली आहे. वरील उत्तरार्थी यांनी सुनावणीकामी स्वतः किंवा प्रतिनिधी यांच्यामार्फत उपरोक्त सुनावणीच्या तारखेस व वेळी या न्यायालयात हजर रहावे. सुनावणी कामी आपण स्वतः किंवा आपल्या प्रतिनिधी मार्फत गैरहजर राहिल्यास कागदपत्रांच्या आधारावर गुणवत्तेवर निर्णय दिला जाईल याची नोंद घ्यावी.

सही/-
**(मुकेश चव्हाण)**
**उपविभागीय अधिकारी अलिबाग**
**उपविभाग अलिबाग**

दिनांक १३/१२/२०२४

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे तळवली, ता. मुरुड, जि. रायगड खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक जयश्री चंद्रकांत बंदरी यांच्या नांवे असलेली मालकी हक्काची व त्यांचे ताबे कब्जातील खालील वर्णन केलेली भोगवटादार वर्ग १ ची शेतजमिन मिळकत माझे अशिल यांनी कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशी आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | एकुण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| तळवली ता. मुरूड | ३३४ | क्षेत्र ०-१६-९० पो.ख. ०-००-०० एकूण क्षेत्र ०-१६-९० | ४.३७ |

सदर मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी याउपरही सदरहू मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबाकब्जा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून ०७ (सात) दिवसांच्या आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष व रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. जर विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहु मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे, असे गृहित धरून वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक :- १३/१२/२०२४

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड अलिबाग
ऑफिस पत्ता :- फ्लॅट नं.१०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट,
जे.एस.एम कॉलेज जवळ अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. मयुर महादेव मोहिते, रा. मु. तारघर, पो. उलवा, उरण बेलापुर रोड, विठ्ठल मंदिर जवळ, ता. पनवेल, जि. रायगड, ४१०२०६, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे नालधे, ता.कर्जत, जि.रायगड, येथील जमिन मिळकत**

| स.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| ९/८/अ | ०.५७.२० पो.ख.०.००.५० | ०.६९ | श्री.भुषण यशवंत जाधव |
| | एकुण ०.५७.७० | | |
| यापैकी खरेदी केलेले क्षेत्र ०.२०.०० गुंठे | | | |

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन होणाऱ्या १४ (चौदा) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत — सही /-
दिनांक :- १३/१२/२०२४

**ॲड. उषा जे. कांबळे.**
कर्जत, 'पुष्प विमल' निवास,
नानामास्तर नगर, मुद्रे
मो.नं. ७३८५००४८०६

# १८ व्या वर्षात ठरला बुद्धिबळाचा जगज्जेता

# अभिमानास्पद!

## डी गुकेशने रचला इतिहास



**। सिंगापूर । वृत्तसंस्था ।**

बुद्धिबळम्हटलेकीविश्वनाथ आनंद हेच नाव पिढ्यान पिढ्या ऐकू येत होते. पण आता या क्षेत्रात नव्या नावाचे पदार्पण झाले आहे. भारताचा बुद्धिबळपटू डी गुकेश हा विश्वविजेता ठरला आहे. त्याने १८व्या वर्षी विश्वविजेता होण्याचा बहुमान पटकावला आहे. जागतिक अजिंक्यपद बुद्धिबळ स्पर्धेत जगज्जेता डिंग लिरेनचे आव्हान मोडून काढत त्याने हा इतिहास घडवला आहे. विश्वविजेत्याला पराभूत करत भारताचा युवा स्टार जगज्जेता बनला आहे. १८ वर्षीय बुद्धिबळपटू डी गुकेशने जागतिक अजिंक्यपद २०२४ स्पर्धेत चिनच्या डींग लिरेनला शेवटच्या डावात पराभूत करत सर्वात युवा विश्वविजेता बनण्याचा मान पटकावला आहे.

तेराव्या डावापर्यंत हा सामना बरोबरीत चालला होता. तत्पुर्वी ११ व्या डावात गुकेशने विजय मिळवून बरोबरीची कोंडी सोडवली होती. १२व्या डावात लिरेनने बाजी मारली होती. यामुळे अखेरचा डाव कोण जिंकणार की हा मुकाबला टायब्रेकरमध्ये जाणार, याकडे बुद्धिबळ चाहत्यांचे लक्ष लागले होते. पण १४ व्या डावात डी गुकशेसमोर लिरेनला पराभूत करून विश्वविजेता बनण्याचे आवाहन होते. गुकशेने आवाहन स्वीकारले आणि ७.५ -६.५ अशा फरकाने सामना जिंकला. २०१८ साली सलग १०८ दिवस न हरता खेळण्याचा पराक्रम लिरेनने केला होता. अशा खेळाडूला पराभूत करत गुकेशने जागतिक स्तरावर नवी ओळख निर्माण केली आहे.

जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम सामन्यात डिंग लिरेनने एक चूक केली. तीच संधी साधत डी. गुकेश याने हे विश्वविजेतेपद पटकावले आहे. शेवटचा सामना पाच तास चालला. आणि यावेळी लिरेनकडून झालेल्या एका चुकीमुळे त्याला डाव, सामना आणि जगज्ञेतेपद असे सारेच गमवावे लागले. गुकेशच्या या विजयाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीदेखील त्याचे अभिनंदन केले आहे.

या वर्षाच्या सुरुवातीला कँडिडेट्स स्पर्धा जिंकून गुकेशने जागतिक मुकुटासाठी सर्वात तरुण स्पर्धक म्हणून सामन्यात प्रवेश केला होता. तो जागतिक विजेतेपद पटकावणारा दुसरा भारतीय ठरला आहे. भारतीय दिग्गज बुद्धिबळपटू विश्वनाथन आनंद यांनी ५ वेळा विश्वविजेतेपदाचा मान पटकावला आहे. विजतेपादानंतर डी गुकेशने १३ लाख डॉलर्सची कमाई केली आहे. तर, डिंग लिरेन १२ लाख डॉलर्सचा मानकरी ठरला आहे. त्यापेक्षाही अधिक महत्त्वाचे म्हणजे अठरावा विश्वविजेता म्हणून भारताच्या डी गुकेशचे नाव बुद्धिबळाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरले गेले आहे.

# केंद्रस्तरीय व्यक्तिमत्व विकास स्पर्धा संपन्न



**। माणगाव । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषद केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धा आणि व्यक्तिमत्व विकास स्पर्धा होडगाव येथील राजिप शाळेत बुधावारी (दि.११) संपन्न झाल्या. यावेळी वैयक्तिक स्पर्धेत बेचकीने नेम धरणे, दोरी उडी, मातीपासून शिल्प तयार करणे अशा स्पर्धा घेण्यात आल्या. तयेच, व्यक्तिमत्व विकास स्पर्धे अंतर्गत सांघिक नृत्य स्पर्धा, संगीत गायन स्पर्धा, पथनाट्य, मुलींची लंगडी, मुलांसाठी लगोरी अशा स्पर्धा घेण्यात आल्या.

यावेळी वैयक्तिक स्पर्धेमध्ये तेल्याची वाडी, पळसगाव बुद्रुक, होडगाव आदिवासी वाडी, होडगाव, खर्डी खुर्द या शाळेतील विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावला. तर, व्यक्तिमत्व विकास स्पर्धेत होडगाव, पळसगाव बुद्रुक, पळसगाव खुर्द आदिवासी वाडी या शाळेतील विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावला आहे. बीट स्तरावरील स्पर्धेचे आयोजन जावळी हायस्कूलमध्ये १३ डिसेंबर रोजी करण्यात आले असून प्रथम क्रमांक आलेल्या शाळांनी यात सहभागी होऊन घवघवीत यश मिळवावे, अशा शुभेच्छा देण्यात आल्या.

# प्रविण तांबे गुजरातचा प्रशिक्षक

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

गुजरात जायंट्स फ्रँचायझीने आगामी हंगामासाठी संघामध्ये नवीन प्रशिक्षक फळीची निवड केली आहे. ज्यामध्ये भारताचा माजी क्रिकेटपटू प्रविण तांबे याने गुजरात जायंट्स महिला संघाचा गोलंदाजी प्रशिक्षक म्हणून जबाबदारी स्वीकारली आहे. त्याचबरोबर ऑस्ट्रेलियन माजी क्रिकेटपटू डॅनियल मार्श फलंदाजी प्रशिक्षक व मायकल क्लिंगरची मुख्य प्रशिक्षक म्हणून निवड करण्यात आली आहे. प्रविण तांबे याने वयाच्या ४१ व्या वर्षी आयपीएलमध्ये पदार्पण केले होते. त्याच्याकडे मोठा प्रशिक्षण अनुभव आहे. त्याने याआधी कोलकाता व लखनौचा प्रशिक्षक म्हणून काम पाहिले आहे.

# कोस्ते केंद्रात स्पर्धा संपन्न



**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव तालुक्यातील कोस्ते खुर्द केंद्राच्या केंद्रस्तरीय क्रीडा व व्यक्तिमत्व विकास स्पर्धा ५ डिसेंबर रोजी अतिशय उत्साहात पार पडल्या.

यावेळी शाळा व्यवस्थापन समिती शिक्षण तज्ञ मंगेश खराडे यांनी विद्यार्थी व शिक्षकांना प्रोत्साहनपर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासात क्रीडा स्पर्धांचे अनन्यसाधारण महत्त्व असून या स्पर्धांमधून विद्यार्थ्यांचे जीवन समृद्ध होते. आम्ही सुद्धा अशाच स्पर्धांमधून घडलो. सर्व विद्यार्थ्यांनी प्रामाणिकपणे खेळात सहभागी होऊन खिलाडीवृत्ती जोपासावी, असे प्रतिपादन मंगेश खराडे यांनी केले. यावेळी उद्घाटन प्रसंगी सरपंच मोरे, केंद्रप्रमुख संजय पालांडे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा सत्वे आदि उपस्थित होते.

त्यानंतर सर्व शिक्षक, विद्यार्थी, पालक वर्ग व ग्रामस्थांनी क्रीडा स्पर्धेची शपथ घेतली. या स्पर्धेमध्ये लहान गट व मोठा गट अंतर्गत लगोरी, दोरी उड्या, लंगडी, बेचकी, मातीशिल्प, समूहगायन, समूह नृत्य, पथनाट्य अशा विविध खेळात सर्व शाळेतील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. बेचकी खेळातील व विविध स्पर्धेतील आदिवशी विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला होता.

# क्रीडा, व्यक्तिमत्व विकास स्पर्धा



**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**

राजिप शिक्षण विभागाच्यावतीने सुधागड तालुक्याचे गटशिक्षण अधिकारी साधुराम बांगारे यांच्या मार्गदर्शनाखाली नाडसुर केंद्रातील धोंडसे शाळेत सोमवारी (दि.९) केंद्रस्तरीय क्रीडा व व्यक्तिमत्व विकास स्पर्धा महोत्सव संपन्न झाला. या स्पर्धेत नाडसुर केंद्रातील १३० विद्यार्थी सहभागी झाले होते.

राजिप शिक्षण विभागाच्या क्रीडा व व्यक्तिमत्व विकास स्पर्धांमुळे मुलांना शाळेबद्दल गोडी वाढू लागली आहे. तसेच, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत झाली असून विद्यार्थ्यांना अभ्यास पूरक विविध उपक्रम राबविल्याने मुलांच्या मनात नवचैतन्य निर्माण झाले आहे. व्यक्तिमत्व विकास स्पर्धेमुळे स्थलांतर होणारे विद्यार्थी सुद्धा या स्पर्धामुळे शाळेत नियमित येऊन उपस्थिती टिकू लागली आहेत. ग्रामीण भागात खेळाला जाणारा बेचकी नेमबाजी, लंगडी, माती शिल्प, लगोरी इ. खेळ लोप पावत चालला असताना या पारंपरिक खेळाचा समावेश केल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.

दरम्यान, या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन सरपंच श्याम खंडागळे, ललिता ठोंबरे, सारिका जाधव, उत्तम फाटे, संदेश जाधव, विजय जाधव, श्याम जाधव, निशा जाधव, गणेश जाधव, राजू गुरव, दिपाली जाधव, शर्मिला जाधव, पाटील या मान्यवरांच्या हस्ते पार पडले.

# महाविद्यालयातील विद्यार्थीनींचा 'अविष्कार'

**। रोहा । वार्ताहर ।**

मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास कक्षातर्फे आयोजित १९व्या 'आविष्कार २०२४-२५' या अंतरमहाविद्यालयीन संशोधन महोत्सवाचा विभागीय (रायगड) राउंड कळंबोलीतील केएलई म हाविद्यालयात सोमवारी (दि.०९) पार पडला. या स्पर्धेत धाटाव एमआयडीसी येथील एम.बी. मोरे महिला महाविद्यालयातील २१ विद्यार्थिनींनी ६ संशोधन प्रकल्पांचे सादरीकरण केले होते.

नव कल्पनांवर आधारित मानवी क्षमता, औषधशास्त्र, महिलांचे आरोग्य, शेअर मार्केट आदी विषयांवर आधारित हे ६ प्रकल्प पदवी स्तरातील



विद्यार्थिनींनीकडून तयार करण्यात आले होते. स्पर्धेतील पोस्टर फेरीनंतर यापैकी 'कॅसि-ब्रेव्ह' या प्रकल्पाची पोडीयम राऊंडला निवड करण्यात आली आहे. यावेळी महिला महाविद्यालयाच्या रिसर्च सेलच्या प्रमुख प्रतिमा भोईर, दिपाली वारंगे, नरेश घाग, ममता बिंद, दर्शना शिंदे आणि ग्रंथपाल निर्मला थोरात यांनी सहभागी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.

# जासईत प्रश्नमंजुषा स्पर्धा संपन्न



**। उरण । वार्ताहर ।**

रयत शिक्षण संस्थेचा विद्यार्थी या स्पर्धेच्या युगात टिकून राहावा, त्याच्या अंगातील कलागुणांना वाव मिळावा व तो सर्वगुणसंपन्न व्हावा यासाठी संस्था पातळीवर अनेक उपक्रम व स्पर्धांचे आयोजन केले जाते. याचाच एक भाग म्हणून कर्मवीर विद्याप्रबोधिनी मार्फत जासईतील लोकनेते दि.बा. पाटील कनिष्ठ महाविद्यालयात रायगड विभागीय प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष सुरेश पाटील हे उपस्थित होते. यावेळी रयतच्या रायगड विभागातील २४ शाळांचे संघ या स्पर्धेत सहभागी झाले होते. दिवसभर या स्पर्धेच्या विविध फेऱ्या पार पाडण्यात आल्या. या रायगड विभागीय पातळीवर प्रथम क्रमांक गव्हाण शाखा, द्वितीय क्रमांक वावंजे शाखा, तृतीय क्रमांक जासई शाखा आणि उत्तेजनार्थ उलवे शाखा यांनी यश संपादन केले.

# भारतीय क्रिकेट स्टार आमनेसामने

**। अबुदाबी । वृत्तसंस्था ।**

सूर्यकुमार यादव, श्रेयस अय्यर, अजिंक्य रहाणे, हार्दिक पांड्या, कृणाल पांड्या व पृथ्वी शॉ हे स्टार खेळाडू एकमेकांविरुद्ध खेळताना दिसणार आहेत. सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीच्या स्पर्धेच्या उपांत्य फेरीच्या दोन्ही लढती शुक्रवारी (दि.१३) बंगळुरू येथे खेळवल्या जाणार आहेत. मुंबई संघाचा सामना बडोद्याशी, तर दिल्लीविरुद्ध मध्य प्रदेश यांच्यात दुसरा उपांत्य फेरीचा सामना होणार आहे. मुंबईने या हंगामात दोनवेळा दोनशेहून अधिक धावांचा यशस्वी पाठलाग केला. बडोद्याने हार्दिकच्या जोरावर मैदान गाजवले आहे. त्यामुळे सामन्यात भारतीय संघातील स्टार समोरासमोर उभे ठाकणार आहेत.

# महाराष्ट्राच्या मुलींची भारतीय संघात निवड

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताच्या महिला निवड समितीने १९ वर्षांखालील आशिया चषक स्पर्धेच्या पहिल्या पर्वासाठी भारतीय संघ जाहीर केला आहे. मलेशियात पार पडणाऱ्या या स्पर्धेसाठी निवडलेल्या भारतीय संघात महाराष्ट्राची पॉकेट डायनामो इश्वरी



अवसारे व भाविका अहिरे या महाराष्ट्राच्या खेळाडूंसह मुंबईच्या सानिका चाळकेची निवड झाली आहे.

इश्वरीने बीसीसीआयकडून घेण्यात आलेल्या महिलांच्या १९ वर्षांखालील एकदिवसीय चषक स्पर्धा गाजवली आहे आणि ती सर्वाधिक धावा करणारी खेळाडू ठरली होती. तिने ८ सामन्यांत ८०.१७च्या सरासरीने ४८१ धावांची खेळी साकारताना ६२ चौकार व ६ षटकारांचा पाऊस पाडला होता. उपकर्णधार सानिका चाळके मुंबईचे नेतृत्व करते आणि तिने ९ सामन्यांत २६९ धावा केल्या होत्या. यष्टिरक्षक भाविका महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करते आणि तिने ४ सामन्यांत १३९ धावा केल्या आहेत.

# नाट्य स्पर्धेत नांदगाव शाळा प्रथम



**। कोर्लई । वार्ताहर ।**

मुरुड तालुक्यातील वळके येथील राजिपच्या प्राथमिक शाळेत गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या नाट्य स्पर्धेत नांदगाव मधील प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन प्रथम क्रमांक पटकावला आहे. रायगड जिल्हा परिषदेतर्फे 'व्यक्तिमत्व विकास स्पर्धा २०२४' या अंतर्गत तालुकास्तरीय स्पर्धा मंगळवारी (दि.१०) पार पडल्या. यामध्ये पथनाट्य स्पर्धेत नांदगाव मराठी शाळा क्रमांक-३ मधील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या छोट्या गटात 'खरच स्त्री सुरक्षित आहे का?' या पथनाट्याला प्रथम क्रमांक मिळाला आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाला शाळेचे मुख्याध्यापक जयवंत देडगे व पूजा तोताडे यांचे मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले आहे.

### स्वराज्य स्पोर्ट्स्, संघर्ष मंडळ ठरले अजिंक्यपदाचे मानकरी

# स्वस्तिक, रत्नदीप किशोर गटाचे विजेते

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबई उपनगर कबड्डी असो. संयोजन संस्थेच्या सहकार्याने संचालिका नम्रता भोसले यांच्या सौजन्याने कांदिवलीतील दादोजी कोंडदेव क्रीडांगणावर जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेच्या महिला गटात स्वराज्य स्पोर्ट्स् व संघर्ष मंडळ यांनी विजेतेपद पटकावले आहे. किशोर गटात स्वस्तिक मंडळ व रत्नदीप कबड्डी संघाने हा मान पटकाविला आहे.

पूर्व विभाग महिलांच्या अंतिम सामन्यात स्वराज्य स्पोर्ट्स्ने महात्मा



फुले स्पोर्ट्स्चा प्रतिकार ३२-२८ असा मोडून काढत जेतेपद पटकावले आहे. सावध खेळ करीत विश्रांतीला १९-१६ अशी आघाडी घेणाऱ्या स्वराज्यने नंतर देखील संयमाने खेळत आपला विजय साजरा केला. याच गटाच्या पश्चिम विभागात संघर्ष क्रीडा मंडळाने महात्मा गांधी स्पोर्ट्स्चे कडवे आव्हान २६-२३ असे परतवून लावत विजेतेपद मिळविले आहे. शेवटच्या क्षणापर्यंत चुरशीने खेळाला गेलेल्या या सामन्यात पूर्वार्धात १०-०९ अशी नाममात्र आघाडी संघर्ष संघाकडे होती. उत्तरार्धात देखील



चुरस वाढतच गेली. शेवटी ३ गुणांच्या फरकाने संघर्ष संघाने बाजी मारली आहे.

पूर्वविभाग किशोरगटात स्वस्तिक मंडळाने अभिनव मंडळाचा ३५-१८ असा सहज पाडाव करीत अंतिम जेतेपद पटकावले आहे. वंश कदम, आदित्य गुडेकर यांच्या खेळाच्या जोरावर स्वस्तिकने पहिल्या डावात १७-०७ अशी आश्वासक आघाडी घेतली. दुसऱ्या डावात संयमाने खेळ करीत विजयाला गवसणी घातली. याच गटाच्या पश्चिम विभागात रत्नदीप कबड्डी संघाने जय बजरंग मंडळाला ५२-३३ असे नमवित विजेतेपदाचा मान मिळविला आहे. मध्यांतरालाच ३०-१२ अशी भक्कम आघाडी घेत रत्नदीपने अर्धे काम फत्ते केले होते.


व्यावसायिक गटाच्या अंतिम सामन्यात ब्लॉक हॅक फिल्म संघाने साई श्रद्धा सप्लीमेशन वर ३१-१८ असा विजय मिळवित या गटाचे जेतेपद मिळविले आहे. द्वितीय श्रेणी पश्चिम विभागात वंदे मातरम् मंडळाने संघर्ष मंडळाला ३१-१७ असे पराभूत करीत या गटाचे विजेतेपद मिळविले आहे. पूर्वार्धात १८-१० अशी आघाडी घेणाऱ्या वंदे मातरम्ने उत्तरार्धात देखील त्याच जोशाने खेळ करीत हे जेतेपद मिळविले आहे.

# अफगाणांची शरणागती

**। हरारे । वृत्तसंस्था ।**

अफगाणिस्तान क्रिकेट संघ सध्या झिम्बाब्वे दौऱ्यावर आहे. जिथे राशिद खानच्या संघाला तीन सामन्यांची टी-२० मालिका, ३ सामन्यांची एकदिवसीय मालिका आणि २ सामन्यांची कसोटी मालिका खेळायची आहे. हा दौरा बुधवारी (दि.११)पहिल्या टी-२० सामन्याने सुरू झाला आहे. हा सामना ब्लॉकबस्टर चित्रपटापेक्षा कमी नव्हता. या थरारक अशा सामन्यात उत्साहाच्या सर्व मर्यादा ओलांडल्या गेल्या. झिम्बाब्वेने शेवटच्या चेंडूवर पहिला टी-२० जिंकला आणि मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे.

अफगाणिस्तानने पहिल्या टी-२० सामन्यात २० षटकात ६ गडी गमावत १४४ धावा केल्या होत्या.



प्रत्युत्तरात झिम्बाब्वेने शेवटच्या चेंडूवर ४ गडी राखून सामना जिंकला आहे. या सामन्यात, शेवटच्या षटकात झिम्बाब्वेला ११ धावा करायच्या होत्या आणि त्यांचे ६ गडी बाद झाले होते. त्यानंतर अफगाणिस्तानचा संघ हा सामना जिंकेल असे वाटत होते, पण शेवटी झिम्बाब्वेने बाजी मारली. शेवटचे षटक अजमतुल्ला उमरझाईने टाकले. परंतु, या षटकात ताशिंगा मुसेकिवा याने संयमी खेळी करून ११ धावा काढत संघाच्या विजयावर शिक्कामोर्तब केले आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)